

श्री

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासु सुप्रसिद्ध पेढी

## ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

साईबाबांचें केवळ नाव घेतल्यानें त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. त्या नावावर तुमची निस्सीम श्रद्धा पाहिजे. बाबांवर श्रद्धा ठेवून ज्याचा त्यानें अनुभव घ्यावयाचा असतो. येथें दुसऱ्यांचें सांगणें उपयोगी पडत नाहीं. येथें तर्कवितर्कांचें काम नाहीं. येथें उपयोगी पडते केवळ श्रद्धा. जे तर्क किंवा वादविवाद करीत बसतात त्यांच्या हातीं कांहीं लागत नाहीं. भाव शुद्ध पाहिजे. जो शुद्ध भाविक आहे; ज्याच्या अंतःकरणांत निस्सीम श्रद्धा आहे, ज्याला तळमळ लागून राहिली आहे त्यालाच बाबा पावतात. इतरांस नाहीं. हें वच बहु मोलाचें. याचा विसर कधींहि पडूं देऊं नका.

—श्रीसाईसचरित्


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४२ वें ] आक्टोबर १९६२ [ अंक ७ वा

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्प

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८८, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

श्रीसाईबाबांना समाधिस्त होऊन पंचेचाळीस वर्षें मागें पडलीं आणि यंदा आपण त्यांचा शेचाळीसावा पुण्यतिथीदिन साजरा करीत आहोंत. ते कोणत्या सालीं जन्मले व कुठें जन्मले याचा ठावठिकाणा अचूक असा सांगणें कठीण आहे; परंतु त्यांचा निर्याण दिन माहीत असल्यामुळें तो दिवस शिरडी येथें सतत तीन दिवस मोठ्या समारोहानें साजरा केला जात असतो. विजया दशमीला त्यांनीं आपली इह-लोकींची यात्रा संपविली. ते देहानें आमच्यांत वावरत नसले तरी त्यांच्या भक्तांना त्यांचें अस्तित्व क्षणोक्षणीं जाणवत असतें. जे जे त्यांचें मनोभावें चिंतन करतात, त्यांना ते पावतात, त्यांच्या इच्छा पूर्ण करतात व त्यांना संकटमुक्त करतात.

देहानें आमच्यांत वावरत असतां त्यांनीं भक्तांना जीं जीं आश्वासनें दिलीं तीं तीं आजवर ते पाळीत आलें आहेत. शिरडीचे साईबाबा म्हणजे जागतें दैवत. तें दैवत आजही आम्हांला जागवीत आहे व आमच्या दैनंदिन कर्तव्याची जाणीव आम्हांला पदोपदीं करून देत आहे.

मनुष्य प्राणी भयंकर स्वार्थी आहे. त्याला आपलें सुख, आपला ऐषआराम तेवढा समजतो. रोजच्या जीवनांत कांहीं अडचण उपस्थित झाली म्हणजे आम्हांला बाबा आठवतात एरवी नाहीं.

बाबांची आठवण नित्य नेमानें करणें म्हणजे काय? बाबानीं जीवनभर जें सांगितलें, जें आचरिलें व ज्या तत्त्वावर त्यांनीं विशेष भर दिला त्या तत्त्वाचें न चुकतां आचरण करणें. बाबांनीं काय सांगितलें? स्वतःला विसरून अहंकाराचा त्याग करून तुम्हीं सर्वांशीं प्रेमभावानें वागा. तो अमूक जातीचा, तो अमूक समाजाचा किंवा तमूक धर्माचा म्हणून त्याला दूर लोटूं नका. सर्वांभूतीं बंधुभाव बाळगा. जो जो कोणी अडचणींत सांपडला असेल त्याला त्याच्यासाठीं मदतीचा हात पुढें करा. मनाचें व शरिराचें पावित्र्य संभाळा.

हें पावित्र्य सांभाळायचें म्हणजे काय करायचें? बाबानीं व आजवर जे साधुसंत होऊन गेले त्या सर्वांनीं 'मन करा रे निर्मळ' म्हणुन कंठरवानें सांगितलें आहे. आपल्या मनाची आपण तपासणी केली तर काय बरें दिसून येईल! इतरांबद्दल इतरांच्या दुःखाबद्दल आम्हांला कांहींच वाटत नाहीं. स्वतःचें सुख दुःख तेवढें दिसतें. दुसऱ्यांचें कांहींही होवो. ही दुष्ट भावना मनांतून गेली पाहिजे.

परोपकारासारखें पुण्य नाहीं. बाबांनीं आपल्या या जगांतील वास्तव्यांत काय बरें केलें? सारा जन्म दुसऱ्यांचीं दुःखें मग तीं कोणत्याही प्रकारचीं असोत, तीं त्यांनीं

स्वतःवर ओढून घेतली व दुसऱ्यांना दुःखमुक्त केलें. देहानें आमच्यांत वावरत असतां परदुःख निवारण हेंच त्यांचें मुख्य कार्य होतें व त्यांना देह विसर्जन झाला तरी आजही त्यांचें तेंच कार्य सतत चालू आहे. अशा रीतीनें त्यांनीं केवढें मोठें, उदात्त व ठसठशीत उदाहरण आपल्यापुढें ठेविलें आहे बरें! त्यापासून आम्हांला कांहींच बोध घेतां येणार नाहीं कां!

माणुसकीनें वागण्यांत मानव जन्माची सार्थकता आहे. बाबांनीं आम्हांला देऊन ठेवलेली सर्वांत मोठी देणगी म्हणजे माणुसकीचा धर्म. हा धर्म आम्हांला काय सांगतो आणि काय शिकवतो? प्रत्येक मनुष्य म्हणजे भगवंताची प्रतिमा, भगवंताचें स्वरूप होय. देवाची भक्ति करायची म्हणजे तरी काय? मानवाची सेवा हीच देव सेवा.

प्रत्येक माणसाचें जीवन पहा! उठतां बसतां चालतां बोलतां तो कुठें ना कुठें अडचणींत अडकलेला जातोच. निर्वेध असें जीवन त्याला लाभत नाहीं. त्याच्या मार्गांतील अडचणीं दूर करण्यासाठीं झटणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे. मनुष्य गरीब असो, आपल्या शक्तीप्रमाणें, त्याला इतरांच्या उपयोगी पडतां येण्याचीं शक्यता आहे. तुमचें क्षेत्र कोणतेंही असो. ईश्वराच्या कोणत्याही व्यवसायांत किंवा परिस्थितींत तुम्हांला घातलेलें असो. तेथें वावरत असतां दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्याचे, दुसऱ्याची सेवा करण्याचे जे जे प्रसंग येतील ते तुम्हीं साधले पाहिजेत. ते कधीहि वाया दवडतां कामा नये. अशा या सेवेचा मनाला अहंकार वाटण्याचें कांहींच कारण नाहीं अशा रीतीनें मी दुसऱ्यावर उपकार करीत आहे ही भावनाही जागृत होण्याचें कारण नाहीं. कारण मानव जन्म देवानें आपणास दिला तो हेंच कर्तव्य पालन करण्यासाठीं. बाबांनीं काय केलें? इतर साधुसंतांनीं काय केलें? त्यांनीं आपले जीवन कसें शोभविलें? जें त्यांनीं केलें व ज्या गुणांच्या बळावर ते अजरामर झाले, त्यांच्या त्या गुणांचें अनुकरण आम्हांला अंशतः तरी कां करतां येऊं नये!

माणसावरच नाहीं तर साऱ्या प्राणीमात्रांवर दया करा, असें बाबांनीं सांगितलें आहे. दया हेंच धर्माचें मूळ आहे. दया दाखविणें म्हणजे काय? दुसऱ्यांच्या अडीअडचणींबद्दल, दुःखांबद्दल करुणा वाटणें व ती वाटून दुसऱ्यांचें दुःख, दैन्य जें कांहीं असेल तें दूर करण्यासाठीं झटणें. हा दयेचा धर्म आम्हीं ओळखला पाहिजे व तो आचरणांत आणण्यासाठीं अहोरात्र झटलें पाहिजे.

देवाची भक्ती करणें म्हणजे काय करणें याची आम्हीं बरोबर जाणीव करून घेतली पाहिजे. आज आपण नव्या जगांत वावरत आहोंत. आपली दृष्टि आज विशाल झालेली आहे. या नव्या युगाचा धर्म कोणता, या नव्या युगांत आपलें कर्तव्य कोणतें, या युगांत आपला देव कोणता हें आपण ओळखलें पाहिजे व त्या देवाची आपण पूजाअर्चा केली केली पाहिजे. बाबांनीं आपणास आपल्या कर्तव्याची जाणीव

करून दिली आहे. देव कुठें आहे व त्या देवाची भक्ति कशी करायची हेंही आपल्या वर्तनानें अहर्निश दाखवून दिलें आहे.

मानव हाच आपला देव व त्याची यथाशक्ति सेवा करणें हीच आजच्या युगांतील आपली पूजा आणि अर्चा. याचा अर्थ मानवसेवा म्हणजेच देवसेवा. आजच्या युगांत बाबांनीं दिलेला हा संदेश झेलणें व तो आचरणांत आणण्यासाठीं झटणें हेंच आपलें कर्तव्याचरण होय. तें ज्या प्रमाणांत आपल्याकडून घडेल त्या प्रमाणांत देवाधिदेव आमच्या सन्निध येईल.

बाबांचे पुण्यस्मरण सर्व आधिव्याधींचा नायनाट करणारें आहे. तें आज उद्यां आणि सर्वकाळ आपण करावयाचें आहे. बाबांनीं दाखवून दिलेल्या मार्गानें जाणें, त्यांच्या पावलावर पाऊल टाकण्यासाठीं झटणें हेंच बाबांचें खरेंखुरें पुण्यस्मरण होय. बाबांना आनंद अशाच आपल्या वागण्यानें होणार आहे. तेव्हां त्या मार्गानें जाण्याचा आपण निर्धार करूंया व आपलें कल्याण साधूंया. बाबांची ही प्रेरणा सर्वांच्या वाट्यास येवो हीच त्यांच्या चरणीं प्रार्थना.

— संपादक

MATUNGA CLEANING WORKS
ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN
MODI NIWAS, BOMBAY 19
Washers, Dyers and Dry Cleaners.
A Pleasure to You—A Satisfaction to Us
Chemical Cleaners, Super Fine Darners
Master Dyers
*FOR*
Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths
सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार
माटुंगा क्लीनिंग वर्क्स
स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ ( मालक : एस्. व्ही. प्रधान

# ह. भ. दासगणू महाराज

ह. भ. प. दासगणू महाराज हे रसाळ व भक्तिभावपूर्ण कीर्तनकार या नात्यानें सुविख्यात होते. त्यांच्या कीर्तनाची गोडी कांहीं आगळीच असे. त्यांच्या कीर्तनाख्यानापैकीं २१३ आख्यांनाचा येथें थोडक्यांत परिचय करून देण्यांत येत आहे.

## रामदास

रामदासस्वामींच्या आख्यानामध्यें संसारलोलुप माणसाचें चित्र स्पष्टपणें रेखाटलें गेलें आहे. बाजीपंत नांवाचा एक शेकदार सातारा जिल्ह्यांतील शहापुरास राहात असे. त्याचें वर्णन करतांना महाराज लिहितात कीं—

" लोलूप भवीं जो सदा, हरीच्या पदा, कदा ना ध्याई।
संसार तयाची मुख्य देवता पाही।
नित बंधि गळ्या, घर, वाडे-घेतसे गाडे-करी नग स्त्रीला।
एवंच जयानें देह भवासी विकला॥ "

रामदासस्वामी भिक्षा मागत असतांना एक दिवस या बाजीपंताच्या घरीं आले आणि त्यांनीं रामनामाची गर्जना केली. ती ऐकतांच विपरीत कल्पना असलेल्या घरधननीला राग आला. ती म्हणाली—" माझें घर लेंकराबाळांनीं भरलेलें आहे. अशा ठिकाणीं हें ओंगळ बोलूं नको. " रामदासस्वामी हंसून म्हणाले—' बाई, जें खरंच मंगल आहे, त्याला अमंगळ म्हणतेस; रामनामाच्या महतीची तुला कल्पना नाहीं. ' हें सांगणें बाईला पटलें नाहीं. समर्थ जों जों रामनामाची महती गाऊं लागले, तों तों ती अधिकच संतापली आणि शेवटीं तर तिनें आपल्या हातांतील पोतेरें समर्थांच्या तोंडावर फेंकून मारलें. समर्थ सत्पुरुष त्यांना राग आला नाहीं. बाईच्या अज्ञानाची मात्र त्यांना कींव वाटली. पोतेरें घेऊन स्वारी नदीवर परतली आणि तें धुऊन स्वच्छ केलें. त्याचे कांकडे वळून त्या सावित्रीबाईकरितां ते रामास आळवूं लागले.

पुढें बाजीपंतांच्या पापाचा घडा भरला. मोंगलाई जागी झाली आणि २५-३० वर्षांनंतर तिला उजाडलें कीं, बाजीपंत गेलीं कित्येक वर्षें पैशाची अफरातफर करतो आहे. मोंगलाई अंदाधुंदींत असें होणें अगदीं शक्य आहे! या अंदाधुंदीचें महाराजांनीं मोठें मार्मिक वर्णन केलें आहे. कडव्या शिपायांचा एक जथा येऊन बाजीपंतांस पकडून घेऊन गेला. त्यावेळीं सावित्रीबाईस अर्थात्च अत्यंत दुःख झालें आणि तिला ठामपणें वाटलें कीं,

" माझ्या येऊन भरल्या घरीं भलभलतें तो जोगडा।
गेला बोलुन त्याचें फळ, पडला पतिच्या पायीं खोडा॥ "

आणि मग ती बाई भराभर नवस करूं लागली—

" सत्वरी पाव तूं मला, प्रभो घेराला, पतीला येऊं दे सुटून माझ्या
खंडोबा जेजुरीच्या राजा !
तुझा तोडिन लंगर खरा, वाहिन भंडारा, उभयता येऊं गडावरी ।
वारि ती मागुं आदितवारीं ।
तुझी परडी घेइन बया, येऊं द्या, कवड्यांची माळ घालिन कंठीं ।
भौमवासरें करिन खेटीं ।
मुंजास नारळ फोडीन, कोंबडे वाहीन, धुळोवा वेताळ देवाला ।
मलीदा दावलमलकाला ।
गणुदास म्हणे या रितीं, बाई ती सती, खुळ्यासम नवस करी फार ।
टाकुनी राजा रघुवीर ॥ "

हे नवस व त्या मागची मनोवृत्ति पाहिली कीं सकाम संसारी माणसाचें चित्र हुबेहूब डोळ्यासमोर उभें राहतें. पुढें बाजीपंतास पश्चात्ताप झाला, रामरायाच्या कृपेनें त्याची सुटका झाली. रामदासस्वामींचा अधिकार केवढा आहे, हें कळल्यावर सावित्रीबाईस आपल्या वर्तनाचा अत्यंत विषाद वाटला व तिनें समर्थांचे पाय धरले. त्यावेळीं सहानुभूति व्यक्त करणारा, क्षमेचा हात त्यांच्या मस्तकावर ठेवीत म्हणाले—

" केलें कौतुक राघवें मजवरी, आरोप ना हा करी ।
नामाची महती तुला समजली ती मात्र चित्तीं धरा ।
जाहे हा नरदेह याचकरितां घ्यावें प्रभूच्या पदां
भक्तांचीं नित संकटें हरुनियां तो त्यां नुपेक्षी कदा ॥

## दादाजी

दादाजी या नांवाच्या समर्थांच्या शिष्यांच्या चरित्रामध्यें छत्रपति शिवरायाच्या ओवाळणीचा एक प्रसंग मोठा बहारीचा आहे. एका मारुतीच्या देवळामध्यें एक ब्राह्मण सुवासिनी हातांत पंचारती घेऊन भाऊबीजेच्या दिवशीं दर्शनास आली होती. शिवबाहि त्याच मंदिरांत बसले होते. आपणांस ओवाळण्यास कोणी बहीण नाहीं, त्यामुळें ते खिन्न झालेले होते. ती बाई त्यांना म्हणाली, ' बाबा, मला भाऊ नाहीं, या देवळांत तूंच मला प्रथम भेटलास; तुला मी भाऊ म्हणून ओवाळलें तर चालेल ना ? ' शिवबा म्हणाले,

" मराठा मी, ब्राह्मण नसे साचा ।
वंश वेरुळच्या वाई पाटलाचा ॥ "

त्यावर बाई म्हणाली, ' तुझ्या मुद्रेवरून व वेषावरून तूं शूरवीर दिसतोस आणि

" सैनिक जे असति कीं कुलशीलवंत ।
त्यांच्या समस्त भरल्या बहिणी जगांत ॥ "

भावा-बहिणीचें नातेंच असें आहे कीं, त्यांत जातींचा प्रश्न उद्‌भवत नाहीं. आणि मग तिनें शिवबाला ओवाळलें, अन्‌ ती म्हणाली,

"हे क्षत्रियकुलभूषणा, नरवीरा कांहीं कर।
नांव आपुलें देशामधें शस्त्राच्या जोरावर॥"

याप्रमाणें वीरश्री चेतविणारें आणि देशाच्या परिस्थितीविषयीं अत्यंत कळवळ्याचे उद्‌गार ऐकून शिवबांचें हृदय भरून आलें. ते म्हणाले, 'बाई, मी ओवाळणी मागाहून पाठवून देतों. आतां माझ्याजवळ कांहीं नाहीं.' त्यावर बाई लगेच म्हणाली—'देणार असशील तर—

"ओवाळणी नरवरा मज हीच घाली॥
हा देश दीन अपुला करि भाग्यशाली॥"

शिवबांना या उद्‌गारांचें अत्यंत कौतुक वाटलें आणि ते म्हणाले, 'बाई, तुझ्यासारखें देशप्रेम प्रत्येक स्त्रीच्या अंतःकरणांत राहील, तर देशाचें भलें होण्यास वेळ लागणार नाहीं.'

## चोखामेळा

चोखामेळ्याच्या चरित्रांत भक्तीसाठीं पांडुरंग किती प्रकारांनीं कष्ट करतो, व संतांपुढें आपला मोठेपणा कसा विसरतो, याचें भक्तिरसपूर्ण वर्णन हृदयाला भिडणारें आहे. चोखोबाच्या हृदयांत परमेश्वराविषयीं भक्तीचा जिव्हाळा किती उत्कंटतेनें होता, हें दाखविणारीं मनोहर पदें या आख्यांत विपुलच आहेत; पण हें महाराजांच्या सर्वच आख्यानांचें वैशिष्ट्य आहे. संतांच्या हृदयांतील ईशप्रेम वर्णन करीत असतांना त्यांच्या वाणीला एक प्रकारचा अलौकिक रसाळपणा येतो, कवित्वाला स्फूरण चढतें आणि प्रतिभा शरद ऋतूंतील सृष्टीप्रमाणें सौंदर्यानें उठून दिसते. त्यामुळें नमुन्यासाटीं वर उल्लेखलेलीं त्यांच्या सत्तर आख्यानांपैकीं १७–१८ आख्यानें या विभागाची ओळख पटवून देण्यास पुरेशी आहेत. या प्रत्येक आख्यानाची रचना खरोखरीच मोठी नाट्यपूर्ण आहे. एखाद्या उत्कृष्ट, भावपूर्ण प्रसंगाचा केंद्रबिंदु साधून त्याभोंवतीं काव्यमय पद्यांची रचना अतिशय सरसपणें केली जाते. मधून मधून निरनिराळ्या प्रसंगांत गोंविलेले काव्यमय दंश इतके मार्मिक असतात कीं, ऐकणाराचें हृदय आनंदानें उचंबळून यावें व बुद्धि स्तिमित व्हावी, मात्र ही सर्व आख्यानें श्राव्य काव्यें आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. बहुश्रुत कीर्तनकाराच्या तोंडून सांगितलीं जाणारीं ही आख्यानें प्रत्यक्ष ऐकत असतांना जो आनंद रसिकांस उपभोगतां येईल तो तितक्याच उत्कटतेनें वाचतांनाहि येइलच असें सांगतां येणार नाही. कारण प्रसंगानुकूल असलेली पद्याची चाल, व्यक्तीच्या दर्जाला शोभेल अशी त्यांतील भाषा व विषयाला उठाव देईल, असा अर्थगौरव यांचें प्रत्यक्ष ज्ञान, कविता गाइल्या जात असतांना जसें होईल, तसें वाचतांना होणें कठीण आहे. सर्व आख्यानें ही कीर्तनाकरितांच रचलीं गेलीं असल्यानें त्या भूमिकेवरूनच त्याचें रसग्रहण केलें गेलें पाहिजे.

महाराजांशीं ज्यांना प्रत्यक्ष संबंध आला, त्या सर्व रसिक विद्वानांनीं हें वैशिष्ट्य निरपवादपणें मान्य केलेलें आहे. साहित्यसम्राट न. चिं. केळकर अहिल्याबाईच्या आख्यानासंबंधीं लिहिलेल्या पत्रांत लिहितात, "आपल्या कवित्वासंबंधीं वेगळें लिहिण्याचें कारणच नाहीं. तें नेहमीं शीघ्र तसेंच प्रासादिकहि असतें. तसेंच या कीर्तनांतहि आहे. कटाव चांगले साधले आहेत, एखादी आर्याहि अस्सल मोरोपंती थाटाची आढळते. पुढल्या वर्षीं आपण याल, तेव्हां हें कीर्तन समक्षच ऐकावयास मिळाल्यास हा लेखी प्रबंध वाचल्यापेक्षांहि अधिक आनंद होईल." भारताचार्य चिंतामणराव वैद्य लिहितात, "महिपतींनीं लिहिलेलीं संतचरित्रें घेऊन प्रसिद्ध कवि दासगणु हे स्वकृत कवितांनीं गात आहेत, हा यांत सुवर्ण व सुगंध असा मनोहर योग आहे. भक्तिरसप्रधान नव्या तऱ्हेची कविता करणें, यांत संततुल्य दासगणू यांचा हातखंडा आहे वृत्तमाधुर्याबरोबर शब्दमाधुर्य व त्याबरोबरच अर्थमाधुर्य असा त्रिवेणीसंगम आपली यांत आहे. सुंदर उपमा, रूपक, दृष्टांत इत्यादि काव्यचमत्कृतींनीं विषय मनावर ठसविण्याची दासगणू यांची हातोटी या आख्यानांतहि पूर्णपूर्णे भरलेली आहे. पण यांहि पलीकडे कांहीं ऐतिहासिक व राजकीय कल्पनाहि या आख्यानांत आलेल्या दाखविण्यासारख्या आहेत."

प्राध्यापक श्री. नी. चाफेकर हे तर श्रीदासगणू महाराजांच्या आख्यानकाव्याला अगदीं मोहूनच गेलेले दिसतात. त्यांनीं महाराजांच्या काव्याला लिहिलेल्या प्रस्तावना यासाठीं जिज्ञासूंनीं अवश्य पहाव्या.

एका आख्यानाच्या प्रस्तावनेंत ते लिहितात, "श्रावण महिन्यांत लाखोल्यासाठीं पारिजातकाचीं फुलें गोळा करण्यासाठीं एखादा भाविक मनुष्य एखाद्या पारिजातकाच्या वृक्षाजवळ गेला आणि त्या वृक्षाखालीं पसरलेला दाट असा मृदुमनोहर पुष्पांचा सडा पाहिला, म्हणजे कोणतीं वेचूं, किती वेचूं हें न कळून भांबावून जातो.

॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

**महिला वस्तु भांडार**

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें लोकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.


**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

**※ आमची कोठेंही शाखा नाहीं. ※**

त्याप्रमाणेंच प्रस्तावना लिहितांना माझी स्थिति झाली आहे. संत सत्कवि श्रीदासगणू महाराजांसारख्यांच्या उज्वल प्रतिभा सिंचनानें विकसित झालेला अध्यात्मिक सौरभयुक्त व प्रसादपूर्ण, गद्यपद्यात्मक, रम्यपुष्पसंभार पाहिला म्हणजे माझ्यासारखा भक्तिप्रधानवाङ्मयरसलोलुप भाविक भांबावून गेला आणि हें फूल हुंगूं कीं तें हुंगूं; कीं ओंजळींत मावतील इतकीं फुलें एकदम हातीं घेऊन त्यांचेंच आघ्राण घेत राहूं, व इतरांनाहि त्यांचा यथाशक्ति सौरभपरिचय करून देऊं अशा गोड घोटाळ्यानें त्याची मनोवृत्ति गांगरून गेली, तर त्यांत नवल तें काय ?"

"चरित्रांतील प्रसंग कीर्तनरूपानें सर्वसामान्य लोकांना विशेष आकर्षक व उद्बोधक होण्यासाठीं श्रीदासगणू महाराज त्या कथानकांतील महत्त्वाच्या भागांस आपल्या भक्त्युत्कट, कल्पकतेची जोड देऊन ते ते भाग कीर्तनाच्या ओघांत जास्त उठावदार, भक्तिनिष्ठ, करुणरसपरिपूर्ण, व दिव्याद्भुतरसप्लुत होतील अशी योजना करतात. मोजक्या व मार्मिक शब्दांत हुबेहूब शब्दचित्रें श्रोत्यांच्या मनःचक्षुपुढें उभीं करणें, प्रसंगानुसार स्थलकालादि निरनिराळ्या व्यक्तींचीं, गोष्टींचीं, यात्रामिरवणुकींचीं, साधुसंतांच्या मेळ्यांचीं, भजनकीर्तनाचीं, दुष्काळ, साथी वगैरेंच्या भीषण कहराचीं, उदात्त भावनांचीं, उदार हृदयांचीं, भावपूर्ण भाषणांचीं, स्वराज्यकालीन शूरांचीं, वीर स्त्रियांच्या तेजस्वी व स्वार्थत्यागयुक्त थोर कृत्यांचीं चटकदार व स्फूर्तिदायक वर्णनें, साधारण जनांस प्रिय होतील असे कटाव, लावण्या, श्रुतिमनोहर संगीत वगैरेंत सहज लीलेनें योजणें इत्यादि काव्यगुणांमुळें महाराजांचीं कीर्तनोपयोगी आख्यानें हीं आदर्श आहेत, असें म्हटलें पाहिजे."

उमरावतीचे प्रा. नारायण भूमय्या जवादीवार यांनींहि महाराजांच्या काव्यकौशल्याचीं आपल्या लेखांतून खुप स्तुति केलेली आहे. सेवक सेवानंद श्री. बाळूकाका कानिटकर श्री. महाराजांचे पुण्यास होणारे एकहि कीर्तन कधीं चुकवीत नसत. विद्वान् लोकहि महाराजांच्या कीर्तनानें असे मोहून गेलेले आहेत. भाविक श्रोत्यांच्या बाबतींत तर बोलावयासच नको.




## साइभक्तांस अमूल्य संधी

साईलीला मासिकाचे सन १९५८ ( त्रैमासिक ) ते एप्रिल १९५९, ६०, ६१ व ६२ ( मासिक ) मार्चपर्यंतचे कांहीं अंक शिल्लक असून ते विक्रीस काढले आहेत, फुटकळ अंकास ( विशेष अंकांसह ) प्रत्येकीं ४ आणे. पोस्टेज निराळे. एक अंकासाठीं पोस्टेज ८ नये पैसे व चार अंकास २० नये पैसे पाठवावे.

# तुकोबारायांची उपरति

धन्य देहू गांव पुण्यभूमि ठाव । तेथें नांदे देव पांडुरंग ॥
धन्य क्षेत्रवासी लोक दैवाचे । उच्चारिती वाचे नामघोष ॥ १ ॥
करकटीं उभा विश्वाचा जनिता । वामांगी ते माता रखुमाई ।
गरुड पारीं उभा जोडोनियां कर । अश्वत्थ समोर उत्तरमुख ॥ २ ॥
दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर । शोभे गंगातीर इंद्रायणी ॥
लक्ष्मीनारायण बल्लवाचें वन : तेथ अधिष्ठान सिद्धेश्वर ॥ ३ ॥
विघ्नराज द्वारीं बहिरव बाहेरी । हनुमंत शेजारीं सहित दोघे ॥
दास तुका तेथें करितो कीर्तन । हृदयीं चरण विठोबाचे ॥ ४ ॥

तीनशें साडेतीनशें वर्षांपूर्वीची गोष्ट. पुण्याच्या वायव्येला इंद्रायणी नदीच्या तीरीं देहू गांव आज आहे तसाच त्यावेळींहि होता. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज या गांवीं शके १५३० या वर्षी जन्मले. हे जन्मतः वैश्यवर्णी असून त्यांचें आडनांव आंबिले असें होतें.

तुकोबांच्या मागच्या सात पिढ्या या देहू गांवांतच गेल्या. त्यांचे मूळ पुरुष विश्वंभरबोवा यांनीं तेथें श्रीविठ्ठल-रखुमाईचें देऊळ बांधलें होतें. तरुणपणीं ते पंढरपुरची वारी नियमानें करीत. एकदां तर त्यांनीं एका वर्षांत सोळा वाऱ्या केल्या होत्या ! पुढें वृद्धापकाळीं आपलें पंढरीस जाणें होत नाहीं हा विचार मनांत येऊन ते फार कष्टी झाले. तेव्हां त्यांची दृढभक्ति पाहून श्रीविठोबारायांनींच देहूला येण्याचें ठरविलें आणि विश्वंभरांना दृष्टान्त झाला कीं, मी तेथें नजीकच 'आंबियाचे वनांत' आहे. त्याप्रमाणें विश्वंभरबोवांनीं तपास करतां देहूनजीकच्या 'आंबियाचे वनांत' त्यांना पांडुरंग व रखुमाई यांच्या सुंदर मूर्ति सांपडल्या. तेव्हां पंढरीचा विठोबाच देहू गांवांत आला असें समजून त्यांनीं त्यांची मोठ्या भक्तिभावानें इंद्रायणीच्या तीरीं स्थापना करून एक देऊळ बांधलें आणि आपला राहिलेला काळ तिथेंच विठ्ठलाच्या भजनपूजनांत घालविला.

विश्वंभरबुवांना हरि आणि मुकुंद असे दोन मुलगे होते. पण त्यांचें लक्ष देहूंतील देवाकडे विशेषसें नव्हतें. त्यांनीं आपला वडिलार्जित वाणिज्य व्यवसाय सोडला आणि ते एका राजाच्या नोकरीला राहिले. त्यांनीं तिथें पुष्कळ द्रव्य मिळविलें; पण पुढें त्या राज्यावर परचक्र आलें असतां हे दोघेहि लढाईंत ठार झाले.

हरीची बायको यावेळीं गरोदर होती. तिला पुढें मुलगा झाला त्याचें नांव विठोबा. तुकाराम महाराज हे या विठोबाचेच वंशज होत.

तुकाराम महाराजांच्या वडिलांचें नांव बोल्होबा व आईचें नांव कनकाई असें होतें. त्यांचा पहिला मुलगा सावजी, दुसरा तुकोबा आणि तिसरा कान्होबा.

तुकारामाचें बालपण आईबापांच्या सान्निध्यांत सुखानें गेलें. बोल्होबांचा व्यापार चांगला चालला होता. देहू गांवांत त्यांना 'महाजनकीचा अधिकार होता. थोडीशी शेतीहि होती. आणि हें कुटुंब चांगलें खाऊन पिऊन सुखी होतें.

तिन्ही मुलगे मोठे झाले, तसें बोल्होबांनीं त्यांना लिहिणें वाचणें, हिशेब ठेवणें वगैरे व्यापाराला अवश्य तें शिक्षण दिलें; पण त्यांचा वडील मुलगा सावजी याचें पहिल्यापासूनच सांसारिक गोष्टींकडे लक्ष नव्हतें' पुढें आपलें वृद्धपण झालें असें जाणून बोल्होबांनीं प्रपंचाचा भार त्याच्यावर घालण्याची गोष्ट काढली, तेव्हां त्यानें चक्कच सांगितलें कीं, " बाबा, प्रपंचांत मन घालावें असें मला वाटत नाहीं, मी यापूर्वीच तीर्थाटनास निघून गेलों असतों; पण तुम्हांला व आईला वाईट वाटेल म्हणून गेलों नाहीं. पण मला हा प्रपंचाचा भार नको. "

वडील मुलानें अशा रीतीनें संसाराचा भार आपल्या शिरावर घेण्याचें नाकारलें तेव्हां तो अर्थांतच त्याच्या धाकट्या भावावर–तुकारामावर पडला.

तुकोबांच्या गळ्यांत घरचा प्रपंच पडला त्यावेळीं त्यांचें वय अवघें १३ वर्षांचें होतें. त्यांचीं दोन लग्नें झालीं होतीं. पहिल्या बायकोचें नांव रखमाबाई. हिला दम्याचा विकार होता म्हणून पुणें येथील आप्पाजी गुळवे नांवाच्या एका श्रीमंत गृहस्थाच्या मुलीशीं त्यांचें दुसरें लग्न झालें होतें. या बायकोचें नांव जिजाई असें होतें. तुकोबा तिला प्रेमानें ' आवली ' म्हणत. हिचें माहेर श्रीमंत होतें आणि तिचें लग्न झालें तेव्हां सासरही श्रीमंतच होतें. पण सासरची श्रीमंती फार दिवस टिकली नाहीं. बोल्होबा कनकाई सृष्टिक्रमाप्रमाणें वृद्धापकाल होऊन मरण पावलीं; वडील मुलगा सावजी याची बायकोहि नंतर लौकरच वारली, तेव्हां सावजीच्या मूळच्या उदासीनतेंत आणखी भर पडून तो घर सोडून निघून गेला.

व्यापार–धंदा प्रथम बरा चालला होता. पण त्यांत पुढें खोट येऊं लागली. वाडेलांच्या वेळचें द्रव्य संपुष्टांत आलें. घरीं कुटुंबाचा खर्च मोठा, तेव्हां कांहीं तरी धडपड करून पैसा मिळविण्याचे अनेक उद्योग तुकोबांनीं करून पाहिले. पण कशां-तच यश येईना. लोकांकडून कर्जाऊ रकमा घ्याव्या; माल खरेदी करून बैलांच्या पाठीवर घालून तो गांवोगांव नेऊन विकावा आणि चार पैसे मिळाले तर पहावे; पण वाटेंत कोणी दुःखी–गरजू मनुष्य भेटला म्हणजे स्वतःच्या घराचा विसर पडून त्यांनीं त्या दुःखी माणसाचें दुःख निवारण करण्याकडे त्या पैशांचा उपयोग करावा असें वारंवार होऊं लागलें. अर्थात् घरीं बायका कुरकुर करूं लागल्या.

विठोबाच्या भक्तीचा ध्यास तुकोबांना पहिल्यापासून होताच. तेव्हां जिजाई प्रेमळपणानेंच पण कठोर शद्बांत त्यांना उपदेश करीः " हें देवाचें वेड टाका आणि

चार लोकांसारखा व्यापार करून पैसा मिळवा." पण जें तुकोबांच्या स्वभावांतच नव्हतें तें असल्या उपदेशानें त्यांना थोडेंच साधणार !

या कालांतल्या त्यांच्या परोपकाराच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. "रस्त्यांत कोणा पांथस्थाची गांठ पडली तर त्याला विसांवा देण्यासाठीं त्याचें ओझें बुवांनीं आपल्या पाठीवर वहावें; गांवांत आलेले कोणी वाटसरू पावसांत सांपडले तर त्यांना चावडीवर नेऊन पोंचवावें किंवा आपल्या घरींच न्यावें; कोणा यात्रेकरूचे प्रवासामुळें पाय सुजले तर त्यांना तेल लावून ऊन पाण्यानें ते शेकावे; कोणी निर्दय लोकांनीं निकामी झालेले गाईबैल सोडून दिले तर बुवांनीं त्यांना चारापाणी घालून कुरवाळावें; उन्हाळ्यांत कीर्तनाचे वेळीं उष्मा होऊं लागला तर हातांत पंखा घेऊन लोकांना वारा घालावा; कोणी दुर्दैवी मनुष्य अन्नाविणें उपाशी मरत आहे असें आढळलें तर हरप्रयत्न करून त्याला अन्न घालावें; एकादा पांथस्थ वाटेंत आजारी पडला तर त्याला देवळांत नेऊन ठेवावा आणि तिथें त्याची शुश्रुषा करावी." तात्पर्य 'जे कां रंजले गांजले' असतील त्यांना गरीब-श्रीमंत, लहान-मोठे हा भेद लक्षांत न घेतां आपलेपणानें होईल ते साह्य करावें असा तुकारामाचा क्रम चालू होता.

सामान्य लोकांना तुकारामाचीं हीं कृत्यें अर्थातच वेडसरपणाचीं वाटत आणि त्यांनीं त्याला 'वेडा' ठरवूनही टाकलें ! पण वास्तविक पाहिलें असतां हीं कृत्यें परोपकाराच्या सदरांतच घातलीं पाहिजेत. लोक असल्या पुरुषांना 'वेडे' म्हणोत, पण ते स्वतः अंतःकरणाचे कोमल, परदुःखानें दुःखित होणारे असतात. दुसऱ्यांचें दुःख पाहिल्यावर त्यांच्या हृदयाचें पाणी पाणी होतें; स्वतःच्या सुखसोईकडे त्यांचें लक्ष नसतें आणि दुसऱ्यांचें दुःख हलकें झालेलें पाहूनच त्यांना आनंद होतो. संतांचा हा देहस्वभावच असतो.

तुकारामाचा वर्तनक्रम अशा रीतीनें चालू असतांना एका वर्षी देशांत भयंकर दुष्काळ पडला. माणसाला अन्न मिळण्याचीहि पंचाईत पडली. तुकारामाचा संसार नीटसा चालत नसेच; त्याच्या परोपकाराच्या पायीं व्यवहारांत वारंवार खोट येऊन होतें नव्हतें तें सर्व नाहींसें झालें होतें. कर्जवाम करून थोडे दिवस त्यानें कसेबसे निभावून नेले. पण शेवटीं तोही उपाय खुंटला. त्याचें दिवाळें निघून सावकारांनीं घर धुवून नेलें ! त्यांत ही दुष्काळाची आपत्ति आली. आणि त्यांत त्यांची पहिली बायको आणि लहान मुलगा—शिवाजी—हीं अन्न अन्न करून मेलीं ! या दुःखानें तुकोबाच्या मनाला मोठा धक्का बसला आणि त्यांचें संसारांतलें लक्ष अधिकच उडालें ! त्यानेंहि पाहिलें कीं आपण संसाराला कवटाळून बसतों म्हणून आपल्या मनाला दुःख होतें; त्यापेक्षां सावजीप्रमाणें या संसाराला लाथ मारून देवाच्या शोधाचाच मार्ग पत्करावा. आतांपर्यंत आपण या संसारांत गुंतून राहिलों हीच चूक झाली. आतां ती सुधारली पाहिजे.

असा विचार करून तो वारंवार घरदार सोडून इंद्रायणीच्या पलीकडील 'भामनाथ' डोंगरावर जाऊन विठोबाचें नामस्मरण करूं लागला. त्यांत त्याला चांगली मनःशांति लाभली. त्याला अखेरीस वाटूं लागलें,

**'बरें झालें देवा ! निघालें दिवाळें ॥ बरी या दुष्काळें पीडा केली ! ॥ १ ॥**
**अनुतापें तुझें राहिलें चिंतन ॥ जाला हा वमन संवसार ॥ २ ॥**
**बरें झालें देवा ॥ बाईल कर्कशा ॥ बरी ते दुर्दशा जनामध्यें ॥ ३ ॥**
**बरें झालें जगीं पावलों अपमान ॥ बरें गेलें धन, ढोरें गुरें ॥ ४ ॥**
**बरें झालें नाहीं धरिली लोकलाज ॥ बरा आलों तुज शरण देवा ॥ ५ ॥'**

दिवसांतला बराचसा वेळ–महिन्यांतले बरेचसे दिवस–आणि वर्षांतले बरेचसे महिने अशा रीतीनें दूर एकांतांत घालवावयाचे; ज्ञानदेव–नामदेव आदिकरून पूर्वी होऊन गेलेल्या संतांच्या ओव्यांचें नि अभंगांचें पारायण करावयाचें; डोंगरावर इतस्ततः पडलेल्या धोंड्याचेच टाळ करून मोठ्यानें भजन करावयाचें; 'देवा ! मला केव्हां भेटशील ?' म्हणून आर्त स्वरानें त्याची प्रार्थना करावयाची आणि मधून मधून डोळे मिटून ध्यानस्थ बसावयाचें; अशा रीतीनें देवाचा शोध हेंच आतां तुकोबांचें ध्येय झालें.

जेव्हां ते गांवांत येत तेव्हांही कुठें देवळांत कीर्तन असलें तर हरिदासाच्या मागें वीणा धरून उभें रहावें; भजन चाललें असतां नाचूं लागावें; भूक–तहान तर कधीं पर्वाच नाहीं; घरीं आले तर आले नाहीं तर नाहीं; आलेच तर बरोबर कोणा गोसाव्याला अगर दुःखी कष्टी जीवाला घेऊन यावें आणि घरांत असेल नसेल तें त्याला देऊन टाकावें; कधीं त्यांच्यांबरोबर घरींच भजन करीत बसावें; अशा प्रकारचें त्यांचें वर्तन होऊं लागलें.

हा सगळा प्रकार जिजाईला कसा पाहवणार ? नवऱ्यानें संसार सोडला म्हणून तिच्यानें थोडाच सोडवणार होता ! नवऱ्याच्या या 'वेडा' बद्दल तिला फार दुःख होई. घरांत अन्नाचा कण नाहीं, माहेराहून किंवा दुसऱ्या कोणाकडून कांहीं आणलें तर हा 'पिसा' नवरा तें दुसऱ्यास देऊन टाकतो, अंगावर धड वस्त्र नाहीं, पोरें भुकेनें तडफडताहेत, शेजारींपाजारीं हांसताहेत, अशा स्थितींत तिच्या तोंडून वेडेवांकडे शब्द निघाले तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नव्हतें.

तुकोबांना हें सर्व कळत नव्हतें असें नाहीं, आणि म्हणूनच ते तिला उलट न बोलतां शांत असत. तिची घरांतील आदळ–आपट आणि तोंडाची सरबत्ती यांचें वर्णन तुकोबांनींच केलें आहे तें असें :—

**" मजची भोंवता केला येणें जोग । काय याचा भोग अंतरला ॥ १ ॥**
**चालोनीयां घरा सर्व सुखें येती । माझी तों फजिती चुकेचिना ॥ २ ॥**

कोणाची बाईल होऊनियां बोटूं ? । संसारी काढूं आपदा किती ? ॥३॥
काय तरी देऊं ? तोडितील पोरें । मरतीं तरी वैर होतें आतां ! ॥ ४॥
कांहीं नेदी वांचों धोवियेलें घर । सारवावया दोर शेण नाहीं ॥ ५॥

तसेंच :—

" आतां पोरा काय खासी ? गोहो जाला देवलासी ॥ १ ॥
डोचकें तिंबी, घातल्या माळा । उदमाचा खंडी चाळा ॥ २ ॥
आपल्या पोटा केली थार । आमचा नाहीं येसपार ॥ ३ ॥
हातीं टाळ तोंड वासी । जाय देवळीं देवापाशी ॥ ४ ॥
आतां आम्हीं करू काय ? न वसे घरीं राना जाय ॥ ५ ॥

संत–चरित्रकार महीपतीही जिजाबाईच्या या वेळच्या उद्गारांविषयीं म्हणता:

"मुलें लेंकुरें कुटुंब फार । यांसी मिळेना अन्नवस्त्र ।
मजवरी टाकूनि संसार । पर्वतावर बैसला ॥ १ ॥

× × ×

जन्म जन्मांतरीचें होतें वैर॥ तेंचि साधिलें साचार ।
पाठीं बैसला दावेदार । झाली मरमर संसारीं ॥ २ ॥
माझ्या कंठीं बांधूनि मणी । फुकटचि झाला असे घणी ।
दूर बैसतो जाऊनी । एकान्तस्थानीं पर्वतीं ॥ ३ ॥

× × ×

बहुधा खर्च करूनियां धन । पितयानें केलें थोरलग्न ।
पिशाचे पदरीं बांधिलें जाण । शेवटीं प्राक्तन निवडिलें ॥ ४ ॥

---

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :— DIVYANETRA
शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]
यांच्या येथें तज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून
उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.
छबिलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८

# चोखामेळ्याचा चोख भक्तिभाव

अंत्यजजातींतहि चोखामेळा नांवाचा एक भगवद्भक्त होऊन गेला. त्यानें आपल्या दृढ भावानें परमात्मा प्रसन्न करून घेतला होता. तो आपल्या कुटुंबासह पंढरपूर क्षेत्रांत वास्तव्य करीत असे. भीमेमध्यें स्नान करून सर्व क्षेत्राला प्रदक्षिणा घालावी आणि नंतर महाद्वारांत येऊन लोटांगण घालावें असा त्याचा क्रम असे. आपण अंत्यज असल्याकारणानें आपण देवासन्निध जाणें प्रशस्त नाहीं असें समजून तो बाहेरूनच हात जोडून ईश्वराला नमन करीत असे. त्याच्या अंगांत कर्तृत्व असल्यामुळें त्यानें आपल्या पौरुषाचा उपयोग सर्वव्यापी परमेश्वराला स्वाधीन करून घेण्याकडेच केला होता. त्याला खरा श्रेष्ठपणा प्राप्त झाला असल्यानें त्याच्या अंतःकरणांत अविद्येनें प्रवेश केला नव्हता. स्वतःला मूल होईना आणि सवत साहीना अशी त्याची अवस्था नव्हती. उच्चजातीचा श्रेष्ठपणा न साहून कर्तृत्वशून्य नीच जातींतील मनुष्यें उच्चवर्णीयांच्या नालस्तीनें आपली कार्यक्षमता लपवूं पाहतात तशांतला चोखामेळा नव्हता. तो अंत्यंज असून परोत्कर्षसहिष्णुत्वानें स्वतःचें नुकसान करून घेणारा नव्हता दुसऱ्याच्या थोरपणाचा मत्सर न करितां आपल्यालाच खरा मोठेपणा प्राप्त करून घेण्याकडे त्याची चित्तवृत्ति रममाण झाली असल्यानें त्याला दर्शनाकरितां देवळाच्या अंतर्भागांत जाण्याची फारशी अवश्यकता न वाटणें अगदीं सरळ होतें. वास्तवीक पाहतां अशा प्रकारच्या अंत्यजास श्रेष्ठवर्णांतील ब्राह्मण लोकांनीं कितीतरी मान द्यावयास पाहिजे होता. पण त्या काळच्या कांहीं ब्राह्मणांना गर्विष्टपणामुळें त्या हीन–जातीय चोख्याची किंमत ओळखितां आली नाहीं. यामुळें त्या ब्राह्मणांनीं त्याला दुरुक्तीनें खिजविलें. एके दिवशीं चोखामेळा महाद्वारामध्यें नामस्मरण करीत बसला असतां त्याला ब्राह्मण बोलले "चोख्या, विठोबाला तुझ्याविषयीं प्रेम नाहीं. तूं भक्ति करण्याचें व्यर्थ परिश्रम करीत आहेस. विप्रांच्या घरीं तयार झालेल्या पंचपक्वान्नांच्या ढिगाजवळ श्वानाचा शिरकाव होणें शक्यच नाहीं. रानोरानीं फिरण्याची पराकाष्ठा केली तरी भाग्यहीनाला कल्पतरू कधींही सांपडणार नाहीं त्याचप्रमाणें तुझी दशा आहे. तूं अंत्यज आहेस, या कारणानें तुला पांडुरंगाचें दर्शन होणार नाहीं. राउळांत जाण्याचा अधिकार आमचा ब्राह्मणांचा आहे. तुझ्यासारख्या नीचाला श्रेष्ठ पांडुरंग कसा भेटेल ?" ब्राह्मणांना अशी आढ्यतेची भाषा वापरण्याचें प्रयोजन नव्हतें. पण त्यांना पोकळ अहंकारानें पछाडल्याकारणानेंच ते अशी जल्पना करीत आहेत अशी समजूत करून घेऊन चोख्यानें नम्रतेनें भाषण केलें कीं, "हे ब्रह्मदेवहो; तुम्ही माझे मायबाप आहां. मला तुमच्यासारखें मोठेपणाचें भूषण कशाला पाहिजे. भूपृष्ठापासून कितीतरी उंच राहणारा सूर्यनारायण जसा कमळिणींचा सांभाळ करितो त्याप्रमाणें आपल्या सिंहासनावरूनच पांडुरंग या नीच चोख्याचें संरक्षण करीत आहे. सदासर्वकाळ एकमेकासन्निध वास्तव्य करणाऱ्या दोन वस्तूंत जर अढळ प्रेम नसेल तर

त्या निकटावस्थेना उपयोग काय ? मुख्य मुद्दा प्रेमाचा आहे. सान्निध्यावरच कांहीं गोष्टी नहार नाहीं. कांसवी आपल्या पिलांना दुरून अवलोकन करूनच प्रतिपाळिते, तद्वत् पांडुरंग दुरूनही आपल्या दासावर कृपाछत्र उभारतात हें आपणास समजत नाहीं असें मीं नीचानें कसें म्हणावें ? इतकें बोलून चोख्या आपल्या घरीं जाऊन आपल्या ध्येय मूर्तीचें ध्यान करीत बसला. रात्रीच्या प्रहरीं प्रत्यक्ष पंढरीनाथ चोख्याच्या घरीं प्राप्त झाले. ब्राह्मणांच्या आत्मप्रौढीच्या भाषणानें आपला दास चोख्या मनामध्यें खिन्न झाला असेल असें वाटून विठोबांनीं चोख्यास देवळांत घेऊन जाण्याचें आश्वासन दिलें आणि लागलीच ते दोघे देवळांत गेले. अंतर्गाभाऱ्यांत गेल्यानंतर पांडुरंग त्याच्याशीं गोष्टी बोलत बसले असतां त्यांचा संवाद बाहेरील दारांत जागसूद निजलेल्या पुजाऱ्यास ऐकूं आला. चोख्याचा स्वर ओळखतांच तो पुजारी उठून बाहेर गेला आणि त्यानें दुसरे कित्येक लोक जमवून आणिले. सर्व लोकांना चोख्या आंत असल्याची खात्री झाली. ब्राह्मणांच्या भाषणानें चिडून चोख्यानें मुद्दाम हा भ्रष्टाकार केला असावा असा तर्क करून त्या सर्व लोकांनीं लागलीच कुलूप काढून चोख्याला बाहेर काढिलें. दाराला कुलूप असतांना चोख्याचा गाभाऱ्यांत शिरकाव कसा झाला याचा शोध करण्याकरितां त्यांनीं पहिल्याप्रथम त्याला त्यासंबंधीं दरडावून प्रश्न केला. त्या प्रश्नास चोख्यानें उत्तर केलें " माझा कांहीं अन्याय नाहीं. पांडुरंगांनीं मला आपल्या हातांत धरून देवळांत आणिलें आपण पण गरिबावर रोष करूं नये " असें सांगून चोख्या आपल्या बिऱ्हाडी जाऊं लागला. त्याला मध्येंच आडवून ब्राह्मणांसह सर्व मंडळींनीं त्या अंत्यजाला अशी ताकीद केली कीं " तूं आमच्या या पंढरींत राहूं नको. तूं चंद्रभागेच्या पलीकडे जाऊन रहा. उद्दामपणानें आमची आज्ञा भंग करशील तर ताबडतोब तुला कडक शिक्षा करण्यांत येईल. तूं आमचा देव बाटवून महापातक जोडलें आहेस. तुला शेवटीं रौरव नर्क प्राप्त होईल. "

द्विजवरांची ही दर्पोक्ति ऐकून चोख्यानें उत्तर केलें " देव बाटविल्याचा दोषारोप मजवर आपण विनाकारण करिता. अंत्यज आणि ब्राह्मण यांनीं गंगेंत स्नान केलें तरी गंगा बाटत नाहीं. सर्व जातींचे प्राणी पृथ्वीवर गमन करितात म्हणून पृथ्वी विटाळली असें म्हणण्यास शास्त्राचा आधार सांपडेल काय ? वाऱ्यानें दुर्जनाला स्पर्श केला तरी वाऱ्याच्या अंगीं दुर्जनांचे अवगुण जडत नाहीत. अनंत ब्रह्मांडे व्यापून राहणाऱ्या देवाधिदेव पांडुरंगाला सर्व जाती सारख्याच आहेत. तुमचें मन विकल्पानें भरून गेलें असल्यामुळें तुम्हीं मजवर दूषण लादता हें वाजवी नव्हे." चोख्याचें हें भाषण ऐकून ब्रह्मवृंद संतापयुक्त झाला. सर्व जातींत अत्यंत मलीन अशा चोख्याच्या तोंडून ज्ञानाचा उच्चार झालेला ऐकून ब्राह्मणांचा

( पुढील मजकूर पान ६३ वर पहा )

# अंग झिजविणें अनिवार्य

लेखक : द. शं. टिपणीस

एका बी. ए. भक्ताची गोष्ट आहे. सर्वे खात्यांत हे एक अंमलदार होते. जमीन मापणीसाठीं त्यांना गांवोगांव हिंडावें लागे. असाच एका सरकारी कामानिमित्त ते बेळगांव जवळील वडगांवीं आले. त्या ठिकाणीं एक संत रहात असत. त्यांची कीर्ति ऐकून हे बी. ए. त्या साधूच्या दर्शनास गेले. त्या साधूनीं त्यांना कल्याणप्रद आशिर्वाद देऊन निश्चळदासकृत 'विचार सागर' हा ग्रंथ दिला व सांगितलें कीं याचें चांगलें वाचन व परिशीलन करा. कल्याण होईल. पुढें तुम्ही कामानिमित्त उत्तर दिशेस गेलांत कीं एका महान संताची भेट होईल. पुढील मार्ग ते दाखवतील. यानंतर या बी. ए. ची बदली कल्याण येथें झाली. तेथें त्यांची चांदोरकराशीं ओळख होऊन त्यांच्याकडून साईबाबांची महती या भक्तास कळली. ती ऐकून शिर्डीला जाण्याचें त्यांच्या मनांत आलें व ते शिर्डीस गेले. मशिदींत जाऊन आमच्या या बी. ए. नें बाबांच्या पायीं माथा ठेवला नाहीं तोंच त्यांना उपदेश झाला. हा उपदेश अगदी मोजक्या खुणेच्या शब्दांत आहे. त्यासंबंधीं फक्त एकच ओवी आहे. पण त्यांत अर्थ मात्र खोलवर भरलेला आहे. वडगांवला काय घडलें, त्या संतानीं काय सांगितलें, जें सांगितलें त्याचा उपयोग काय व पुढें काय करावयास पाहिजे हें सर्व बाबांनीं त्रोटक व खुणेच्या शब्दांत सांगितलें. तें ऐकून बी. ए. काय समजायचें तें समजले. इतरांना मात्र बाबा काय बोलले तें उमगलें नाहीं.

## संतांच्या कार्यांत योजनबद्धता

याबेळीं बी. ए. ला निमित्त करून बाबानीं तीन गोष्टींची जाणीव आपल्या भक्तांना करून दिली. एक ही कीं, सर्व संतांची एकमेकांशीं एकात्मता असते. एकाद्या भव्य इमारतींत शाळेचे निरनिराळ्या यत्तेचे निरनिराळ्या खोल्यांतून वर्ग असतात व त्या खोल्यांतून निरनिराळे शिक्षक आपापलें कार्य करीत असतात. एकाचें कार्य संपले कीं पुढील कार्य दुसरा शिक्षक करतो. याप्रमाणें पायरी पायरीनें विद्यार्थी चढत असतात. डोळ्यांना व कानांना जरी निरनिराळीं कार्यें भासलीं तरी सर्वांचा शेवट एका अंतीम ध्येयांतच होतो. वरवर दिसणाऱ्या व वाटणाऱ्या निराळेपणांत एकसूत्रता असते. शिक्षक अनेक असले तरी त्यांच्या कार्यांत योजनबद्धता असते. अशीच संतांच्या कार्यांतहि असते. ठिकठिकाणीं संत आहेत पण प्रत्येकाचें कार्य वेगवेगळें असतें. असें असलें तरी सर्व संताची आंतून एकात्मता असते. एकाचें कार्य दुसरा पुढें चालवितो. जरूर वाटल्यास शिष्याला एका संताकडून दुसऱ्या संताकडे पाठविलें जातें. ही गोष्ट निरनिराळ्या उपायांनीं संत साधत असतात.

वडगांवच्या संतांनीं ( बाबा कानडी आप्पा असा उल्लेख करतात ) पुढील मार्ग ते दाखवतील हें जसें स्पष्ट भाषेंत सांगितलें, तसा सरळ रस्ता नेहमींच असतो असें नाही. किल्येक वेळां नाना संकटें व अडीअडचणींच्या पकडींत शिष्याला आणून संतसमागमाची इच्छा त्याच्यांत निर्माण केली जाते व अंतःप्रवृत्तीच्या जोरावर मग तो आपल्या पावलीं संताकडे जातो. आपणास पाहिजे तीं माणसें खेंचून आणण्याची बाबांची प्रसिद्धी आहेच. चिडीसारखा दोर बांधून माझा माणूस मी खेंचून आणीन असें बाबा म्हणत असत. पुढील वर्षी १० वीतील विद्यार्थी आपल्याकडे येतील हें जसें ११ वी च्या शिक्षकाला आगाऊन माहीत असतें तद्वत आपल्याकडे कोण येणार, कशासाठीं येणार, याचें ज्ञान संतांना अगाऊच होत असतें. या सर्व गोष्टींची जाणीव '**कानडी अप्पाचें तें सांगणें**' या शब्दांत या बी. ए. ला बाबांनीं करून दिली. दुसरी गोष्ट ही कीं अध्यात्मामध्यें ग्रंथ वाचनाची जरूरी असली तरी ती कांही विशिष्ट हेतू साध्य करण्यापुरती आहे. या वाचनास मर्यादा आहे. तिसरी गोष्ट ही कीं खरा अध्यात्म कष्ट साध्य आहे.

## जिज्ञासा व तिची पूर्तता

एकाद्या गोष्टीबद्दल माणसांत जिज्ञासा, औत्सुक्य निर्माण झालें कीं मग त्या गोष्टींसंबंधी तो अधिक माहिती मिळवूं लागतो. त्या गोष्टीमुळें त्याच्या भावना वा इच्छा तृप्त होऊन त्याला सुख मिळणार असेल तर तो ती गोष्ट साध्य करून घेण्याच्या खटपटीस लागतो. या तत्त्वाचा उपयोग व्यापारी जगांत कुशलतेनें करण्यांत येतो. जाहिराती, शो-केसीस, मालाची आकर्षक मांडणी, स्पर्धा रेडिओ, भोंगे वगैरे नाना प्रकारच्या साधनांच्या साह्यानें आपल्या मालाकडे लोकांचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न व्यापारीं जगांत चालू असतो. असें लक्ष वेधलें कीं 'काय आहे पाहूं तर खरं' अशी जिज्ञासा उत्पन्न होऊन गिऱ्हाईक खेचलें जातें व अंतीं मालाचा विक्रा होऊन व्यापाऱ्याचा फायदा होतो. नाटकें, सिनेमादि करमणुकीच्या खेळांतही हेंच तंत्र अवलंबिलें जातें. आजचें जग, जाहिरांत जग आहे. जगाच्या व त्यांतील माणसांच्या आपल्या कल्पना तत्संबंधीं केलेल्या जाहिरातीवरून आपण ठाम करीत असतो. मग ती जाहिरांत लेखी वा तोंडी, स्तुति वा निंदादर्शक कशीही असो. खऱ्या माहितीच्या आधारें मत बनविणारे महाभाग विरळा. यामुळें व्यापारच नव्हे तर माणसाचा मोठेपणाही जाहिरातीवर अवलंबून राहिला आहे. जिज्ञासा निर्माण करणारी निरनिराळीं तंत्रें कशीं हाताळावींत याचें एक शास्त्रच बनत चाललें आहे. ऐहिक व्यवहारांत जिज्ञासा निर्माण करण्याच्या तंत्राचा उपयोग करून व्यवहार वाढीस लावणें योग्य समजलें जातें तर मग परमार्थिक वा अध्यात्मिक व्यवहारांतही जिज्ञासा निर्मितीच्या व तिच्या पूर्तीच्या तंत्राचा उपयोग करून परमार्थ वा आध्यात्म वाढीस लावलें काय चूक ठरेल? जाहिरातीचें तंत्र व शास्त्र नवीन असलें तरी त्यामागील मूलतत्त्व ( जिज्ञासा निर्मिती व पूर्ती ) फार पुरातन असून अध्यात्मशास्त्र त्यांचा पूर्वीपासूनच वापर करीत आलें आहे. कथा,

कीर्तनें, प्रवचनें, पुराणें, पोथ्या आदी जिज्ञासा निर्मितीचीं साधनें आहेत तर अध्यात्मिक ग्रंथ तिच्या पूर्तीचीं साधनें व त्यांची माहिती उपलब्ध करून देणारे आहेत.

जिज्ञासा निर्माण झाल्यावर 'आहे तरी काय? पाहूं या.' असें म्हणून माणूस अध्यात्मांत डोकावूं लागतो व आपल्याला कांहीं उपयुक्त मिळेल कीं काय हें शोधूं लागतो. शोधतां शोधतां कांहीं उपयुक्त मिळालें कीं तो तें साध्य करून घेण्याच्या मार्गास लागतो. त्यासाठीं साधने धुंडाळूं लागतो. एकाद्या व्यक्तीनें विशिष्ट भक्तीच्या योगे कांहीं ऐहिक फायदा साध्य करून घेतलेला पाहून जिज्ञासूलाहि आपण तसेंच करून आपलाहि फायदा करून घ्यावा अशी इच्छा होते व तो त्या मार्गांत शिरतो. संपत्ति, संतति, कीर्ति, मान वगैरेंच्या नाना लालसा माणूस बाळगून असतो व पूर्तीसाठीं भ्रमंती करीत असतो. या भ्रमंतींत इच्छापूर्ती करण्यासारखें कांहीं आढळल्यास तो तें हाताळूं लागतो. सांपळे, पिंजरे ही प्राण्यांना पकडण्याचीं साधनें आहेत; तसेंच आध्यात्मिक ग्रंथ, कथाकीर्तनें आदि लालसा बाळगून भ्रमंती करणाऱ्यांना पकडण्याची साधनें आहेत. सापळे, पिंजरे म्हणजे मृत्यूचा जबडा होय तर ग्रंथादि साधनें मोक्षाचें प्रवेशद्वार होय. यांतून फक्त प्रवेश करतां येतो. प्रवेश झाला म्हणजे सर्व कांहीं मिळालें असें होत नाहीं.

## सद्‌गुरूचें मार्गदर्शन

पूर्व प्राथमिक शाळेंत प्रवेश करणाऱ्या बालकाचें ध्येय अक्षरें व अंक शिकणें एवढेंच असतें. तसेंच अध्यात्मांत प्रथम प्रवेशीं माणसाचें ध्येय ऐहिक सुख हें असतें. या ऐहिक सुखाची साधने ग्रंथ उपलब्ध करून देतात. कित्येक शास्त्रीय माहिती पुरवतात एवढेच. परंतु पूर्व–पुण्याईच्या दाखल्यावर ( Leaving Certificate ) जेव्हां एकादा सद्‌गुरु अशा माणसास आपल्या शाळेंत प्रवेश देईल तेव्हांच त्याचा अध्यात्मांत खराखुरा प्रवेश झाला असें म्हणतां येईल. अध्यात्मिक ग्रंथ म्हणजे गुळाची ढेप. वासावर आसपासचे डोंगळे येऊन चिकटणारच. अध्यात्मिक ग्रंथ म्हणजे मधाचें बोट. तें चाखलें म्हणजे मध मिळाला असें होत नाहीं. मधाची लालसा उत्पन्न होईल एवढेंच.

लालसेमुळें गुळाच्या ढेपीला मुंगळे चिकटले व ते तेथें दीर्घकाल राहिले तर कायमचेच चिकटून राहतात व त्यांचें मरण ओढवतें. अध्यात्मिक ग्रंथ वाचन हेंच सर्व कांहीं समजून त्यांत दीर्घकाल रममाण होणारा वाचक त्यांतच चिकटून राहतो व त्याची अध्यात्मिक प्रगति खुंटते. यामुळें अध्यात्मिक ग्रंथांचा उपयोग मर्यादींत करावयास पाहिजे. त्यांच्या साह्यानें हा भवसागर तरून जातां येणार नाहीं, त्यासाठीं सद्‌गुरुचें मार्गदर्शन आवश्यक आहे. यासाठींच कानडी आप्पानीं जरी आमच्या बी. ए. ला ग्रंथवाचन सांगितलें तरी पुढील मार्ग तुम्हांस दैवयोगें भेटणारे एक महान् संत दाखवतील असेंहि सांगितलें व बाबानींहि बी. ए ला प्रथमदर्शनीं **कानडी आप्पाचें तें सांगणें। जैसें रेडिया संघे घाट चढणें।** असें सांगून ग्रंथ-

वाचनाची मर्यादा ध्वनीत केली. रेड्याच्या साह्यानें घाट चढणें व ग्रंथवाचनानें अध्यात्मिक उच्च ध्येय गांठणें दोन्ही ही सारखींच याची जाणीव बाबांनीं या भक्तास दिली, रेडा हा किती सूज्ञ व ज्ञानी हें आपण जाणतोंच्. ग्रंथांतील शब्द हे त्या सारखेच शब्दांना व्यक्त न करतां येणारें ज्ञान त्यांच्या साह्यानें मिळविण्याचा प्रयत्न करणें हास्यास्पद नव्हे तर काय ! शब्दांतील अक्षराच्या नादीं लागून अर्थ धुंडाळींत आयुष्याचा व्यय करण्यापेक्षां ब्रह्मांडांतील **त्या अक्षराच्या** नादीं लागून तें हस्तगत करणें केव्हांही चांगलें. ही गोष्ट सद्‌गुरु साह्यावाचून होणें नाहीं. या ठिकाणीं ग्रंथसाहाय्य निरुपयोगी आहे. सद्‌गुरुच नाद लावूं शकतो व नाद (मूळ) देऊं शकतो. रेड्याच्या साह्यानें घाट चढून गेल्यावर तोच रेडा पुन्हां पलीकडे घाट उतरून आपल्याला पायथ्याशी आणून ठेवतो व अंतीं जैसे थे होते. हाच प्रकार केवळ ग्रंथ वाचनामुळें होतो. प्रगती न होतां त्याच त्या वर्तुळांत भ्रमंती होत राहते. रेड्याची चाल मंद. शिवाय हासके हिसके. दीर्घकालांत थोडी चाल पदरांत पडून शारिरीक वेदना मात्र अधिक सहन कराव्या लागतात. ठराविक चाकोरींतून जाणारा रस्ता तेवढा रेड्याला माहीत. घाटांतील अत्युंग शिखरे, इतर वाटा, खाचाखोंचा वनश्री त्याला काय माहीत ? आणि अशाच्या संगतींत राहणाऱ्याला तरी मग त्या काय माहित होणार ? वर्षानुवर्षें अशा संगतींत राहूनही त्यांचें घाटाचें सर्व ज्ञान शून्यच. रेड्याचें ज्ञान शून्य तेथें त्याच्या सोबत्याला तरी अधिक काय मिळणार ? पण सद्‌गुरु पहा. त्याचें ज्ञान शून्य नसून त्यांना शून्याचें ज्ञान असतें. म्हणूनच बाबा नुसत्या ग्रंथवाचनास **जैसे रेडिया संगे घाट चढणें** असें म्हणाले.

## पदयात्रेचें महत्त्व

वाहनाच्या साह्यानें ठराविक रस्त्यानें घाट चढून फार तर माथ्यावर जातां येईल. त्यांतील अत्युंग शिखरावर वहानाच्या साह्यानें जाणें अशक्य आहे. वाहनांतून गेल्यास मार्गावरील वनश्री व आजूबाजूचा घाट यांचा काय अनुभव मिळावयाचा तो मिळेल. परंतु सबंध घाट त्यांतील नानाविध पर्वत, डोंगर, दऱ्या–खोऱ्या, नदी–नाले यांची कांहींच कल्पना येणार नाहीं. घाटाच्या विवक्षित भागाचें ज्ञान हेंच त्याचें सर्वज्ञान ठरलें तरी संपूर्ण घाटाचें ज्ञान हें त्याचें अज्ञानच ठरेल. घाटाच्या अज्ञानविरहीत ज्ञानासाठीं कोणत्याही वाहनाचा–ग्रंथाचा–उपयोग होणार नाहीं. त्यासाठीं त्यानें सर्व प्रवास पायींच केला पाहिजे व तोही ठराविक चाकोरींतून नव्हे. सर्व जंगले दऱ्याखोऱ्या त्यानें पायीं तुडविली पाहिजेत. तर त्याला घाटांतील नाना वैभवानें नटलेलें सृष्टी सौंदर्य अनुभवतां येईल. नदी–नाल्यांच्या उगमस्थानांचा शोध घेऊन झऱ्यांच्या अमृतमय जलानें तहान भागवितां येइल. दऱ्यांच्या तळाचा शोध घेऊन खरी कल्पना व खरा अनुभव तो घेऊं शकेल. चंद्रसूर्यांची निरनिराळ्यावेळची निरनिराळ्या ठिकाणची नानाविध, तऱ्हेची शोभा तो स्वतांच्या डोळ्यांनीं पाहूं शकेल. नाना ठिकाणीं नाना तऱ्हेच्या फळांनीं बहरलेले नाना वृक्ष त्याच्या पहाण्यांत येतील व नाना फळांची गोडी तो प्रत्यक्ष अनुभवूं

शकेल. आपल्या पदयात्रेंत तऱ्हेतऱ्हेचे रंग धारण करणारे व मंजुळ गान करणारे पक्षी तो पाहूं शकेल व ऐकूं शकेल. तर क्रूर श्वापदांच्या आरोळ्यांनीं त्याच्या कानठळ्याही बसतील. स्वातंत्र्यांत विहारणाऱ्या वाघ सिंहाशीं गांठ पडल्यावर सर्कशींत वाघ सिंह पहाणें व येथील वाघ सिंह पहाणें या दोहोंतील फरक प्रत्यक्ष अनुभवानें त्याला कळून येईल. अत्युंग शिखरें चढून व त्यांच्या माथ्यावर उभा राहून तो आजूबाजूचें सर्व ब्रह्मांड आपल्या उघड्या डोळ्यांनीं पाहूं शकेल. घाट व त्याच्या आसमंतांतील प्रदेश याची त्याला पूर्ण कल्पना, जाणीव येऊं शकेल. हें सर्व पदरीं पडण्यासाठीं पदयात्राच कामीं येईल. कोणत्याहि प्रकारचें वाहन निकामी ठरेल.

ही पदयात्रा वाटते तितकी सोपी नाहीं. महाकठीण आहे. गाद्यागिर्द्यांवर लोळतां लोळतां व खुर्च्यांवर रेलतां रेलतां अध्यात्मिक ग्रंथाचें वाचन चिंतन मनन एक वेळ होऊं शकेल परंतु या पदयात्रेंत मात्र या सर्व गोष्टी पूर्ण अभावानें असतात. ऐहिक सुखाच्या नानाविध साधनांचा पूर्ण त्याग केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. जें मिळेल तें खाणें व असेल तें पिणें प्राप्त आहे. जिभेचे सर्व चोंचले बाजूला ठेवले पाहिजेत. ऊन-तहान, पाऊस-पाणी, थंडी-वारा यांपासून संरक्षण करण्यास झाडा-पानांशिवाय वा गुहाकपारीशिवाय कांहीं मिळावयाचें नाहीं. यात्रेच्या भ्रमंतींत वन्यपशू व जीव-जीवाणू यांच्याशीं वेळोवेळीं गांठ पडून जीव धोक्यांत येईल व आलेल्या संकटाशीं स्वमनगटाच्या जोरावर झगडून सुटका करून घेणें भाग होईल. कारण जवळ ना रायफल ना इतर मदत, एकला वाटसरु. चालतांना झाडा-झुडपांचे काटे पायाला बोचतील अंगाला खरचटतील. पायाला बोंचलेला काटा हातानें काढून व खरचटलेले पुसून पुढें प्रवास करणें भाग आहे. दुसरा तरणोपाय नाहीं. या प्रदेशांतुन स्वछंदानें प्रवास करतांना जवळची माया व अंतःकरणाची माया दोन्हीही नामशेष होतात. यामुळें वेळप्रसंगीं कोणी मायेचे माणूस भेटेल व आपल्याला हात देईल अशी नुसती आशा करणेंही या प्रदेशांत वेडेपणाचें समजलें जातें.

## अंग झिजवावें लागतें

थोडक्यांत म्हणजे ही पदयात्रा अत्यंत कष्टाची, हालअपेष्टांची, त्रासाची, दगदगीची व जिकिरीची आहे. त्या एका **अक्षय** सुखासाठीं इतर सर्व सुखांचा त्याग करून संकटांना हाल-अपेष्टांना कवटाळून आनंदानें न कुरकुरतां न चिडतां शांत चित्तानें सर्व सहन करून जो पदयात्रा पूर्ण करील तोच तरेल; अशा या बिकट परिस्थितींत आपण खरो-खरच एकलें आहोंत काय ? संकटांशीं झगडतांना शक्तिसामर्थ्य देणारा व त्यांतून तारणारा असा कोणी वाली नाहीं काय ? आहे व तो सदैव मदतीचा हात पुढें करून आपल्या जवळच उभा आहे. आपण मात्र तो हात धरला पाहिजे व आपला प्रवास सुखकर करून घेतला पाहिजे. त्याला आपण आपला मार्गदर्शक वाटाड्या केला पाहिजे. एखाद्या नवख्या प्रदेशांतील स्थळें पहातांना आपण मार्गदर्शक–वाटाड्या–बरोबर घेतो. मग अध्यात्माच्या या अफाट जंगलांतून, घाटांतून, पर्वत राजींतून, दऱ्या-

खोऱ्यांतून प्रवास करतांना तो वाटाड्याशिवाय करणें योग्य ठरेल काय ? ऐहिक जीवनाच्या प्रवासांत जन्मल्यापासून मरेपर्यंतच नव्हे तर त्या पुढें ऐहिकदृष्ट्या पूर्ण अदृश्य होईपर्यंत हरघडी आपणांस वाटाड्याची मदत घ्यावी लागते. मग तशी मदत अध्यात्मिक जीवनाच्या प्रवासांत मात्र नको असें म्हणावें कसें योग्य ठरेल ? हिमालयांतील अत्युंग शिखरें काय वाटाड्याखेरीज चढली गेली ? अध्यात्मांतील गौरीशंकर वाटाड्याखेरीज हातीं लागेल या आशेला काय म्हणावें ? हिकमतीचें व हिंमतीचे परदेशस्थही शेर्पाचें साहाय्य घेतल्याखेरीज हिमालयावर पाऊल टेवूं इच्छित नाहीत. अध्यात्मांतही प्रवास करतांना शेर्पांची जरूरी आहे. असें शेर्पा जागोजाग बसून आहेत. ते सद्‌गुरु या नांवानें ओळखले जातात. त्यांना शरण जाऊन त्यांच्या मार्गदर्शनाखालीं आपण आपली पदयात्रा केली तरच तींत यश येईल नाहींतर एकट्याच्या हिंमतीवर केलेल्या भ्रमंतींत अज्ञानामुळें एकाद्या महा संकटांत सांपडून सर्वस्व गमावून बसण्याची पाळी येईल. हें न होऊं देणारे व शक्ति सामर्थ्य देणारे सद्‌गुरु आहेत. त्यांची कांस धरल्याशिवाय तरणोपाय नाहीं. म्हणूनच कानडी आप्पानीं पुढें महासंत भेटतील व ते तुला मार्गदर्शन करतील असें आमच्या बी. ए. ला सांगितलें. या मार्गदर्शनाखालीं होणाऱ्या पदयात्रेंत ग्रंथ वाचनाचा सुखासीनपणा नसून अंग मेहनत हाल-अपेष्टा आहेत याची जाणीव देण्यासाठीं **अंग झिजविणें अनिवार्य** असें बाबा प्रथम दर्शनींच या बी. ए. ला म्हणाले.

## मी गौरीशंकरावर चढवीन

**'न येथील सोपे चालणें'** असें बाबा म्हणाले. येथील म्हणजे कोठील ? मशिदमाईंतील की शिर्डीतील ? नव्हे. येथील म्हणजे माझ्या येथील, सद्‌गुरु येथील. माझ्या मार्गदर्शनाखालीं तुला प्रवास करावयाचा असेल तर अनिवार्य अंग झिजविलें पाहिजे. मेहनत केली पाहिजे हाल अपेष्टा काढल्या पाहिजेत. अध्यात्मिक कल्याणाचा मार्ग व त्या मार्गावरील प्रवास सुखासीन नाहीं. हा प्रवास म्हणजे कांहीं ग्रंथ वाचन नव्हे कीं लोळल्या लोळल्या तो पूर्ण करतां येईल. मी तुला सर्वतोपरी साह्य करीन, धोके दाखवीन, शक्तिसामर्थ्य देईन व अध्यात्मांतील गौरीशंकरावर तुला हात धरून चढवीन, कधींही तुला खालीं पडूं देणार नाहीं. परंतु तुला स्वताला चालले पाहिजे. मी तुला पाटीवर घेऊन चालणार नाहीं. तुझ्या पाठिशीं मात्र असेन. काटेकुटे बोंचतील तें तूं सहन केलें पाहिजेस. हाल होतील, अपेष्टा वाट्यास येतील तूं त्या सर्व सहन केल्या पाहिजेत. मी तुला सांभाळीन. धीर देईन पण सगळी मेहनत तुझी. कष्ट तुझे. एवढा अर्थ **'ऐसे न येथील सोपें चालणें। अंग झिजविणें अनिवार्य।'** या शब्दांत बाबांनीं व्यक्त केला आहे.

हा खुलासा वाचल्यावर एका बिकट प्रश्नाचें उत्तर वाचकांच्या सहज ध्यानी येईल. अनुभव असा आहे कीं जितकी जितकी साईभक्ति अधिक करावी तितकी तितकी संकटें व अडीअडचणी वाढत जातात. अनेकांनीं सताह केलें. त्या मागो-

माग संकटें निर्माण झालीं. अडी अडचणी वाढल्या. अशा वेळीं आम्ही बाबांचें एवढें करतों तरी आमच्यावर असें प्रसंग कां? असा प्रश्न अनेक साईभक्तांकडून विचारण्यांत येतो. धीर धरण्याऐवजीं पुष्कळ वेळां अनेक करूं नये तें करतात. साईभक्ति सोडून देतात. वास्तविक यांत घाबरून जाण्यासारखे कांहीं नाहीं. शांतपणा व सबूरी राखली त्यांचा अंतीं फायदाच झाला. आजारी झाले व होता आहेत. अडीअडचणीं वाढतां आहेत. हें जसें दिसतें तसेंच शांत मनाला हेंहि दिसेल कीं हें सर्व साईभक्त या सर्व गोष्टींतून सुखरूप वटावेले आहेत. कोणीहि पडला नाहीं किंवा त्याच्या आयुष्याचें तीन तेरा झाले नाहींत व साईबाबावर पूर्ण निष्ठा आहे तोंपर्यंत कधींहि होणार नाहींत. **ऐसें न येथील चालणें। अंग झिजविणें अनिवार्य।** याची जाणीव बाबा देतात त्याच बरोबर '**कृतांताच्या दाढेमधुनी, माझ्या भक्ताच्या धामीं अन्नवस्त्रा नाहीं कमी**' वगैरे आश्वासनें आपणास धीर येण्यासाठीं त्यांनीं देऊन ठेवलीं आहेत व दिलेल्या आश्वासनाला बाबा आजहि जागत आहेत. आपल्यापाशीं खरी निष्ठा व सबुरी मात्र पाहिजे, म्हणजे झालें. असें असलें तरी मूळ प्रश्न शिल्लक राहिलाच. अशी परिस्थिती होतेच कां? बाबा बिकट परिस्थिति येऊंच कां देतात. याचें उत्तर मागील खुलाशांत असलें तरी अधिक समजुतीसाठीं थोडेसें विवरण जरूर आहे. त्याशिवाय आमच्या बी. ए. ला सांगितलेल्या उपदेशाची पूर्ती होणार नाहीं.

## सौदा केव्हां पटेल?

भक्तीची सुरवात स्वार्थापासून होत असते. शंकराचार्य, ज्ञानेश्वर, एकनाथ, कबीर, मिराबाई आदि जन्मताच देवाकडे तोंड व जगाकडे पाठ करणारी रत्ने लाखांत एकादेच. सर्वसाधारण जनतेपैकीं ९९$\frac{9}{10}$ टके स्वार्थासाठीं देव धुंडण्याचा उद्योग करतात. स्वार्थ हा वाईट तर खराच पण गळाला लागलेल्या खाद्यासारखा त्याचा उपयोग अध्यात्मांत केला जातो. स्वार्थांच्या पूर्तीसाठीं देव अगर सद्गुरुभोंवतीं भक्तांची दाटी होते. त्यांतील निष्पाप व शुद्ध अंतःकरणाच्या भक्तांचा बारीकसारीक स्वार्थ पुरवून सद्गुरु त्यांना आपल्याकडे खचून घेतात व अध्यात्मिक मार्गास लावतात. देवाकडे वा सद्गुरुकडे ऐहिक वा पारमार्थिक मागणें भक्तांचें असतें. ऐहिक मागण्या पुरविण्यांत सद्गुरुचा काय उद्देश असतो हें वर आलेंच आहे. या मागण्या पुरवल्यामुळें भक्त आनंदी व सुखी (त्यांच्या समजाप्रमाणें) होऊन त्यांची आपल्या सद्गुरुवरील निष्ठा दृढतर होते. सद्गुरु संगतीमुळें ऐहिक मागण्यांचा सरळ मैदानाचा प्रदेश सोडून पारमार्थिक मागण्यांच्या दऱ्याखोऱ्यांतून प्रवास करूं लागतो. हा प्रवास सुरूं झाला कीं निष्ठा ढळण्याचे प्रसंग उद्भवतात. पारमार्थिक मागणी महाग असते व तिला जबर किंमत दिली तरच ती पदरांत पडेल याची जाणीव नवभक्ताला सहसा राहत नाहीं. यामुळें वर उल्लेखिलेला प्रश्न विचारला जातो. समजा आपण बाजारांतून

फिरत असतां एखाद्या खेळण्याच्या दुकानांत मोटारचें सुंदर मॉडेल पाहिले व ती घेण्याची इच्छा झाली तर आपल्या सौदा रुपया बारा आण्यांत पटेल. पुढें फिरतां फिरतां खऱ्या खुऱ्या मोटारच्या दुकानांत आपण शिरलों व तसेंच सुंदर मॉडेल आपल्या मनांत भरलें तर तो सौदा काय रुपया बाराआण्यांत पटेल? अर्थात नाहीं. त्यासाठीं १५–२० हजार रुपये मोजावे लागतील. असाच प्रकार ऐहिक व पारमार्थिक मागण्यासंबंधीं आहे. देवा, माझें कल्याण होऊ दे, माझें अज्ञान घालव, तुमचे पाय सदैव लाभोत वगैरे पारमार्थिक मागण्या पदरांत पडण्यासाठीं जबर मोल द्यावें लागतें. मूल्यवान गोष्टीची आपण मागणी केली कीं, मग तिचें मोल मग तें जबर असले तरी द्यावयास नको काय? तुमच्या मागणीचा योग्य मोबदला घेतल्या खेरीज सद्गुरु तरी तुमची मागणी तुमच्या पदरांत कशी टाकील? सद्गुरुचे व्यवहार पैशावर चालत नसतात. अतः करणावर चालत असतात. यामुळें तुमच्याकडे तुमच्या मागणीला जरूर तें शुद्ध अंतःकरण, निष्ठा सद्गुरु मागणारच. तुमच्यापाशीं जरूर ते मोल नसेल तर दुकानदाराप्रमाणें तुम्हांला परत न लावतां तें मोल तुमच्याठायीं प्रथम निर्माण करण्याचा ते प्रयत्न करतील. अंतःकरण शुद्दि स्वार्थ अहंकार यांचा लोप, वासनांचा क्षय त्यांना करणें जरूर आहे. हें घडवून आणण्यास संकटें, अडचणी, कष्ट, त्रास वगैरे नाना आपत्ती साधने म्हणून वापरली जातात. पूर्वकर्म भोग भक्तांकडून लौकर भोगवून तें संपवावें लागतात. या सर्वांला टिकाव देऊन तुम्ही शुद्ध झालांत कीं मग सद्गुरु कृपा होऊन तुमची मागणी सोळा आणे पदरांत पडेल. संतांच्या घरची उलटी खूण असते. डोकें खालीं व पाय वर. हा संसार–अश्वत्थ वृक्ष–मूळांतच उलटा आहे. यामुळें सुलट्या असूनहि संतांच्या घरच्या गोष्टी आपणांस उलट्या वाटतात. बाबांनी आपल्या सद्गुरुची महती सांगतांना हें स्पष्ट केलें आहे. सद्गुरुच्या व आपल्या दृष्टींत भेद असल्यामुळें जें आपणांस कल्याण वाटतें तें त्यांना अकल्याण वाटते व जे आपण अकल्याण समजतो, नेमकें तेंच ते कल्याण समजतात. जे कोणी डोक्यानें नव्हे तर डोक्यावर चालण्याची करामत करूं शकतील ते खरें कल्याण लाभूं शकतील. त्यांनांच खरें ज्ञान मिळेल. त्यांनांच सद्गुरुचें चरण मिळतील सोन्यानें स्वतांला अग्नींत तापवून घेतल्याखेरीज कां त्यांचे सुंदर अलंकार होतील! दुधाला साजूक तूप व्हावयाचें असेल तर त्यानें स्वतांला तापवुन घेतले पाहिजे. विरजवून घेतले पाहिजे, घुसळवून घेतले पाहिजे व कढवून घेतले पाहिजे. आत्मरुपाच्या साजूक तूपांत आपलें रूपांतर करवून घेण्यास हालअपेष्टा, कष्ट, त्रास यांत तापवून, विरजवून, कढवून व घुसळवून स्वतांस घेतले पाहिजे. याची जाणीव कुंतीला होती म्हणूनच तिनें मला सदैव संकटांत ठेव अशी श्रीकृष्णाकडे मागणी केली. हीच जाणीव भक्तांना करून देण्यासाठीं **अनिवार्य अंग झिजविणें** असें बाबा म्हणाले. हें सर्व ध्यानीं घेऊन अमुक पारायण केलें, तमुक भक्ति केली मग माझें असें कां व तसें कां!

चौरे कुरकुरत फिरण्यापेक्षां आपली कुवत ओळखून सद्‌गुरुकडे मागणी करणें अधिक योग्य होणार नाहीं काय ! खेळांतील मोटार घ्यावी कीं खरी घ्यावी हें ज्यानें त्यानें आपल्या खिशाकडे पाहून ठरवावें म्हणजे मग पश्चाताप करण्याची पाळी येणार नाहीं.

थोडक्यांत बाबांच्या शब्दांत सांगावयाचें तर—

**कानडी आप्पाचें तें सांगणें । जैसें रडियासंगें घाट चढणें ।**
**ऐसें न येथील सोपें चालणें । अंग झिजविणें अनिवार्य ॥**

अ. २१-६२


---

१ आचरण करण्यास सर्वांत कठीण काय ? —सत्याचरण.
२ सर्वांत महादुःख कोणतें ? —अज्ञान !
३ मोठ्यांत मोठें सुख कोणतें ? —आत्मज्ञानाच्या सहाय्यानें संपादन केलेली शांति.
४. या जगांत सर्वांत दर्शनीय व सुंदर काय ? —विद्वानांच्या हालचाली व वागणें.
५. या जगांत सर्वांत मोठ्या योग्यतेची कामधेनु कोणती ? —आपल्या गुरूवर, वेदांवर व भगवंतावर श्रद्धा ठेवणें हीच.


## जनतेचे आरोग्य म्हणजेच राष्ट्राचे सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठीं बलवान बनाः**—यासाठीं लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणें म्हणजे डंबेल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यांत येतो.

आम्ही कांदिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट, डि. स्कूल बोर्ड, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रें, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठीं लिहाः...



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स,** ८५ बापू खोरे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

## श्रीसाईनाथमहाराज

# स्तोत्र व जीवनरहस्य

लेखक : विश्वनाथ केशव छत्रे

**ज्यांचा कुणा जन्म न धर्म ठावा, जे जाहले वंद्य परंतु सर्वां।**
**करूनि शिर्डींत अतर्क्य लीला, त्या वंदुं साईगुरुराजयाला ॥ १ ॥**

श्रीसाईबाबांचा जन्म कुठें व कधीं झाला, हिंदु का मुस्लिम माता-पित्यांचे पोटीं, ही गोष्ट कोणासहि निश्चित माहीत नाहीं. परंतु ते सर्वधर्मीयांस वंद्य झाले ही गोष्ट मात्र खरी. जन्म कोणत्याहि जातींत मिळेना कां, 'भला रे भला' असें लोक आपल्या-बद्दल जिवंतपणी तसेंच मृत्यूनंतरही म्हणत राहतील असेंच माणसानें जगांत नित्य वागावें. शिरडींत सोळावें वर्षी प्रकट झाल्यापासून बाबांनीं सहज केलेले चमत्कार ( पाण्यावर पणत्या पेटविणें इत्यादि ) खरोखर अतर्क्य आहेत.

**प्यायास पाणी टमरेल हीन, ल्यायास चिंध्या जठरा कदन्न**
**अरुंद निद्रेस फळी छताला, त्या वंदुं साई गुरुराजयाला ॥ २ ॥**

शिरडी म्हणजे एक लहानसें खेडें; पण आपल्या वास्तव्यानें बाबांनीं त्याचा रंग एकदम पालटून टाकला. आज तर एका लहानशा संस्थानाचे स्वरूप त्याला आलें आहे. असें असलें तरी बाबांची राहणी अत्यंत साधी होती. अंग झांकावयास मिळतील त्या चिंध्या, पाणी प्यावयास एक टमरेल, भूक भागवावयास मिळेल तें भिक्षान्न व झोपा-यला पडक्या मशीदींत आढ्याला उंच टांगलेली एक अरूंद फळी ! भक्तांनीं अर्पण केलेल्या द्रव्यांतून त्यांना राजासारखें राहतां आलें असतें. पण त्यांनीं तें द्रव्य स्वतःसाठीं न वापरतां गोरगरीबांच्या नडी भागविण्याकडे खर्च केले. अशा निःस्पृहपणा क्वचितच आढळतो.

**लावावया दीप मिळेल तेल, ते पेटवीती जळजें सलील**
**जे ज्ञानदीपासम भाविकाला, त्या वंदु साईगुरुराजयाला ॥ ३ ॥**

बाबांना संध्याकाळीं पणत्या लावावयाची भारीच आवड. वाण्यांकडून तेल भिक्षा मागून आणावयाचें. पण रोज कोण अशी भिक्षा देणार ? एक दिवस कोणीहि बाबांस तेल दिलें नाहीं. वेडा फकीर म्हणून आज तेल द्यावयाचेच नाहीं असें त्यांनी कंटाळून जाऊन आपसांत गुप्तपणें ठरवलें होतें.

तेल न मिळाल्यानें बाबा जरा चिंतातूर होऊन स्वस्थ बसले. क्षणार्धांत कांहीं निश्चय करून ते उठले. टमरेलांत पाहिलें तो थोडेसें बुडाला तेल होतें. त्यांत त्यांनीं थोडे पाणी घातलें व तें तेलपाणी पिऊन टाकलें. नंतर पुन्हां टमरेलांत

पाणी घालून तें त्यांनीं पणत्यांत घातलें व वाती पेटवून दिल्या. अन् आश्चर्य ! तेला-प्रमाणें त्या वाती पाणीहि पिऊन उत्तम प्रकारें जळूं लागल्या. वेड्या फकीराची आज 'फजिती' पहाण्यास वाणी मंडळी तयार होतीच. पण हा चमत्कार पाहून येथें कांहींतरी ईश्वरी सामर्थ्य आहे यांची प्रचीति येऊन त्यांनीं बाबांच्या पायांवर मस्तक ठेवून क्षमा मागितली. चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं ! तेव्हांपासून बाबांकडे एक सत्पुरुष म्हणून गांवांतील लोक बघूं लागले व हळूं हळूं बाहेरहि बाबांची कीर्ति पसरूं लागली. पणत्या लावणें म्हणजे अज्ञानी पण भाविक लोकांच्या हृदयांत ज्ञानाचा प्रकाश पाडणेंच होय.

**हिंदू असो मुस्लिम, पारशी वा, देवीस विष्णूस शिवा भजो।**
**वा विशुद्ध ज्या भावचि मान्य झाला, त्या वंदु साई गुरुराजयाला ॥ ४॥**

शरण आलेल्याला भक्ताची जात, गोत, धर्म पंथ अगर तो कोणत्या देवाची उपासना करतो याकडे बाबा लक्ष देत नसत. आपण सर्व एकाच परमेश्वराची लेकरें असून सख्ख्या भावंडाप्रमाणें एकमेकाशी प्रेमानें वागून, एकमेकांच्या संकट-कालीं मदतीला धांवून गेलें पाहिजे. एवढा मानवधर्मच ते फक्त जाणीत असत. त्यामुळें त्यांच्या भक्तांत हिंदू, मुस्लिम, पारशी, जैन, ख्रिश्चन असे विविध धर्मांचे लोक असत. बाबा शुद्ध भावालाच महत्व देत.

**दुःखी प्रपंचीं जरि यत्नशील, येई पदीं नेत्रिं दिसे सलील।**
**पुसूनि तें जे हंसवीति त्याला, त्या वंदु साई गुरुराजयाला ॥ ५॥**

संसारांत प्रयत्न करूनहि जेव्हां दुःखाचें निवारण होत नाहीं तेव्हां माणसाचें लक्ष देव-साधुसंत यांकडे विशेष लागतें. नास्तिकाचेंहि लागतें मग आस्तिकाचें लागेल यांत नवल तें काय? बाबांचे एक भक्त तात्यासाहेब नूलकर यांचे डोळे फार बिघडले. नामांकित नेत्रवैद्य, डॉक्टर यांचे उपचार करून पाहिले. पण व्यर्थ. शेवटीं ते निराश होऊन बाबांचे पायीं शरण आले व दोन दिवस डोळे बांधून सारखा बाबांच्या धावा करीत निपचीत पडून राहिले. दुसरेच दिवशीं बाबांनीं आपल्या निकट भक्ताला हांक मारली व आपल्या डोळ्यावर हात ठेवून ते म्हणाले, 'शामा, माझा डोळा फार दुखतो आहे रे'. हे शब्द बाबांच्या तोंडून निघाल्यापासून नूलकरांचे डोळ्यांस आराम वाटूं लागला व थोड्याच दिवसांत ते औषधाशिवाय पूर्ण बरे झाले. भक्ताला वेदना सहन झाल्यानें बाबांनी त्या स्वतःतर ओढवून घेतल्या. संत असे 'रंजल्या गांजल्यांचे' कैवारी असतात. मानवी प्रयत्न निष्फळ झाल्यावर जे शरण येतात, त्याचींच दुःखें संत निवारण करतात. आळशी निरुद्योगी माणसास संत साह्य करीत नाहींत. हें येथें अवश्य लक्षांत ठेवलें पाहिजे.

**जे संकटें व्याधि महा हरीती, संपत्ति वा संतति इष्ट देती।**
**जे वारिती क्रूरहि अंतकाला, त्या वंदुं साई गुरुराजयाला ॥ ६॥**

भक्तांच्या आधि-व्याधि मानसिक व शारीरिक दुःखें बाबा निवारण करीत तसे त्यांस संसार सुखाचा होण्यासाठीं हवी असलेली संतति व संपत्ति ( गरजे पुरतीच ) मिळेल असें करीत. भक्ताचा अपमृत्यूहि ते टाळीत. कसें तें पहा—नाथ मोठ्या आजारांतून बाबांच्याच कृपेनें उठला पण काय कारण घडलें न कळे; त्याचें दुखणें पुन्हां उलटलें. आतां यांतून आपण वांचत नाहीं असें त्यानें ओळखलें. गीता त्यानें अभ्यासून पचविली असल्यामुळें केव्हांतरी पण निश्चितपणें येणाऱ्या मृत्यूचें स्वागत करण्यास तो आनंदानें तयार झाला. 'या जन्मांत पुरी न करतां आलेली नवविधा भक्ती पुढील जन्मांत उत्तम तऱ्हेनें पुरी करतां येईल अशाच ठिकाणीं हे भगवंता, मला जन्माला घाल' म्हणून त्यानें मनोमय प्रार्थना चालविली. बाबांनीं अंतर्ज्ञानानें हें जाणलें. आपल्या भक्तास मनोमय आशिर्वाद दिला. 'अरे पुढला जन्म कशाला हवा? याच देहांत तुला हवें तितकें भक्तीचें सुख भोग. येच देहीं येच डोळां विठ्ठल पहा!' आणि आश्चर्य! नाथास हळूं हळूं आराम पडत चालला. बाबांची इच्छा पाहून हातांत पाश घेऊन आलेला कृतांत परतला! बाबांनीं अशा तऱ्हेनें वाढवून दिलेल्या आयुष्याचा नाथ उत्तमप्रकारें उपयोग करीत आहे. देह भगवत्सेवेंत कणशः व क्षणशः झिजवीत आहे!

**असंख्य पायीं जरि भक्त येती, जे पारखूनीच कृपा करीती।**
**करूनिला लज्जित दांभिकाला, त्या वंदु साईगुरुराजयाला ॥ ७ ॥**

बाबांच्या पायांशीं असंख्य भक्त जरी शरण येत असत तरीं त्यांची परीक्षा करून तींत उतरल्यासच भक्तावर बाबा कृपा करीत. ढोंगी माणसाचें ढोंग नेमकें ओळखुन तें कौशल्यानें बाहेर काढून त्याची फट्फजीति करीत व तो पश्चात्ताप पावला तरच त्यांच्यावर तें कृपा करीत असत. एकदां एक श्रीमंत गृहस्थ बाबांकडे येऊन ब्रह्मज्ञान शिकवा म्हणून हट्ट धरून बसला. बाबा म्हणाले 'ठीक जरा थांबा' तो बसला. बाबांनीं मग भोवताली बसलेल्या इतर माणसांशीं अवांतर गोष्टी बोलावयास सुरवात केली व मध्येंच एकदम एका मुलास जवळ बोलवून म्हटलें 'जारे, नंदू मारवाड्यास म्हणावें बाबांनीं पांच रुपये उसने मागितले आहेत.' 'नंदू घरीं नाहीं.' असें मुलानें येऊन सांगतांच बाबांनीं त्याला बाळा वाण्याकडे पाठविलें. तेथूनहि तो मुलगा नकारघंटा वाजवीत परत आल्यावर बाबांनीं त्याला चारपांच ठिकाणीं उसने पैसे मागावयास पाठविलें पण त्याला सगळीकडून हात हलवीत परत ऱ्यावें लागलें. तो श्रीमंत गृहस्थ हा सर्व प्रकार पहात होता. पण त्याला बाबांकडून ब्रह्मज्ञान मिळविण्याची उतावीळ झाली होती. तो कंटाळून बाबांना म्हणाला 'बाबा, दाखवितां ना मला ब्रह्म?' त्यावर बाबा एकदम म्हणाले 'अरे मुर्खा मी इतका वेळ केलेली सर्व धडपड फुकट गेली. खिशांत अडीचशें रुपये असून माझी पांच रुपयांची गरज-तेहि उसने-तुला भागवितां आली नाहीं. पांच रुपयांचा लोभ सोडतां येत नाहीं व ब्रह्मज्ञान हवें म्हणतोस! तें कसें रे तुला मिळणार? कोणचीहि गोष्ट जगांत फुकट मिळत नसते. प्रेम द्यावें तेव्हां प्रेम मिळतें. ब्रह्मज्ञान काय वाटेवर पडलें आहे? समूळ वासना

त्याग त्यासाठीं आधीं अवश्य आहे. काढ तुझ्या खिशांतले सर्व पैसे व दे आधीं दक्षिणा म्हणून.' तो गृहस्थ हें सडेतोड भाषण ऐकून खजील झाला. त्यानें खिशांतून पैसे काढले व मोजून पाहिले तों नेमके अडीचशें रुपये!

**विरुद्ध वाटे कृतिवाक् जयांची, ठरे परी अंतिम ती हिताची।**
**भक्तां असा प्रत्यय कैक वेळां, त्या वंदुं साई गुरुराजयाला ॥ ८ ॥**

बाबांचें बोलणें अगर वागणें कित्येक वेळां वरवर पाहाणारास विरुद्ध व चमत्कारिक वाटे. पण बाबांच्यावर पूर्ण श्रद्धा ठेवणारे भक्त त्यांची आज्ञा निमूटपणें पाळीत व ती आपल्या हिताचीच असल्याबद्दल त्यांना अनुभव येई. उदा. (अ) बाबांचे परमभक्त काका महाजनी एकदां आठ दिवसांची रजा काढून शिरडीस गोकुळाष्टमीचा उत्सव पाहाण्यासाठीं गेले. दर्शन घेतांच बाबांनीं विचारलें 'काका, तूं परत केव्हां जाणार?' हा चमत्कारिक प्रश्न ऐकून आपल्या मनांतली इच्छा दाबून ठेवून काका हात जोडून म्हणाले 'आपण सांगाल त्या क्षणीं परतण्याची माझी तयारी आहे!' 'तर मग उद्यां सकाळच्या गाडीनें परत जा!' बाबांनीं आज्ञा दिली. त्याप्रमाणें काका निमूटपणें मुंबईला येऊन रजा रद्द करून घेण्यासाठीं कचेरीत पाऊल ठेवतात तों त्यांना आठवलें कीं आपल्यावाचून काम खोळंबलेलें! काकांचा जोडीदार एकाएकीं आजारी झाल्यामुळें त्यांचें काम करण्यास दुसरा लायक इसम नव्हता. विवंचनेंत असलेला साहेब काकांना पाहतांच खुष झाला! 'मंजूर झालेली रजा अडचणीमुळें नामंजूर केली आहे. कामावर तावडतोब हजर व्हा' असें पत्र साहेबानें आदल्या दिवशींच शिरडीस रवाना केलें होतें. काकांना बाबांच्या आज्ञेचा अर्थ कळून गहिंवरून आलें. भक्तांचे हितास बाबा असे फार जपत असत.

(ब) या उलट अनुभव एका गोऱ्या साहेबास आला. द्वारकामाईंत शिरण्याची परवानगी बाबांनीं न दिल्यामुळें तो रागावला व तावडतोब जाण्यास निघाला. बाबांनीं त्याला बाहेर उघड्यावर बांधलेल्या राहुटींत एक रात्र राहण्यास सांगितलें. तें न ऐकतां तो परतला. परत टांग्यांतून जातांना समोरून सायकल टांग्यांवर आदळून टांगा उलटला व साहेब उलटा पालटा खालीं पडला व मार चांगलाच बसल्यामुळें कोपरगांवचे हॉस्पिटलमध्यें कण्हत कांहीं दिवस त्यास राहावें लागलें. बाबांची आज्ञा न मानल्याबद्दल त्यास प्रायश्चित्त मिळालें!

एकदां एक रोगी बाबांकडे आला. डोळे लाल व खुप सुजलेले. बाबांनीं थोडे बिब्बे टेंचून दोन गोळे तयार करून ते एकेका डोळ्यांत कोंबले व फडक्यानें डोळे घट्ट बांधून टाकले. काहीं वेळानें फडकें सोडून डोळ्यावर पाण्याची संतत धार धरली. मग आश्चर्य! थोडक्याच वेळांत सूज साफ उतरली व डोळे स्वच्छ झाले! डोळ्यासारख्या नाजूक भागांत बिब्बे घालून ते बरे करण्याचें धाडस व सामर्थ्य बाबांच्यासारख्या असामान्य सत्पुरुषांतच पहावयास मिळतें!

**‘ श्रद्धा ’ ‘ सबूरी ’ जरि शब्द दोन, विशाल अर्थे भरले म्हणून।**
**समर्पिती जे शरणांगताला, त्या वंदुं साईगुरुराजयाला ॥ ९ ॥**

परमार्थसाधनांत दोन गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत:–श्रद्धा व सबूरी. श्रद्धेनें औषध घेतलें तर गुण फार लौकर येतो. सांथीच्या दिवसांत पुरेसा इंजेक्शन-द्रव्य दुर्मिळ झाल्यामुळें ‘ Distilled Water ’चे जरी इंजेक्शन डॉक्टरनें दिलें तरी गुण वाटला अशीं उदाहरणें घडलीं आहेत. उपास्य दैवत, सत्पुरुष, संतांची वचनें यावर श्रद्धा जर दृढ असली तर साधकाची प्रगति झपाट्यानें होते. शिवलील अमृतांतील चवथ्या अध्यायांत गोपबाळाची कथा आहे. राजानें केलेली षोडशोपचार पुजा पाहून झाल्यावर त्या बाळानें दगडाचें देव मांडून दगडाचेंच गंध, पुष्प, धूप, दीप नैवद्य इत्यादि उपचार समर्पण केलें. त्याचे आईनें अज्ञानानें–मुलगा जेवायला येत नाहीं म्हणून रागानें बाळानें केलेली शिवपूजा उधळून टाकल्यावर, त्यांच्या रडण्यामुळें दया येऊन भगवान् शंकरांनीं तेथें रत्नखचित शिवमंदिर क्षणार्धांत निर्माण केलें ! हा दृढ श्रद्धेचा प्रभाव !

सबूरी म्हणजे उतावीळपणा न करणें ‘पी हळद व हो गोरी ’ हें व्यवहारांत अशक्य तसेंच परमार्थांत मातेचे उदरांत गर्भ नऊ महिनें पुरे राहून बाहेर येतो तेव्हांच तो चांगला पोसला गेल्यामुळें घडधाकट बनतो व लौकर वाढतो. आंब्याची कोय जमिनींत पुरल्यावर दुसरें दिवशीं कांहीं आंब्यांचें मोठें झाड एकदम निर्माण होऊन त्याला पिकलेलें आंबे लागत नाहींत. प्रत्येक गोष्टीला फळ येण्यास कांहीं काळ जाऊं दिलाच पाहिजे. नोकरींत काम करीत असतां पगाराची चिंता न करतांहि पहिल्या तारखेस पगार त्याला मिळतोच. भगवंताची भक्ति श्रद्धेनें करीत राहिले म्हणजे तिचें फळ योग्य काळीं देण्याची चिंता भगवंताला लागून राहिलेली असते.

**स्वाधीन ज्यांच्या जरी पंच भूतें, सत्ता तरी गाजविती क्वचित् ते**
**येधीर जैं संकट मानवाला, त्या वंदुं साईगुरुराजयाला ॥ १० ॥**

पंचमहाभूतांवर बाबांची सत्ता चालत असें तरी तिचा उपयोग ते विशेष प्रसंगीं समाजाचें जीवन धोक्यांत येई तेव्हांच करीत असत. एकदां शिरडींत भयंकर वादळ एकाएकीं सुरू झालें. वारा सुं सुं वाहूं लागला; थोड्याच वेळांत मेघाचा गडगडाट व विजेचा कडकडाट सुरू झाला व नंतर पाऊस इतका मुसळधार पडूं लागला कीं, शिरडी पाण्यात बुडून वाहून जाते कीं काय असें वाटूं लागलें. भ्यालेले पशु–पक्षी व लोक द्वारकामाईकडे आसऱ्यासाठीं धांवले. त्यांची ती केविलवाणी अवस्था पाहून बाबांस दया आली. ते मशीदीबाहेर आले व आकाशाकडे पाहून गंभीरवाणीनें ओरडले ‘ थांब थांबव तुझा हा नंगा नाच आणि शांत हो ! ’ आणि दोन मिनिटांच्या आंतच पाऊस थांबला. विजांचा कडकडाट थंड झाला व सर्व वातावरण शांत झालें. पशु पक्षांस व नागरिकांस आपला पुनर्जन्मच झाला असें वाटून त्यांनीं बाबांचे पाय अश्रूंनीं भिजविले.

**केले चमत्कार जरी क्षणैक, न पाहतूनी बुडतात लोक ॥**
**ज्यांनीं सुपंथा वळवावयाला, त्या वंदुं साई गुरु राजयाला ॥ ११ ॥**

लोक अज्ञानामुळें मानवीदेहाचा उपयोग योग्य तसा करीत नाहींत. आपण कोण हें जाणण्याचीही त्यांस इच्छा होत नाहीं, ' खा प्या व मजा करा. ' ऋण काढून सण करा ' हेंच बहुतेकांचें ध्येय; असें जाणून त्यांना परमार्थाची गोडी लावण्यासाठीं, बाबा आपल्या अंगाचें अदभुत सामर्थ्य वापरुन वर वर्णन केल्याप्रमाणे चमत्कार सहज दाखवींत. चमत्काराशिवाय नमस्कार करीत नसतात.

**ज्यांच्या उदीचा अजब प्रभाव, ती सेवितां ठेकुनि पूर्ण भाव ।**
**हरी महान संकट तत्क्षणाला, त्या वंदुं साईगुरुराजयाला ॥ १२ ॥**

आपल्याकडे येणाऱ्या व्याधिग्रस्त भक्ताला बाबा प्रथम औषधपाणी देऊन बरें करीत. पण नंतर धुनींतील उदीच ते औषधाऐवजीं देऊं लागले. या त्यांच्या कृतींतहि गूढ अर्थ आहे. आपण प्राणापलीकडे ज्यांच्यावर प्रेम करतों तीं स्त्री पुत्रादि कुटुंबांतील माणसें, घरदार, धनदौलत इतकेंच काय, आपण नित्य नटवतों त्या देहाचीहि शेवटीं ( तीन चिमट्या ) राखच होणार आहे, याची भक्तांस जाणीव उदीभस्माच्या द्वारें बाबा देत असत. या उदीनें हजारों भक्तांच्या आधिव्याधि आजपर्यंत दूर केल्या आहेत.

बाबांनीं स्वहस्तानें दिलेली उदी जितकी गुणकारी तितकीच त्यांच्या नांवानें दिलेलें भस्महि गुणकारी ठरत असे. नानासाहेब चांदोरकर पत्नीसह ठाण्याहून कल्याणला जात असतां ठाण्याचें स्टेशनवर त्यांचा एक मित्र त्यांस घाईघाईनें भेटला व मुलीस प्लेग झाला असें सांगूं लागला. नानासाहेबांजवळ त्यावेळीं उदी नव्हती. तेव्हां प्रसंग जाणून त्यांनीं थोडी माती चिमटींत घेऊन त्या मित्राला दिली व बाबांचे भक्तिपूर्वक स्मरण करून ही मुलीचे सर्वांगास लाव म्हणून सांगितलें. मित्रानें त्याप्रमाणें श्रद्धेनें करतांच प्लेगसारख्या असाध्य रोगांतून ती मुलगी वांचली व लवकरच पूर्ण बरी झाली. आपल्या भक्ताचा शब्द खरा करण्याची काळजी बाबा घेत व अजूनहि घेत असतात.

**भालीं उदी नाम सदा मुखांत, रत स्वधर्मी नि विशुद्ध चित्त ।**
**असाचि भक्त प्रिय ज्यांस झाला, त्या वंदुं साईगुरुरायाला ॥ १३ ॥**

प्राप्त कर्तव्य शुद्ध मनानें करणारा अखंड भगवन्नामस्मरण करणारा, बाबांनाच परमेश्वर मानणारा, भाल प्रदेशावर नित्य उदी धारण करणारा असा भक्त बाबांना फार आवडतो.

**झाले समाधिस्थ तरीहि भक्तां, जे पावती आजहि हांक देतां ।**
**माता जशी प्रेमळ बालकाला, त्या वंदू साईगुरुराजाला ॥ १४ ॥**

बाबा समाधिस्थ होऊन ४५ वर्षें लोटलीं असलीं तरी असूनहि संकटकालीं भक्तांनीं आर्तस्वरानें हांक दिली तर ते धांवून येतात व भक्तांचे संकट दूर करतात.

ज्याला दर्शनाची उत्कंठा असेल त्यास स्वप्नांत दर्शन देतात. आई घरकाम करीत असतां तिचें लक्ष जसें पाळण्यांतल्या अगर बाहेर खेळणाऱ्या मुलाकडे असतें व त्याचा ओक्साबोक्शीं रडण्याचा आवाज ऐकतांच ती हातचें काम सोडून त्याच्याकडे धांवून जाते तसेच बाबा आहेत. भक्तांना असे आलेले अनुभव श्रीसाईलीला मासिकांत दर अंकीं येत असतात. ते जिज्ञासूंनीं वाचून पहावेत.

जरी हें शरीर गेलों मी टाकून, तरी मी धावेन भक्तांसाठीं। अशी बाबांची प्रतिज्ञा आहे—आश्वासन आहे.

**(व. ति.) स्फूर्ती दिली स्तवनिं अंतरीं साइनाथें**
**हें स्तोत्र तेंवि लिहिलें नत-विश्वनाथें।**
**सश्रद्ध जो पठण हें नियमें करील**
**बाबा सदा सदय त्याप्रति रक्षितील ॥ १५ ॥**

बाबांनीं हृदयांत प्रेरणा दिल्याप्रमाणें नम्र भक्त विश्वनाथानें हें त्यांचें स्तोत्र रहस्यासह लिहून काढलें आहे. श्रद्धेनें व नियमितपणानें याचें पठण जो करील त्याच्यावर बाबांची सदैव कृपादृष्टि राहील व हरएक संकटांतून बाबा निःसंशय त्यास पार नेतील.

---

मूर्तीच्या दर्शनानें माझ्या मनांत प्रेमादराची भावना जागृत होत नसली तरी मी मूर्तीपूजेवर विश्वास ठेवणारा आहे. मूर्तीपूजा मानवी स्वभावाचा एक भाग आहे. आम्हीं प्रतीमेच्या मागें लागणारें आहोंत. इतर ठिकाणापेक्षां मंदिरांत गेल्यानें मनांत सहाजिकच भक्तिभाव उत्पन्न होतो. मूर्ति भक्तिमार्गांत सहाय्यकारी होऊन रहातात.

**—महात्मा गांधी**

---


# लहान मुलांच्या आंकडीवर

**जुनें आणि प्रसिद्ध औषध**

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल चर्डालाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# मी व माझे अस्तित्व

लेखक : केशव कृष्ण प्रधान

" You cannot be a saint over night " खरीखुरी संतस्थिती म्हणजे सर्व वस्तुशी एकरुप होण्याची स्थिती. ही स्थिती एका रात्रींत प्राप्त होत नाहीं. आणि ती तशीं मानवाला प्राप्त झाली तर त्यांत कांहींच अर्थ नाहीं. 'उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमव सादयेत' ह्या गीतेंतील भगवंत उक्तीचा अर्थ प्रयत्नांती परमेश्वर असाच आहे. परमेश्वर प्राप्तीसाठीं महान् तपश्चर्या करावी लागते. हाडाची काडे करावी लागतात. 'चणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रह्मपदी नाचे' या श्रीतुकाराम महाराजांच्या म्हणण्याप्रमाणें परमेश्वर प्राप्ती ही मानवाच्या प्रयत्नांची परीसीमाच आहे. मानवाच्या सर्व इच्छामध्यें, परमेश्वर प्राप्तीच इच्छा ही सर्वांत श्रेष्ठ प्रकारची इच्छा आहे व त्या इच्छेची पूर्ती ही सर्वांत श्रेष्ठ अशा मानवी प्रयत्नांचे निदर्शक आहे.

मन, बुद्धी मागील परमात्म स्वरुपाचें दर्शन करून देणें ही क्रिया, एका सजीव मानवानें दुसऱ्या सजीव मानवांत घडवून आणण्याची क्रिया आहे. Life alone can light life. एका जीवन-ज्योतीनें दुसरी जीवन ज्योत पेटवावयाची असतें. हेंच जगांतील महान् सत्य आहे. आणि यासाठींच गुरूची जरूरी आहे असें म्हणतात. संतांची चरित्रें वाचून, किंवा जगांतील सर्व तत्वज्ञानाचे ग्रंथ अभ्यासून सुद्धां ही परमात्मदर्शनाची स्थिती मानवाला साध्य करून घेतां येत नाहीं. यांचे कारण असें की संतविषयक वाङ्मय हें जिवंत ( विचार करून उच्चारलेल्या ) शब्दांपेक्षां दुय्यम प्रतीचे असतें. एका अर्थी त्यांतील रसरशीत जिवंतपणा तितक्याच प्रमाणांत कमी झालेला असतो. व म्हणूनच मला माझ्या दिव्य शक्तीनें तुला येथें खेचून आणावे लागले."

त्या महापुरुषाची दिव्य वाणी हळूं हळूं शुभ्र गंगौघासारखी वहात होती. "या सृष्टीत इतस्ततः विखुरलेल्या लोभस विषय सुखानें परीप्लुत अशा शेकडो वस्तुवर तुझी बहीर्दृष्टी आज जन्मोजन्मी खिळून राहिली आहे. त्यांच्याकडे सतत पाहून त्यांच्या उपभोगाची सतत लालसा मनामध्यें बाळगुन तुझ्या पंचेन्द्रीयांच्या कणाकणावर त्या विषयांची प्रतिकचिन्हे स्पष्ट उमटलेली आहेत. या बाहेरील वैषयीक वस्तू तुझ्या मन, बुद्धी अंतःकरणाला तृप्तता, शांती, सुख, समाधान देण्यास असमर्थ असूनसुद्धां, त्यांचा जर नाश झाला तर तुला तुझे जीवन दुःसह वाटेल. कारण की तू तुझ्या मनाला युगे नू युगे अशीच शिकवणूक देत आला आहेस कीं तू केवळ ह्या विषयसुखासाठींच जगत आहेस. खरी वस्तुस्थिती अशी आहे कीं या विषयसुखामागे

दडून त्यांना केवळ आपला परावर्तीत प्रकाश देऊन, सर्व सुख शांती समाधानाचा सागर जो परमात्मप्रभु तो प्रच्छन्न स्वरूप आहे. तुझ्याकडे पाहून तुझ्या त्या विषय-सुखांना पकडून त्यांचा पूर्ण उपभोग घेण्याच्या प्रयत्नांना तो मिस्किलपणें खदखदून हंसत आहे. ही तुझी युगे नू युगे चालत आलेली फसवणूक परमात्म्याच्या ज्या परावर्तीत प्रकाशस्वरूपानें होते त्या स्वरूपाला माया असें म्हणतात. देवादिकांचीदेखील त्रेधा उडवणारी ही हरीची माया महान् प्रबळ आहे. श्रीसद्गुरू साईबाबांसारख्या श्रेष्ठ विभूतीसुद्धां 'अरे! मला तो नारायण तेली फारच गांजतो. ती रोहिल्याची बाईल मला बाजायला बघते बघ. शिरडीच्या तेली, तांबोळयांनीं मला फारच छळलं. व म्हणून मी आतां शिरडी सोडून जातो.' अशा वचनांनी ही प्रभुची माया निदर्शीत केली आहे. काल परवांच मी तुला विषय सुखामागें दडपणारा हा परमात्म प्रभू त्याच्या निखळ स्वरूपांत दाखविला व त्याच्या प्रच्छन्न परावर्तीत स्वरूपाचा, विषयांना लोभस करणारा पडदा तुझ्या बाह्यदृष्टीवरून फाडण्याचा प्रयत्न केला. याचा अर्थ असा नव्हे कीं तो परमात्मा प्रभू तुझ्या हातांत आतां पुरा सांपडला आहे. त्याला पुन्हा पुन्हा पकडून त्याच्याशीं कायमचे सख्य जोडणें हें आतां तुझें काम आहे. माझें नव्हे व त्यासाठीं तुला पुन्हा पुन्हा अंतर्मुख होऊन त्या सुखशांती समाधानाच्या परमोच्च बिंदूला गाठले पाहिजे. अरे! तुला अंतर्मुख करून मन बुद्धीमागें नेऊन जो आनंद तुला प्राप्त करून दिला त्या आनंदाला तुमच्या व्यवहारीक मार्पेत Standard Joy व Bliss असें म्हणतात. विषय सुखांत हाच आनंद आपल्याला सापडेल अशा भोळ्या समजुतीनें अखील मानव जात त्या विषय सुखामागें हात धुवून लागली आहे. ते विषय सौख्यमय आहेत, असें मानवाला पदोपदीं जे वाटते त्याचे कारण हाच परमात्याचा Satndard Joy छाया स्वरूपांत त्यांच्या भोवताली भरून राहातो. मानवांची खरी इच्छा विषयांतून परावर्तीत प्रकाशमान होणाऱ्या परमेश्वराला पकडण्याची आहे. परंतु हा मानवाचा प्रयत्न निव्वळ मृगजळ पिण्यासारखा आहे.

मानवांची पंचेन्द्रीये मूलतः परमेश्वरी आनंद प्राप्त करून घेण्यास असमर्थ आहेत. एकेका इन्द्रीयाला, सृष्टी नियमाप्रमाणें नेमून दिलेले काम एकांगी स्वरूपाचे आहे. डोळे पाहाण्याचे, कान ऐकण्याचे, नांक हुंगण्याचे, जीभ चव घण्याचे, हातपाय चालण्याचे व क्रिया करण्याचे अशी नेमून दिलेलीच कामे करू शकतात. त्यांना दुसऱ्या इंद्रीयांची कामें करता येत नाहींत. विषय सुखाचा उपयोग घेताना एकेका इंद्रियांची भिन्न भिन्न कार्यक्षमतेमुळें विषय सुखांचा आनंद सर्व इंद्रायांनी एकाच वेळेला माणसाला घेताच येत नाहीं. जरी समजा घेता आला, तरीं तो आनंद मुळांतच परमेश्वराच्या परावर्तीत स्वरूपाचा असल्यामुळें नकली स्वरूपाजा असतो. व त्यामुळें तो मानवाला परीपूर्ण समाधान देऊ शकत नाहीं. तो निखर आनंद नसून तो केवळ आनंदाची छाया पकडल्याचाच आनंद असतो. व म्हणूनच तो पूर्ण समाधान

देऊ शकत नाहीं. व दुसरे म्हणजे तो हातात फार वेळ राहूही शकत नाहीं, हे उघड आहे. ह्या फसवणूकींतून सुटण्याचा एकच मार्ग आहे व तो म्हणजे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात त्याप्रमाणें सर्व इंद्रियांना डावलून (चोरुन) ते सुख घेणे. त्यासाठीं मानवानें आपली बहिर्दृष्टी बंद करुन बाह्यसुखांना पकडणाऱ्या मन बुद्धींना बाजूला सारून त्या सर्वांमागील परमात्मस्वरूपांत अंतस्फुर्तीनें थेट उडी घेणें. व त्या परमात्म स्वरूपाच्या डोहांत सदैव निमग्न होऊन राहाणें. तुला दाखविलेले परमात्म स्वरूपांत वारंवार पहाण्याचा प्रयत्न करशील तर कांहीं दिवसांनीं तुला ह्या बाह्य सुखाचा आपोआप वीट येऊं लागेल. व तुझ्या आंतील परमात्म सौख्य उत्तरोत्तर वाढीला लागेल व हरीच्या मायेची तुझ्यावर असलेली प्रबळ पकड हळू हळू ढिली होत जाईल. मानव हा Self Hypnotized आहे. त्याच्या डोळ्यावरील बाह्य सृष्टीचें पटल हा एक मोठा भ्रम असून ते एक त्याचे Self Deception आहे. त्याला De Hypnotized करण्याचा हा वर सांगितलेला एकच मार्ग आहे. दुसरा मार्ग नाहीं. परमात्म स्वरूपाचे दर्शन महापुरुषाच्या सान्निध्यांत झाल्यावर सुद्धा मानवाची फसवणूक होतच राहाते. ही फसवणूक बंद होण्यासाठीं मानवाला भागीरथ प्रयत्न करणे आवश्यक आहे व म्हणूनच गीतेंत प्रयत्नांची थोरवी वर्णन केली आहे. 'नर करणी करे सो नरका नारायण बन जाता है, ह्या उक्तीचा अर्थ हाच. शेकडो–हजारो लोक ते अंतिम पद प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत असतात परंतु एखादाच त्या स्थळी पोहचतो. त्याचे कारण परमात्म स्वरूप प्रत्यक्ष दाखविणारे महापुरुष ह्या अखील अखील पृथ्वीतलावर दुर्मीळ व एखाद्या महाभागाला अशा महा पुरुषांचा लाभ झाला व त्यानें ते स्वरूप दाखविले तरी देखील स्वप्रयत्नांनी ते पूर्णपणे आत्मसात करून घेणें हे महादुष्कर काम आहे. वाटेत ठिकठिकाणी मायेचे वाटपाडे दरवडेखोर टपलेले आहेतच. म्हणूनच भगवंतानी 'यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः' असें गीतेत म्हटले आहे.

एकदा का ह्या परमात्म स्वरूपाचे दर्शन झाले की मी तुला सांगीतल्याप्रमाणें मानवाची स्थिती माणसाच्या रक्ताला चाटावलेल्या शार्दूळा प्रमाणें होते. विषय सुखाचे सर्व किरकोळ आनंद सुद्धा त्यानंतर तो कित्येक वर्षे हाताळतच असतो. परंतु दरवेळेला त्या त्या विषय सुखापासून मिळालेल्या आनंदाची तुलना मन बुद्धी मागील परममंगल महान सुखाशी करतो. व त्या महान सुखाच्या पासंगालासुद्धा ते विषयसुख येत नाही ही भावना दृढ होत जाते. व नंतर त्याच्या जीवनांत एक वेळ अशी येते कीं त्या महान मंगल सुखाशिवाय एकही क्षण जगणें त्याला अशक्य होऊन बसते. व शेवटी तो त्या परमसहासुखाचा शरीर, मन, अंतःकरणासहीत एक अविभाज्य घटक होतो. या स्थितीला स्थितप्रज्ञ अवस्था असें म्हणतात अर्जुनानें श्रीभगवंताना कुरुक्षेत्रावर या स्थितिप्रज्ञाचे मोठ्या कुतूहलानें वर्णन करण्याची विनंती केली. ('स्थितप्रज्ञस्य का भाषा........किमासीत व्रजेत किम') तेच

# ‘ पूर्णात् पूर्णम् ’

—संत विनोबा

श्रुतीचें वचन आहे,“पुर्णात् पुर्णमुदच्यते”। ‘पूर्णांतून पूर्ण’ हा नैसर्गिक विकासाचा नियम आहे. ह्याचा अर्थ काय ? जर आधींच च पूर्ण आणि मागुन हि पूर्ण तर ‘विकास’ कसला ? अपुर्णांतून पूर्ण म्हटलें म्हणजे ‘विकस’ समजतो, पण ‘पूर्णांतून पूर्ण’ ही भाषा च अर्थशून्य भासते.

अर्थशून्य भासते खरी तरी त्यांत खोल अर्थ आहे. पूर्णांतून पूर्ण म्हणजे लहान पूर्णतून मोठें पुर्ण. नुकतें च जन्माला आलेलें मूल हि पूर्ण आहें. वीस वर्षांचा तरुण हि पूर्ण आहें. पहिलें लहान पूर्णाचें उदाहरण आहे. दुसरें मोठ्या पूर्णाचें आहे. बालकाला एक डोळा होता किंवा अर्धे नाक होते आणि तरुणाला दोन डोळे झाले किंवा पुरतें नाक आलें असें नाहीं. दोघांनाहि दोन डोळे आणि दोन डोळ्यामध्यें एकच नाक. दोघेहि पूर्ण. एक लहान आणि एक मोठा एवढाच फरक.

दोन इंचांची सुरेखा हीहि पूर्ण सुरेखा चार इंचांची सुरेखा हीहि पूर्ण सुरेखा. पहिली लहान आणि दुसरी मोठी. दोन इंच व्यासाचें वर्तुळ हेंहि पूर्ण वर्तुळ आणि चार इंच व्यासाचें वर्तुळ हें हि पूर्ण वर्तुळ. पहिलें लहान आणि दुसरें मोठें.

फळ्यावर काढलेलें आवळ्याएवढें वर्तुळ विकासक काचेंतून पाहिलें तर भोपळ्याएवढें दिसलें. म्हणजे विकासक काचानें काय केलें ? कसला ‘ विकास ’ केला ? अपूर्ण वर्तुळाचें पूर्ण वर्तुळ बनाविलें ? कीं लहान पूर्ण वर्तुळाचें मोठें पूर्ण वर्तुळ बनविलें ? विकासक काचानें एवढेंच केलें कीं जें आंवळ्याएवढें पूज्य होतें त्याचें भोपळ्याएवढें पूज्य केलें !

---

वर्णन मी तुला सोप्या शब्दात वर सांगितले आहे. परमात्मस्वरूपाच्या आनंदा शिवाय मला जगताच येणार नाहीं, या माणसाच्या प्रज्ञेला ऋतंभरा प्रज्ञा असें म्हणतात. तर मी परमात्म सुखच झालो, स्वतःबनलो, भोवतालची सर्व जड अजड सृष्टी ही परमात्म स्वरूपानें नटलो आहे, या कायम बुद्धीस स्थितप्रज्ञा असें म्हणतात. ही बुद्धी आता स्थिर झाली, ही जगाच्या अंतापर्यंत देखील चळणार नाही, अशा स्थितीस जाण्याचा वर मी वर्णन केलेला एकच मार्ग आहे. व तो चोखाळण्यास कोणत्या तऱ्हेची माणसें पाहीजेत हें श्री तुकाराम महाराजांच्या शब्दात' येथे पाहिजे जातीचे एर गबाळ्याचे काम नाहीं असे सांगीतले पाहीजे” एवढे म्हणून तो सत्पुरूष समाधीसुखांत मग्न झाला.

---

आणि खरोखरच शिक्षणशास्त्र ह्यापेक्षां कांहींच करूं शकत नाहीं. शिक्षणशास्त्राची व्याख्याच करावयाची तर 'आवळ्याएवढ्या पूज्यांतून भोपळ्याएवढें पूज्य' अशी खुशाल करावी. शिक्षणानें आंवळ्याचा भोपळा बनेल किंवा सामर्थ्याच्या भाषेंत मूर्खांचा पढत मूर्ख बनेल किंवा फार तर अर्धवट शहाण्याचा दीड शहाणा बनेल.

पण हा विनोद सोडून देऊन त्यांतला भाव ग्रहण केला तर निसर्गाच्या विकासाचें 'पूर्णातून पूर्ण' हें सूत्र कसें, तें ध्यानांत येईल. पहाटे पांच वाजतां समोरचा वृक्ष मला अंधुक दिसत आहे. सबंध दिसत आहे, पण अंधुक. साडे पांच वाजतां थोडा स्पष्ट दिसूं लागला. पूर्वीसारखाच सबंध दिसत आहे, पण थोडा स्पष्ट. सूर्योदय झाल्यानंतरहि सबंध वृक्ष दिसतो. पण अत्यंत स्पष्ट. पांच वाजतां पाव वृक्ष दिसला, साडे पांच वाजतां अर्धा दिसला आणि सूर्योदयानंतर सबंध दिसला असें होत नाहीं. तिन्ही वेळां संपूर्ण दिसला. पण पहिल्या वेळीं अस्पष्ट संपूर्ण, दुसऱ्या वेळीं स्पष्ट संपूर्ण, तिसऱ्या वेळीं अति-स्पष्ट संपूर्ण. 'अस्पष्ट, स्पष्ट, अतिस्पष्ट' हा विकास सूर्यप्रकाशानें केला. पण तिन्ही वेळां 'संपूर्णा'चाच विकास केला. लहान पूर्णातून मोठें पूर्ण अस्पष्ट पूर्णातून स्पष्ट पूर्ण, हा नैसर्गिक विकास होय.

'अपूर्णातून पूर्ण' म्हणजे काय, आणि 'पूर्णातून पूर्ण' म्हणजे काय, हें समजण्यासाठीं आपण एक दृष्टांत घेऊं. समजा, समुद्राच्या तीरावर आपण उभे आहों. आपल्याला समुद्रांत आतां जहाज वगैरे कांहींच दिसत नाहीं. थोड्या वेळानें एक जहाज दिसूं लागलें. म्हणजे जहाजाचें नुसतें वरचें टोंक दिसूं लागलें. आणखी थोड्या वेळानें मधला भाग दिसूं लागला. आतां संपूर्ण जहाज दिसूं लागलें. संपूर्ण पण दूर असल्यामुळें अस्पष्ट. ह्यापुढें जसजसें तें जवळ येऊं लागलें तसतसें तें अधिक अधिक स्पष्ट दिसूं लागलें. पहिल्या क्षणीं संपूर्ण जहाज दिसेपर्यंतच्या दर्शनाला आपण 'अपूर्णातून पूर्ण' म्हणूं. नंतरच्या दर्शनाला आपण 'पूर्णातून पूर्ण' म्हणूं.

एक शिक्षक विद्यार्थ्यांना हिंदुस्थानचा भूगोल शिकवीत आहे. त्यानें मुलांना आधीं सबंध हिंदुस्थानचा नकाशा दाखविला. नंतर त्यांतले निरनिराळे प्रांत सांगितले. पुढें सर्व प्रांतातल्या नद्या दाखविल्या. मग सर्व प्रांतातली ऐतिहासिक, धार्मिक व्यापारी महत्त्वाचीं स्थानें दाखविलीं आणि अशीच सूक्ष्म सूक्ष्म माहिती देत गेला. हा शिक्षक विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला 'पूर्णातून पूर्णाकडे' नेत आहे. दुसरा एक शिक्षक असाच विद्यार्थ्यांना हिंदुस्थानचा भूगोल शिकवीत आहे. पण प्रथम त्यानें एका जिल्ह्याची अगदीं सूक्ष्म माहिती विद्यार्थ्यांना दिली. नंतर दुसऱ्या जिल्ह्याची असें करतां करतां अखेर एका प्रांताची माहिती झाली. आतां ह्या विद्यार्थ्यांना एका प्रांताची अगदीं सूक्ष्म माहिती झाली. पण इतर प्रांतांची अशीच सूक्ष्म सूक्ष्म माहिती अखेर हिंदुस्थानची माहिती. 'हिंदुस्थानचा भूगोल शिकविणें' ह्या मुद्यापुरतें बोलावयाचें तर हा शिक्षक विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला 'अपूर्णातून पूर्णाकडे' नेऊं पाहत आहे असें म्हणतां येईल.

# श्रीगुरु नानक यांची शिकवण

लेखक : **गणेश विष्णु कवितकर**, एम्. ए.

**इ.** स. १४५० ते १७०० पर्यंतच्या कालांतील भक्तिप्रचार आंदोलन हें बौद्धमत आंदोलनानंतरचे सर्वांत मोठें आंदोलन समजलें जातें. या कालास भक्तिकाल असेंहि म्हणतात. बौद्धकालानंतर निस्तेज झालेल्या वैष्णवभक्तीला व रामभक्तीला फुंकर घालून वाढविण्याचें ध्येय भक्तिप्रचाराचे प्रवर्तक स्वामी रामानंदजी यांना आहे. त्यांच्या कबीर, रविदास, सेन इत्यादि भक्तगणाखेरीज नामदेव, चैतन्य महाप्रभु, सुंदरदास इत्यादि अनेक संत या कालांत होऊन गेले. गुरु नानक आणि गोस्वामी तुलसीदास हे प्रत्यक्ष रामानंदांचे शिष्य नव्हते तरींहि त्यांची गणना त्यांच्या शिष्यश्रेणींत केली जाते. कारण त्यांनींहि भक्तीचा बराच प्रचार केला. प्रस्तुत लेखांत श्रीगुरु नानकांच्या जीवनाचा व कार्यांचा संक्षेपानें विचार करावयाचा आहे.

## समाजाची एकसंघ रचना

शिष्य या संस्कृत शब्दापासून शिख हा पंजाबी शब्द तयार झाला. गुरु नानकापासून ते गुरू गोविंद सिंहापर्यंत जे गुरू झाले त्यांनीं उत्तर भारतांत विच्छिन्न आणि गतवीर्य झालेल्या समाजाची एकसंघ रचना केली. त्यांनीं जनतेंत धैर्य आणि तेज निर्माण केलें. या गुरूंचे शिष्य म्हणजेच शिख होत. शिख परंपरेचे संस्थापक

---

आत्म्याच्या विकासाचें पूर्णांतून पूर्णाकडे हें सनातन सूत्र आहे. कोणत्याहि आत्मज्ञान वस्तूच्या विकासाला तेंच सूत्र लागू होणारें आहे.

क्ले मॉडलिंगच्या ( म्हणजे मातीचे पुतळे वगैरे बनविण्याच्या ) कलेविषयींच्या एका पुस्तकांत पुतळा अपूर्णांतून पूर्णाकडे घेऊन जाण्याच्या रीतींचा निषेध केला आहे. सुरवातीला मातीला वाटेल तसा आकार देऊन शेवटीं इष्ट आकार आला म्हणजे झालें ! अशा कल्पनेनें काम करूं नये. अगदीं सुरवातीपासून अखेरपर्यंत केव्हांहि कोणीं पाहिल्यास त्याला काय चाललें आहे हें ध्यानांत येईल असें काम करावें. तरच पुतळ्यांत कला संचरते असा अनुभव त्या पुस्तकांत नमूद केला आहे. नाहींतर पुष्कळ चित्रकार म्हणतांना आढळतात कीं " आतां काय पाहतां ? सगळें झालें म्हणजे पहा." सुरवातीला वेडा वांकडा आकार देऊन त्यावर थापत बसावयाचें ! असल्या 'थापेबाजी'नें कला साधावयाची नाहीं. कला म्हणजे आत्म्याचा अमर अंश. म्हणून ' पूर्णांतून पूर्ण ' ह्या आत्मविकासाच्या सूत्राला धरूनच कलेचा अवतार होणें शक्य आहे.

राष्ट्र-निर्माण ही फार मोठी कला आहे. ' पूर्णात् पूर्णम् ' हें सूत्र आंखून रचना केली तरच ती साधणार आहे.

---

गुरू नानक यांचा जन्म लाहोरच्या आग्नेय दिशेस वसलेल्या तलवंडी रायभोई येथें १५ एप्रिल १४६९ रोजीं झाला. या गांवास सध्यां नानकाना साहिब असें म्हणतात. नानकांचे वडील काळू हे वेदी क्षत्रिय होते. बाल्यावस्थेंत नानक चिंतनशील, शांत व धार्मिक वृत्तीचे होते. या कालांत त्यांनीं हिंदी, संस्कृत व फारसी भाषांचे शिक्षण घेतलें. अध्यात्म रामायण, पुराणें व कुराण इत्यादिकांचा त्यांनीं अभ्यास केला.

या भक्ति-कालांत भारताची दशा अत्यंत हीन होती. मुसलमानी राज्याचा बोलबाला होता. हिंदु व मुसलमान या धर्मांतील चैतन्य असंख्य उपचारांनीं आणि बाह्य आचारांनीं डागळलें होतें. जुलमी सत्तेचें सर्वत्र वर्चस्व होतें. अधिकाऱ्यांचा जुल्म, कर्मकांडाचा जुल्म अशा अनेक जुलमाखालीं देश त्रस्त होऊन गेला होता. अनेक अवतार, अनेक देवता, पीर, दर्गे यांच्या उपासनेंत खऱ्याखुऱ्या परमतत्वाची उपासना नष्ट झाली होती. तीर्थयात्रा व तत्वशून्य धार्मिक विधी यांनीं अंतःकरणांतील भक्तीची जागा घेतली. अंधश्रद्धा आणि धर्मभोळेपणा यांनीं सत्याची हकालपट्टी केली. हिंदु-मुसलमानांचे संघर्ष होऊं लागले. ब्राह्मण पंडित आणि मुल्ला यांच्यामध्यें खटके उडत. राजकीय आणि सामाजिक विषमता स्वैरपणें सर्वत्र माजून राहिली. आपली जात, आपला वर्ण, आपली भाषा आणि आपला प्रदेश अशा अभिमानानें कूपमंडुकवृत्तीचा स्वीकार करून लोक एकमेकांवर चिखलफेक करूं लागले आणि प्रत्येक क्षेत्रांत झगडे दिसूं लागले. अशाप्रकारें विघटित झालेला समाज नानकांनीं उघड्या डोळ्यांनीं पाहिला. त्याच्या संवेदनाशील मनावर या घडामोडींचा जोरदार व चिरकालीन परिणाम झाला.

## राजकीयव सांस्कृतिक गुलामगिरी

गुरु नानक हे धार्मिक आणि राजकीय सुधारणा घडवून आणणारे क्रांतिकारक होते. भारताच्या या भ्रष्टतेला जनतेवरील शासन करणारांचे राजकीय वर्चस्व आणि पुरोहित वर्गाचें सांस्कृतिक वर्चस्व कारणीभूत आहे. या राजकीय व सांस्कृतिक गुलामगिरींतून जनतेची मुक्तता व्हावयाची असल्यास ऐक्य, परमेश्वराचे कर्तृत्व, माणसामाणसांतले बंधुत्व आणि समानता ही तत्वें ज्यायोगे जनतेच्या मनांत ठसविली जातील अशा नवीन धर्मभावनेची, नवचैतन्याची आवश्यकता आहे असें त्यांना वाटलें. म्हणून लोकांना वर्ण आणि जाती यांचा मिथ्याभिमान सोडण्यास त्यांनीं सांगितलें. जुन्या जातीजमातींनीं व सामाजिक रूढींनीं निर्माण केलेले माणसामाणसांतील भेद आणि लिंगभेद मानण्याचें त्यांनीं नाकारले जन्मलेला प्रत्येक मानव देवाच्या ठिकाणीं समान आहे. जाती आणि वर्ण यांचा खोटा अभिमान एकतेच्या मार्गांत शल्य बनून विखरून राहिलेला आहे. लोक जात-पात ओळखतात परंतु ज्याच्या साह्यानें मनुष्य विकसित होतो त्या अंतरात्म्याच्या ज्योतिला लोक ओळखत नाहींत. गुरु नानकांनीं म्हटले आहे :

जाणहु ज्योति न पूछहु जाति। आगे जाति न है॥

याच जाति आणि वर्णाच्या अभिमानांत प्रत्येक व्यक्ति आपण उच्च आहोंत आणि इतर दुसऱ्या कोणास कमी समजून तिरस्कार आणि कुटीर वृत्तीचें बीज पेरीत रहातात. गुरु नानक ज्या जातीमध्यें जन्माला आले ती जात सामाजिकदृष्ट्या उच्च आणि सन्मान्य समजली जात होती. परंतु त्यांनीं उच्च आणि नीच या भेदमूल विचारांना आपणापासून दूर ठेवले आणि आपले विचार आणि व्यवहार यांच्याद्वारें जनतेच्या जीवनाची एकता निरंतर प्रतिपादन केली. कदाचित् त्यांच्या जीवनकालांत कुणी एकानें त्यांना त्यांच्या उच्च जातीचा बोध केला असावा त्याला प्रत्युत्तर म्हणून त्यांनीं आपल्या या प्रसिद्ध काव्यपंक्तींत म्हटले आहे.

नीचा अंदरि नीच जाति, नीची हूँ अति नीच।
नानक तिनके संग साथ, वडिया सूं क्या रीस।

## समाजाची संकुचीत वृत्ती

समाजाच्या एकतेच्या मार्गांत जर कोणती सर्वांत मोठी अडचण असेल तर ती म्हणजे लोक आपला दृष्टिविस्तार संकुचित करतात ही होय. आपली भाषा, आपली जात आणि आपला प्रांत या क्षेत्राखेरीज कोणाच्या जवळहि जात नाहींत सुप्रसिद्ध प्रवासी अल्बरूनी यानें तत्कालीन हिंदूंच्या संकुचित वृत्तीनें वर्णन करतांना लिहिले आहे.

"हिंदु लोक समजतात आपल्या देशासारखा दुसरा देश नाहीं. आपल्या धर्मासारखा दुसरा धर्म नाहीं आणि त्यांच्या शास्त्रासारखे दुसरे शास्त्र नाहीं. तुम्ही खुरासान आणि इराणचें शास्त्र आणि विद्वानासंबंधीं त्यांच्याशीं चर्चा कराल तर ते तुम्हाला मूर्खच नव्हे तर मिथ्यावादीसुद्धां समजतील. हे लोक जर प्रवास करतील आणि दुसऱ्यांशीं मिळून मिसळून रहातील तर त्यांची ही प्रवृत्ति रहाणार नाहीं. कारण त्यांचे पूर्वज अशाप्रकारें संकुचित नव्हते."

तत्कालीन जनतेच्या दैन्यावस्थेचे खरें कारण भिन्न भिन्न श्रद्धेतून जन्माला आलेला विभक्तभाव होय, असें नानकांना वाटत होते. म्हणून विचार व कृति या दोन्ही दृष्टींनीं सर्वांना एकत्र आणण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. मानवी समतेवर आधारलेल्या सामान्य प्रार्थनेची पद्धति सुरू केली, सामाजिक संघटन घडवून आणण्याचे त्यांनीं जनतेच्या मनावर बिंबविले. बंधुभावानें सर्व शिष्यांनीं एकत्र येऊन गुरूंच्या भक्तिगीतांचे गायन करावे व आपल्या जीवनाला नवीन आकार देण्याची स्फूर्ति मिळवावी म्हणुन धार्मिक मेळाव्यांचा ( संगत ) त्यांनीं पाया घातला. जाति, पंथ, अधिकार असा कोणताहि भेदभाव न मानतां ज्या ठिकाणीं एकत्र बसतां येईल अशा मुक्त जनता भोजन व पाकशाळांची ( गुरुका लंगरकी ) त्यांनीं सुरुवात केली. अशाप्रकारें हिंदु आणि मुसलमान, ब्राह्मण व शूद्र यांना एकाच सामाजिक पातळीवर नानकांनीं आणले.

## राजे म्हणजे कसाई

गुरू नानकांनी प्रार्थनामय आणि भक्तिमय अशा एकमात्र जीवनांत स्वतःला मर्यादित करून घेतलें नाहीं. आपलें बांधव जुलमाच्या टांचेखालीं चिरडले जाऊन दुःखानें विव्हळत असतां रिकामटेकड्या ध्यानमग्नतेंत राहाण्याचे त्यांनीं नाकारलें व नव्या चैतन्याची जाणीव करून दिली. राजे हे कसाई आहेत. निर्दयता ही त्यांची सुरी आहे. धर्माची, कर्तव्याची आणि जबाबदारीची जाणीव उडून गेली आहे म्हणून त्यांनी त्या कालांतील राज्यकर्त्यांची निर्भत्सना केली. त्यांच्या मतें जनतेच्या हिताचा अनादर करून राज्य करणारे राज्यकर्ते केवळ मूर्ख होत. राज्यकर्ते समता व न्यायप्रदान करणारे असावेत,

भेकडपणा आणि परावलंबित्व झिडकारून टाकणारा, परमेश्वराविषयीं श्रद्धा निर्माण करणारा आशेचा संदेश नानकांनीं जनतेला दिला. ज्या ठिकाणीं सर्वांना समानदर्जाची मागणी करतां येईल अशा वर्गहीन लोकशाही समाजाची दृष्टि संगत आणि पंगत या त्यांनीं प्रस्थापिलेल्या संस्थामुळें जनतेला आली. मर्दानी स्वातंत्र्य आणि स्वयंनिष्ठा यांचे ते प्रतीक असल्यामुळें दुर्दम्य हिंमत आणि करारी जिद्द जनतेंत निर्माण करण्यास त्यामुळें मोठें सहाय्य झाले हें पुढें झालेला युद्धकालांतील व शांतिकालांतील इतिहास दाखवून देईल.

गुरु नानकांनीं आपल्या आयुष्यांत चार मोठ्या यात्रा केल्या. त्याला गुरु नानकाची उदासी म्हणतात. भारतात आणि भारताबाहेर आपल्या संदेशाचा प्रचार करीत ते चाळीस वर्षं हिंडले. पहिला प्रवास पूर्वेकडील प्रदेशांत होता. लाहोरहून निघून डाका. चटगांवमार्गे ते दक्षिणेकडे गेलें. दुसरी यात्रा त्यांनीं दक्षिणेकडे केली. या प्रवासांत ते राजस्थान, महाराष्ट्र आणि दक्षिण भारतांतील अनेक ठिकाणीं थांबून लंकेपर्यंत पोहोंचले. तिसऱ्या प्रवासांत बद्रीनाथ आणि हेमकुंडीमार्गे यात्रा करींत ते नेपाळ आणि तिबेटपर्यंत गेलें आणि चौथ्या यात्रेंत त्यांना आपल्या देशाच्या सीमेपासून पुष्कळ दूर अशा मक्का, मदिना आणि बगदाद-पर्यंत प्रवास केला.

## सर्व मनवजातीचा एकच देव

त्या कालांत देशाच्या सीमेबाहेर जाणें म्हणजे धर्मभ्रष्ट होणें असें समजले जात होतें. गुरु नानकांनीं तीन वेळां परदेशयात्रा करून अशा धर्माचा संदेश दिला कीं जो व्यक्तीला आत्मसंकोचाचा नव्हेतर आत्मविकासा मार्ग दाखवितो, ज्याच्या प्रेरणेनें सर्व सीमा नाहींशा होतात जो स्वतः आपणाला चोहोंकडे पसरलेल्या लोकजीवनांत आत्मसात घेतो. ज्या ज्या ठिकाणीं ते गेले त्या त्या ठिकाणी देव एकच आहे, अशी त्यांनीं घोषणा केली. तो केवळ हिंदूचा नाहीं किंवा मुसलमानांचा नाहीं. तो सर्व मानवजातींचा आहे. राम, अल्ला इत्यादि कोणत्याहि नांवानें त्याची पूजा केली. त्याचे स्मरण केले तरी तो एकच आहे. तो निर्गुण, अदृश्य, अजात, निर्माता, निर्भय, महान आणि

उदार आहे. गुरु नानकांनीं जगन्नाथपुरीच्या मंदिरांत त्या अंबड गणेची जी अद्भुत आरती केली ती त्यांच्या व्यापक आध्यात्मिक दृष्टीचें ज्वलंत उदाहरण आहे. त्या आरतीला थाळी, धूप, दीप आणि मोती यांची आवश्यकता नव्हती तर तिथें आकाशच थाळी बनले. सूर्य आणि चंद्र दीप बनले. तारे मोती बनले. मलयानिल धूपाचें काम करूं लागला.

## नानकांची उच्च विचारसरणी

परमेश्वराची पूजा हा केवळ पुरोहितवर्गाचा विशेषाधिकार नाहीं. मानवसेवी निःस्वार्थी सेवा हीच त्या परमेश्वराची सर्वोत्तम पूजा होय. ती करण्यांत प्रत्येक स्त्रीपुरुषानें भाग घ्यावा आणि त्याच्या कृपेस पात्र व्हावें. गुरु नानकांनीं मूर्तिपूजेचा निषेध केला. पोकळ धार्मिक विधि आणि अंध धर्म भोळेपणा यांनीं धर्मांतील व नीतितत्वांतील जीवनरस शोषून घेतला आणि मानवी अंतःकरणाची निर्माणकर्त्या परमेश्वरापासून फारकत केली. जीवनाची शुद्धता हा मानवी प्रयत्नांना उच्च हेतु असावा असें त्यांनीं सांगितलें. स्वराजभक्ति, साधुत्व, प्रामाणिकता, न्याय, दया आणि संयम या सद्गुणांवर त्यांनी मुख्यतः जोर दिला.

गुरु नानकांनीं त्यागाचा किंवा वैराग्याचा पुरस्कार केला नाहीं. आयुष्याच्या शेवटीं कुटुंबासहित व मुलाबाळांसह ते गुरुदासपूर जिल्ह्यांत कर्तारपूर ( पाकिस्तान ) या गांवीं येऊन राहिले. ज्या जनतेच्या सेवेंत जीवनांतील श्रेष्ठ सुख आहे त्या जनतेचे 'ते धर्मोपदेशक होते, त्यांच्यांत ते राहिले. त्यांच्या सुखदुःखांत सहभागी झाले.त्यांना सत्य आणि प्रामाणिक जीवनाचा मार्ग दाखवून दिला. सत्य हे उच्च आहे; परंतु सत्यपूर्ण जीवन हे त्याहि पेक्षां श्रेष्ठ आहे. धर्माला ज्यावेळीं केवळ कर्मकांडांचे स्वरूप प्राप्त झाले होते तेव्हां गुरु नानकांनीं सत्याचा खरा मार्ग दाखविला; खरा धर्माचरणी तोंच कीं जो खरा सदाचरणी असतो असें सांगून कृतिविना उक्ति निरर्थक आहे अशी शिकवण गुरू नानकांनीं दिली.

आपल्या शिष्यांनीं देवाचें आणि जनतेचें सेवक व्हावे अशी त्यांची मनीषा होती. मानवी शरीर निर्माण करून परमेश्वरानेंच त्यांत स्वतःची प्रतिष्ठा करून घेतली. जग हें त्याचे विशाल दरबारगृह असून त्यांत तो सत्यस्वरूप परमेश्वर वसत आहे अशी त्यांची विचारसरणी होती.

इह जग साचे कि है कोठरी
सचे का विश्वास

म्हणून या मानवी शरीराच्या द्वारें या जगांत सेवा करूं या. इतरांच्या उपयोगी पडूं या. त्यायोगें परमेश्वराच्या दरबारांत आपल्याला स्थान मिळेल.

विश दुनिया सेव कमाईये
तन दरगेह बैसन पाहिए

# ज्ञानमार्ग आणि भक्तिमार्ग

मागील खेपेस योगमार्गापेक्षां भक्तिमार्ग श्रेष्ठ आहे हें दाखविलें होतें. आतां ज्ञानमार्गापेक्षांहि भक्तिमार्गाची योग्यता अधिक आहे हें साधु एकनाथ यांच्या वचनांनीं सिद्ध करून दाखवावयाचें आहे. त्यांच्या भागवतांतून मीं पांच ओव्या वेंचून काढिल्या आहेत. त्या येणेंप्रमाणें :—

न करितां वेदशास्त्रव्युत्पत्ति। ऐशिया अज्ञाना निजात्मप्राप्ति॥
सुगम जोडे ब्रह्मस्थिति। यालागीं हरिभक्ति प्रकाशिली देवें॥ १॥

तें हें राया भागवत जाण। मुख्यत्वें भक्ति प्रमाण॥
भावें करितां भगवद्भजन। अज्ञान जन उद्धरती॥ २॥

स्त्रीशूद्रादि अवघे। घालूनियां ये नावे॥
एकेच खेपे स्वयें न्यावें। भजनभावें परतीरा॥ ३॥

येथें पोहणें याविण उतरणें। प्रयासेंविण प्राप्ति घेणें॥
सुखोपायें ब्रह्म पावणें। यालागीं नारायणें प्रकाशिली भक्ति॥ ४॥

भागवतधर्माची स्थिति। भाळींभोळीं भवाब्धि तरती॥
सुखोपायें ब्रह्मप्राप्ति। तेचि श्लोकार्थी विशद सांगे॥ ५॥

अ० २–२०९, २१७, २२०, २७–२८.

जसे योगमार्गी प्राचीन काळीं होते, आतां नाहींत असें नाहीं, तसेंच ज्ञानमार्गी पूर्वीप्रमाणेंच प्रस्तुतही आहेत. योग हाच केवळ परमेश्वरप्राप्तीचा मार्ग आहे, असें जरी आपणांस मान्य नाहीं, तथापि योगाचें मुख्य साधन जें तप अथवा इंद्रियनिरोध त्याचें अवलंब केल्यानें जीं कांहीं फलें प्राप्त होतात त्यांकडे सर्वथैव दुर्लक्ष करतां येत नाहीं. परंतु तीं फळें योगमार्गापेक्षां सौम्य उपायांनीं साध्य आहेत व तद्द्वारा प्राप्त करून घेणें इष्ट आहे, एवढेंच सांगण्याचा माझा उद्देश होता. योगमार्ग दुष्कर आहे, म्हणून इंद्रियांस सर्वस्वीं मोकळें सोडतां नये. त्यांचा योग्य प्रसंगीं निरोध केला पाहिजे. त्यांस यथेच्छ वागण्यास मोकळीक दिली असतां आपण पशुवत् होतों. त्यांचा समूळ नाश करणें हें शक्य नाहीं; त्यांस युक्तिप्रयुक्तीनें चांगलें वळण लावून वश करून घेतलें पाहिजे. त्याचप्रमाणें ज्ञानाची गोष्ट आहे. ईश्वराची भक्ति करण्यास ज्ञानाची जरूरी नाहीं असें नाहीं. तरी जसा योगमार्ग दुष्कर, अतएव सर्वांस साध्य नाहीं, तसाच प्रकार ज्ञानमार्गाचा आहे. आपल्या लोकांच्या जुन्या समजुतीप्रमाणें ज्ञान संपादण्यास

वेदपठन व शास्त्राध्ययन केलें पाहिजे. चार वेद, सहा शास्त्रें व द्वैतमताचीं व अद्वैत-मतांचीं भाष्यें अवलोकन केलीं पाहिजेत. इतक्यानें सांप्रतच्या काळीं ज्ञानप्राप्ति पूर्ण होत नाहीं; कारण, इंग्रजी, ल्याटिन, ग्रीक वगैरे पाश्चिमात्य भाषांची चांगली माहिती करून घेऊन त्यांतील तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ वाचल्याशिवाय ज्ञानाची पूर्णता होत नाहीं. इतकें करतां करतां मध्येंच आयुष्याची मर्यादा पूर्ण होते, व ब्रह्मप्राप्ति दूरच रहाते.

योगमार्गांत इंद्रियांचें सर्वथैव दमन करून विषयांचा सर्वथैव त्याग करणें, हा मुख्य भाग असल्यामुळें तो साधारण जनांस दुष्कर आहे; तसाच प्रकार ज्ञानमार्गाचा आहे. त्यांतही वर सांगितलेल्या अमित ग्रंथावलोकनाशिवाय दुसऱ्या अडचणी आहेत. त्यांतून मुख्य ही कीं, तो सर्वांस साध्य नाहीं; कारण, शूद्र व स्त्रिया यांस वेदशास्त्राध्ययनाचा अधिकार नाहीं अशी समजूत असल्यामुळें, त्यांस ब्रह्मप्राप्ति होणें शक्य नाहीं. शूद्र व स्त्रिया हे केवळ अज्ञानदर्शक शब्द आहेत, व त्यांमध्यें आपल्यासारख्या बहुतेकांची गणना होते. शूद्राचें कसेंही आचरण असलें, तरी तो एकदम ब्राह्मण होत नाहीं; तो कनिष्ठ प्रतीचा शूद्र असल्यास श्रेष्ठ प्रतीचा होतो; पुढें वैश्य होतो; असा क्रमाक्रमानें उच्च वर्णांत जातो. परंतु तेंही त्यांच्या हातून दोष न घडतील तर; नाहींतर पुनः अधःपात होतो. ब्राह्मण वर्णांत येऊनही पुरुषजन्म घ्यावा तेव्हां पुढें ज्ञानप्राप्ति व ब्रह्मस्थिति मिळणार, असे समज आहेत. जे कोणी दैवशाली पुरुष योगमार्गानें मोक्षप्राप्ति करून घेण्यास समर्थ असतील त्यांच्याशीं म्हणजे त्यांच्या शुद्ध बुद्धीविषयीं, किंवा त्यांच्या मार्गाच्या सत्यासत्यतेविषयीं, आमचा मुळींच वाद नाहीं. आमचें म्हणणें इतकेंच आहे कीं, जरी योगमार्ग व ज्ञानमार्ग हे दोन्ही खरे असले, तरी त्यांचा उपयोग फक्त थोड्या निवडक लोकांस मात्र होण्याचा संभव आहे; आमच्यासारख्या अज्ञान, लंगड्या, थोट्या, पांगळ्या व आंधळ्या लोकांची वाट काय? आम्हांला भगवत्प्राप्तीला मार्ग आहे कीं नाहीं? वरील पांच ओंव्यांत एकनाथबावांनीं आमच्यासारख्यांस तरणोपायाचा मार्ग आहे असें सांगून, ज्ञानमार्गापेक्षां भक्तिमार्गाची श्रेष्ठता कशांत आहे, तें तिसऱ्या व पांचव्या ओंवींत प्रतिपादिलें आहे व ज्ञानमार्गी लोकांचा समज किती कोता व चुकीचा आहे, हें दाखविलें आहे. तिसऱ्या ओंवींतील स्त्री शूद्र व पांचव्या ओंवींतील भोळेभाळे हे एकाच अर्थाचे शब्द आहेत; व ते केवळ अज्ञानदर्शक व दुर्बलता सूचक आहेत. ज्ञानप्राप्ति किंवा योगसाधन या दोन्ही लाभांस शूद्र व स्त्रिया अधिकारी नाहींत, अर्थात् त्यांस भगवत्प्राप्ति पुनः पुनः जन्म घेऊन पायरीपायरीनें शूद्रांनीं ब्राह्मण झाल्याविना, अथवा स्त्रियांनीं पुरुष झाल्याविना साध्य नाहीं, असें ज्ञानमार्गी व योगमार्गी यांचें मत आहे; पण तें संयुक्तिक दिसत नाहीं. हें माझ्या पदरचें मी सांगतो, असें नाहीं, तर साधू एकनाथ सांगतात कीं, परमेश्वरप्राप्त्यर्थ दुष्कर योगाची, अथवा दुर्लभ ज्ञानाची, बिलकूल जरूरी नाहीं. ज्ञान व योग

या दोहोंपेक्षां भक्तिमार्ग अथवा भागवतधर्म श्रेष्ठ मानण्याचें मुख्य कारण हेंच कीं, तो सर्वांस मोकळा व साध्य आहे; मग तो पुरुष असो व स्त्री असो, ब्राह्मण असो वा शूद्र असो. अशीं ज्या धर्मांचीं, अगर मार्गांचीं तत्त्वें उदार आहेत, तोच सामान्य जनांस उपयोगी व साध्य व त्यालाच भागवतधर्म म्हणावें. नाहींतर स्त्रियांना भगवत्प्राप्ति नाहीं व शूद्रांनाही नाहीं; त्यांनीं खुशाल चुचकळ्या मारीत, रहावें. असें म्हणणें म्हणजे मानवप्राण्यांपैकीं बहुतेकांस परमार्थ दुष्प्राप्य आहे, असें म्हणण्यासारखें होतें.

ज्ञानमार्गानें ब्रह्मप्राप्ति करून घेण्यास शंभर वर्षांचें आयुष्य पुरेल किंवा नाहीं, यांचा संशयच आहे. शिवाय मी शंभर वर्षें लाख वांचेन व चार वेद, सहा शास्त्रें व सर्व मतांचीं भाष्यें वाचून पारंगत होईन व मला ब्रह्मप्राप्ति होईल असें कोण म्हणूं शकेल? वस्तुस्थिति पाहूं गेलें असतां सर्व प्रकार उलटच आहे. आज आहे, तो उद्यां नाहीं, व बहुतेकांचीं पन्नास वर्षांच्या आंतच या लोकांची वस्ती संपते. तर असे जे आम्ही अल्पायुषी, लंगडे, थोटे, आंधळे त्यांनीं योगसाधन व ज्ञानप्राप्ति कशी करावी? आम्हांला सुगम धोपट व सर्वांस सारखा अनुसरतां येईल असा मार्ग पाहिजे. आणखी दुसरी गोष्ट अशी कीं, आम्हां पंगु जनांला भवरूप दुस्तर सागरांतून एकाच खेपेस पैलतीरास नेऊन सोडणारी नौका पाहिजे. या दोन्ही सामान्य जनांच्या गरजा पुरविणारा असा एकनाथस्वामींनीं प्रतिपादन केलेला भागवतधर्मच आहे. ज्याप्रमाणें वर्षाकाळीं पंढरपुरीं चंद्रभागेस पूर आला असतां पैलतीरीं जाण्यास नावा असतात व अलीकडच्या कांठावरील लोक कसेंही करून पलीकडे नावेंतून जाण्यास उत्सुक असतात, तद्वत् आमची स्थिति आहे. व आम्हांस भवनदी पार होण्यास एकनाथबावांनीं निरूपित जो भागवतधर्म, तीच सर्वांस सारखी उपयोगी पडणारी धर्मनौका आहे.

जे जुन्या समजुतींचे शास्त्री पंडित लोक, चार वेद, सहा शास्त्रें वगैरे पढल्या-शिवाय खरें ज्ञान होत नाहीं असें म्हणतात, अगर नवीन विद्वान् लोक संस्कृत, ल्याटिन, ग्रीक व इंग्रजी ह्या भाषांत तत्त्वज्ञान्यांनीं रचलेल्या समग्र ग्रंथांचें आलोडन केल्याशिवाय परमेश्वरस्वरूप समजणार नाहीं असा आग्रह धरून बसतात, त्यांस एकनाथबावा पहिल्याच ओंवींत असें उत्तर देतात कीं, संस्कृत वगैरे भाषा ज्यांस अवगत नाहींत, अथवा असल्या तरी वेदादि गहन ग्रंथ समजण्याची शक्ति ज्यांस नाहीं, अशा अज्ञ जनांस तरणोपाय नाहींच म्हणतां, तर वस्तुतः तसें नाहीं; त्यांच्यासाठीं देवानें भक्तिमार्ग सांगितला आहे. त्या भक्तिमार्गाचें स्वरूप दुसऱ्या ओंवींत वर्णन करितांना एकनाथबावा म्हणतात कीं, भावानें भजन केलें असतां तेंच भवाब्धि पार होण्यास पुरें आहे, व वेदशास्त्रपठणाची अथवा लेखनवाचन येण्याची भाव व भक्ति यांच्याइतकी आवश्यकता नाहीं. योगसाधनानें, अथवा ज्ञानप्राप्तीनें, परमेश्वरप्राप्ति करून घेण्याचें ज्यांच्या अंगीं सामर्थ्य असेल, त्या धन्य पुरुषांची गोष्ट

वेगळी; परंतु आमच्यासारख्या भाळ्याभोळ्यांनीं आम्हांस तें उपलब्ध नाहीं म्हणून तिष्ठत कां बसावें ? एकनाथबावांनीं उपदिष्ट जो सोपा मार्ग तोच स्वीकारणें योग्य व इष्ट आहे. शिवाय ब्रह्मप्राप्ति म्हणजे काय ? केवळ ईश्वरप्राप्ति तर साध्य विषय हा; आणि साधनोपाय कोणता ? तर म्हणतात संस्कृत शिका, चार वेद पढा, इंग्रजीचा अभ्यास करा, अमुक शिका, तमुक शिका ! परमेश्वरप्राप्तीला जर एवढे आयास व खटपट, तर तुमची आमची गति काय ? आपणांस प्राणवायु अर्धा तास तरी कोंडून धरतां येतो काय ? तर मग योगसाधनाची व तद्द्वारा ईश्वरप्राप्तीची गोष्ट कशाला ! दुसरे सांगतात, तुम्ही या जन्मांत थोडें पुण्य करा, इच्छा ठेवा, कशाची ? तर पुनः जन्म घेऊन पुण्य करण्याची. असें लक्षादि वेळ करा, मग ब्रह्मप्राप्ति होईल ! परंतु असे उपाय सांगणारांस आमची नड काय आहे यांचें ज्ञान नाहीं असें म्हटलें पाहिजे. आमचें घर पैलतीरास आहे; मध्यें नदीला मोठा पूर आला आहे; आतां आम्हांस एकदम घरीं पोहोंचण्याची उत्कट इच्छा असून उतावीळ करूं नका, धीर धरा, सात जन्म घ्या, मग कदाचित् घरास पोहोंचण्याची व्यवस्था होईल, असें योगमार्गी व ज्ञानमार्गी सांगतात. बरें हे सांगतात, त्याचप्रमाणें इच्छा टेवून पुण्यार्जनासाठीं तो घेणें आपल्याच हातचें आहे असें घटकाभर मानून–पुनर्जन्म घेतला, तर त्यांत चूक होणार नाहीं, याची खात्री काय ? दोष घडला कीं, पुनः अधःपात ! अशा रीतीनें ब्राह्मणजन्म पावण्यास हजारो अडथळे व विघ्नें तो आल्या-विना ज्ञानप्राप्तीला अधिकारच नाहीं, मग ब्रह्मप्राप्ति दूरच ! म्हणून तो त्रास आम्हांला नको; धीर धरवत असेल त्यांनीं खुशाल धरावा; रोग सहन करवेल त्यांनीं करावा; परंतु आमच्या पोटांत अतिशय दुखतें, त्याला कांहीं सत्वर गुण आणणारा औषधोपचार असेल, तर कृपा करून सांगा, असें मागणें असतें. या आमच्या व्याधीस एकनाथ-महाराजांनीं दिव्य औषध वरील पांच ओंव्यांत सांगितलें आहे.

एका खेपेस पैलतीरास जाण्याच्या उत्सुकतेचा अनुभव बाहेरगांवच्या लोकांस असतो, तसा मुंबापुरस्थांस नसतो. आषाढी एकादशीच्या यात्रेच्या संबंधानें चंद्रभागेवर मनुष्यांची दाट गर्दी असते. त्यांतून प्रत्येकाची इच्छा व ओरड असते कीं, एका खेपेस पैलतीरास न्या; परंतु माणसांच्या मानानें नावा थोड्या असल्यामुळें तसें करणें मुष्किलीचें असतें. सकाळीं येऊन बसलेल्यांस संध्याकाळपर्यंत नाव मिळाली तर मदद्भाग्य. परंतु भवसागर चंद्रभागेहून अनंतपटीनें दुस्तर आहे. आणि आम्हांस तर पोहतां येत नाहीं. पलीकडे एका खेपेस जाणें आहे. पुनःपुनः फेरे नकोत; त्यांतून प्रत्येकास एकदम आणि एकाच खेपेस पार पडून परमेश्वरप्राप्ति करून घेण्याची जी उत्कट इच्छा, ती सफल होण्यास व कोळीमाळी, स्त्रीपुरुष, लहानथोर, या सर्वांचा सुगम रीतीनें उद्धार होण्यास भक्तिमार्गच एक साधन आहे व त्याचें अवलंबन केल्यानें ईश्वरप्राप्ति होते. भक्तिमार्गाचें अवलंबन जे करितात त्यांचाच भागवतसमाज; आणि त्या समाजाचा जो धर्म तो भागवतधर्म.


योगमार्गी व ज्ञानमार्गी यांस आमचें म्हणणें असें आहे कीं, ज्यांचें ज्ञान पार्‍ह गेलें असतां भोपळ्याएवढें आणि योगसाधनास अधिकार व सामर्थ्य अति अल्प असे जे आम्ही त्यांना गति काय ती सांगा. आम्हां थोड्यावकुळ्यांना देवदर्शन घेण्याची इच्छा आहे; परंतु हातांपायांस सामर्थ्य नाहीं, तर देवदर्शन कसें व्हावें ? विशेष इंद्रियनिरोध, विशेष योगसामर्थ्य, विशेष ज्ञान हें फार दुर्घट, अर्थात् भागवतधर्माचें वांतन कोणतेंहि खरें स्वरूप नव्हे. ज्ञानमार्ग व योगमार्ग खरा किंवा खोटा याचा निर्णय करण्यासाठीं वाद वाढविण्यांत कांहीं अर्थ नाहीं; तरी ते आम्हांसारख्या भाळ्याभोळ्यांस साध्य असे मार्ग नाहींत. यांत संशय नाहीं. कारण, ब्राह्मणांस विचारलें असतां ते सांगतील की, स्त्रियांस व शूद्रांस तर एका जन्मांत उद्धार करून घेण्यास मार्गच नाहीं. यावरूनच ज्ञानमार्ग थोड्या निवडक मंडळींपुरता आहे असें उघड होतें. मग बाकीचे राहिले त्यांनीं काय करावें ? शिवाय हें सांगणें तरी खरें आहे काय ? कारण, ज्ञानदेवमहाराजांच्या चार भावंडांत त्यांची बहीण मुक्ताबाई हिची योग्यता जास्त होती, व तिचे बंधु तिजकडून ज्ञानप्राप्ति करून घेत वगैरे चरित्र पुष्कळांनीं वाचलेंच असेल. त्यावरून व पुराणादिकांत जीं स्त्रियांचीं अनेक विलक्षण उदाहरणें आढळतात आणि भक्तमहात्म्यांत शूद्रांच्या ज्ञानविशिष्टतेविषयीं व भगवत्प्राप्तीविषयीं जीं चरित्रें आहेत त्या सर्वांवरून ब्राह्मणांच्या वरील म्हणण्यास विरोध येतो.

दुसरा एक विचार आहे तो असा. आम्हीं कबूल केलें कीं, आतांपासुन ज्ञानमार्गाच्या पाठीमागें लागणार. बारा वर्षे संस्कृताचा सतत अभ्यास करून पाहण्यास लागावें तों कित्येक प्रश्न करतात कीं, तुम्हीं सूत्रें व भाष्यें पाहिलीं काय ? त्या सर्वांचें अध्ययन करावयास आणखीं बारा वर्षे घालविलीं; मग इतक्यानें तरी आटोपतें काय ? नाहीं. त्यांच्यासंबंधानें पुन्हां अद्वैतसिद्धांत पाहिला, अथवा द्वैतसिद्धांतही पाहिला काय ? असा सवाल निघतोच ! बरें द्वैत व अद्वैत दोन्ही पाहिले व दहावीस वर्षे घालविलीं, तरी कपाळाची कटकट सुटते काय ? नाहीं ! आणखी एक येऊन म्हणतो, द्वैताद्वैतानेंच ज्ञानाची पूर्णता होत नाहीं; विशिष्टाद्वैत पाहिलें पाहिजे. बरें द्वैत, अद्वैत व विशिष्टाद्वैत या तिन्हीं मतांचे ग्रंथ पाहिल्यावर त्यांतून आपण कोणतें स्वीकारावें, किंवा काय करावें हा विचार राहिलाच !

पाश्चात्य विद्येकडे पाहावें, तर तेथेंहि असाच प्रकार. व्यक्तिमात्र जसा जसा विचार करतो तसें तसें त्यास शेवटीं असें अनुभवास येतें कीं, आपणास कांहींएक समजलें नाहीं, एवढें काय तें समजलें. आपणांमध्यें, तसेंच पाश्चात्य लोकांत तत्त्ववेत्त्यांचा अखेरचा निकाल वास्तविकपणें असा आहे कीं, आपणास कळलें आहे असें जो समजतो त्याला कांहींएक कळलें नाहीं व जो आपणांस कळलें नाहीं असें समजतो त्यालाच थोडेबहुत समजलें. शेवटीं एवढेंच कीं, एका मनुष्याचें ज्ञान दुसऱ्यापेक्षां जास्त, त्याच्यापेक्षां तिसऱ्याचें जास्त, मिळून जास्त ज्ञान किंवा कमी ज्ञान, हें मनुष्यामनुष्यासंबंधानें निव्वळ सापेक्ष म्हणणें आहे. परंतु अत्यंत श्रेष्ठ मानवी ज्ञानाची

ईश्वरविषयक ज्ञानाशीं तुलना केली असतां, एका पाश्चात्य पंडिताच्या म्हणण्याप्रमाणें कांहीं एक कळलें नाहीं, हें खरें असें कबूल करावें लागेल. कारण, पूर्ण ज्ञान मनुष्यास साध्यच नाहीं. कां ? तर असें पहा कीं, आमच्यांतील महाविद्वान् अशा शास्त्र्यांची एक सभा भरविली, त्यांत कोणी अद्वैतसिद्धांती आणि कोणी विशिष्टद्वैतवादी असतात व ते एकमेकांचें मत खोटें व व्यर्थ आहे असें आग्रहानें प्रतिपादन करितात; आणि वस्तुतः तिघांच्याही म्हणण्यांत फारसा अर्थ नाहीं असें आम्ही म्हणतों, इतकेंच नव्हे, तर महान् साधु पुरुषांचेंही असेंच मत आहे, व एकपरी ज्ञान निःष्फल आहे. कारण, जिज्ञासाबुद्धीचा भाग आपल्यांत फार थोडा असतो व वृत्तीला वश होऊनच आपलें वर्तन पुष्कळ अंशीं होत असतें; म्हणून वृत्तीला जर नीट वळण दिलें नाहीं तर ज्ञान केवळ दुर्बळ व व्यर्थ होतें; तें पोकळ नव्हे, शुष्क होय. तसेंच ब्रह्म, सत्य आणि जग केवळ माया अतएव मिथ्या आहे, असें म्हणणारे व्यर्थ बडबड करितात असें म्हटलें असतां चालेल; कारण तें व्यवहारास मुळींच जुळत नसतें. असें प्रतिपादन करणाऱ्या एखाद्या शास्त्रीबावांच्या पायास एका लहानशा मुंगीनें चावा घेतांच ते आपलें मत व ज्ञान सर्व गुंडाळून त्या मुंगीस मारण्यास प्रवृत्त होतात !

सारांश, ज्ञानमार्गी व योगमार्गी भवनदींतून पोहून जाण्यास समर्थ असतील तर असोत. आम्हांस तसें पोहतां येत नाहीं; त्याप्रमाणें इंद्रियनिग्रह आमच्यानें होणार नाहीं व योगसाधन दुरापास्तच. म्हणून वृत्तींना, इंद्रियांना व संवयींना योग्य वळण लागेल असा सोपा मार्ग आम्हां भोळ्याभाळ्यांस पाहिजे. हे भक्तिपासून होणें शक्य आहे, तसें दुसऱ्या कशापासून होणें नाहीं. भगवद्भक्तीचा महिमाच असा आहे कीं, ती वाढतां वाढतां तिचा परमावधि झाला म्हणजे भगवंताचा हेतु तोच आपला हेतु, त्याची इच्छा तीच आपली इच्छा बनून जाते. लहान बालक न बोलतां न ओळखतां ज्याप्रमाणें आईकडे जातें, त्याचप्रमाणें भक्तीचें वळण इंद्रियांस व बुद्धीस लागलें असतां ती भगवंताकडेस वळतात. भागवतधर्म फक्त जाणून कांहीं उपयोग नाहीं. तर तें ज्ञान वृत्तींतच आलें पाहिजे. याप्रमाणें ज्ञानापेक्षां भक्तीचा महिमा अधिक कां, हें एकनाथमहाराजांनीं वरील तिसऱ्या वचनाच्या ओव्यांत सांगितलें आहे. त्याचें निरूपण मी आजच्या प्रसंगीं यथामति केलें आहे; व हाच मार्ग श्रेयस्कर आहे.



उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें 'लायसॉफ तेल' वापरा.
गिरगांव : बापट ब्रदर्स — दादर : वसंत फॉर्मसी

# सर्वांवर प्रेम करा

**अवघे जन मज झाले लोकपाळ ।**
**सोईरे सकळ प्राणसखे ॥**

नेपोलियन बोनापार्ट याजविषयीं असें सांगतात कीं, एकदां त्याच्या एका मित्रानें त्याला विचारिलें कीं 'तुझा ज्याच्या ज्याच्याशीं म्हणून परिचय घडतो, त्या त्या प्रत्येकावर तूं आपली हुकमत चालवितोस याचें रहस्य तरी काय आहे? तुझें आधिपत्य ज्या सैन्यावर आहे, तें सैन्यच, किंवा तूं ज्या लोकांवर राज्य चालवितोस ते लोकच, तुला भितात, तुला पूज्य मानितात व तुझी आज्ञा पाळतात, एवढेच नव्हे तर जे कोणी मुत्सद्दी, किंवा राजकार्यधुरंधर तुझ्यासमोर येतात, त्या सर्वांवर तुझें वजन पडतें व तुझें वर्चस्व प्रस्थापित होतें. हें सर्व तुला कसें साधतें कोणास ठाऊक!' **नेपोलियनानें** फक्त एका शब्दांत उत्तर दिलें. गंभीर मुद्रा धारण करून तो म्हणाला, 'संयम, बाबा संयम, दुसरेंतिसरें कांहीं नाहीं.'

**नेपोलियनानें** हें जें उत्तर दिलें, त्यांत पुष्कळ अर्थ आहे. कारण असें पहा, जो मनुष्य पुष्कळ बोलतो, मोकळ्या मनाचा आहे, असें आपल्यास वाटतें व जो आंत बाहेर निराळें असें कांहीं ठेवीत नाहीं, अशा मनुष्यावर आपला विश्वास बसतो खरा व त्याचेवर आपण प्रेम करितों, परंतु आपले जे अगदीं खाजगीं हेतु, विचार, कल्पना त्या कांहीं अशा भडभड्या मनुष्याला आपण सांगणार नाहीं, किंवा संकटाचे वेळीं असा हा मनुष्य आपल्या कांहीं विशेष उपयोगीं पडेल व त्याच्यावर आपण सर्वस्वीं अवलंबून असणें योग्य आहे, असें कांही आपल्याला वाटत नाहीं.

## नेपोलियनचा संयम

नेपोलियनाचा जो धिमेपणा, जो संयम त्यापेक्षां वरच्या दर्जाचा संयम आहे. नेपोलियनास वाटे कीं, दुसऱ्यांस जिंकण्याकरितां व दुसऱ्यावर राज्य करण्याकरितां ईश्वरानें आपणांस उत्पन्न केलें आहे, म्हणून त्याचा संयम, सत्ता व वैभव हें मिळ-विण्याच्या महत्त्वाकांक्षेनें उत्पन्न झालेला होता. पण जे लोक शांत, गंभीर व ममताळू असतात, जे सिंहाप्रमाणें सामर्थ्यवान् पण कोंकराप्रमाणें गरीब, स्वतःची दुःखें किंवा संकटें लोकांस जाहिर करणें त्यांना आवडत नाहीं, परंतु याच्या उलट सर्व जगाचा

भार आपल्या डोक्यावर घेण्यास जे तयार असतात व जिकडे तिकडे म्हणून ते जातील, तिकडे तिकडे जे स्वस्थता व शांति उत्पन्न करितात, अशा लोकांमध्यें जी संयमवृत्ति दिसते ती स्थिति खरोखर श्रेष्ठ प्रकारची होय.

तुकारामबुवांचा वर आपण जो अभंग वाचला त्यामध्यें ते आपला अनुभव सांगतात आणि त्या अभंगाच्या द्वारें त्यांनीं ह्या विषयाचें रहस्य विदित केलें आहे. ते म्हणतात, मी ईश्वराच्या समागमांत नेहमीं राहिल्यामुळें मला जगतामध्यें सर्वत्र त्याचें दर्शन अधिकाधिक होऊं लागलें; माझें ओझें हलकें झालेसें मला वाटूं लागलें, एवढेंच नव्हे तर पूर्वी अंधकार असलेल्या मार्गावर आतां उत्तम प्रकाश पडूं लागला. मी ईश्वराच्या ध्यानामध्यें जसजसा जास्त जास्त निमग्न राहूं लागलों व त्याचें अधिकाधिक भजन करूं लागलों. त्याची प्रार्थना करूं लागलों, त्याचेवर सर्व भार टाकून वागूं लागलों, तसतसा माझ्या अंतःकरणामध्यें अधिकाधिक प्रकाश पडत गेला; माझ्या वाणीमध्यें सामर्थ्य येत चाललें, ईश्वराच्या आज्ञा पाळा, त्याच्या सहवासांत सदैव रहा, असें दुसऱ्यास कळविल्याशिवाय माझ्यानें गप्प बसवेना. हृदयामध्यें मी हरीला सांठविल्यामुळें माझ्या मनांतील सर्व तर्कवितर्क नाहींतसे झाले व माझें आचरण सुधारलें. ईश्वरामुळें प्रेम अधिकाधिक व्यक्त होत गेल्यामुळें, जगांतील प्रत्येक माणूस मला बंधु भगिनीप्रमाणें वाटूं लागलें; एवढेंच नव्हे तर या सर्व सृष्टीमध्यें ईश्वराचें मांगल्य, पावित्र्य सर्वत्र जणूं काय पसरलेलें आहे असें मला दिसूं लागलें.

## समाजघटनेचा पाया

वर सांगितलेले **तुकोबांचे** विचार म्हणजे त्यांची नुसती कल्पनेची भरारी समजावयाची कीं काय ! जगामध्यें जात व धर्म यांचे अभेद्य तट पडलेले आहेत; एका राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्राशीं कोठेंना कोठेंतरी युद्ध हें जुंपलेलें असतेंच; सर्वत्र हेवा, मत्सर व वरचढ दिसून येत आहे; कांहीं वर्षांपूर्वी '**बळी तो कानपिळी**' हें तत्त्व मोठ्या जोरानें प्रतिपादिलें जात असे, आणि जीवनार्थ कलहामध्यें जो अधिक कालपर्यंत टिकाव धरून राहील, अधिक काळपर्यंत झगडेल तोच अखेरीस जय पावेल आणि हेंच परिणामवादाचें रहस्य होय, असें मानिलें जात होतें. परंतु आतां लोक सुदैवानें शुद्धीवर येत आहेत आणि देवाचा मंजुळ ध्वनि, देवाचा हस्त आपले कार्य करीत आहे; सर्वत्र, आध्यात्मिक, राजनीतिविषक व इतर अंगांचा विचार करितां आधुनिक संस्कृति असें अनुभवानें स्पष्ट करून देत आहे कीं, प्रत्येक आत्मा, प्रत्येक मनुष्यप्राणी यास त्याची स्वाभाविक किंमत आहे. व म्हणुन तो आपल्या सहानुभुतीस व दयेस पात्र आहे. जुन्या काळीं व्यक्तीला कांहीं महत्त्व नव्हतें. बहुजनसमाज दृष्टीपुढें ठेवून मनुष्याविषयीं विचार चालत असे. परंतु आतां तो सर्व मनु पालटला आहे. पूर्वीच्या ह्या विचाराला आतां कांहीं महत्त्व राहिलें नाहीं. प्रत्येक व्यक्ती समाजाचा एक अधिकारयुक्त घटक असून समाजघटनेचा पाया प्रेम, सहानुभूति झाली पाहिजे, हें तत्त्व आतां मान्य

होऊं लागलें आहे. सभागृहांतील वादविवादांत किंवा व्यासपीठावरील आपल्या भाषणांत संकटांत पडलेल्या किंवा भुकेनें मरत असलेल्या मनुष्यास मदत करणें हें कांहीं माझें कर्तव्य असें मोठ्या धिटाईनें म्हणणारा मुत्सद्दि आज आपल्याला सांपडेल काय? आतां एवढें मात्र खरें कीं, मनुष्यामनुष्यामधील बंधुत्वाचें नातें व्यवहारांत जितक्या प्रमाणानें ओळखिलें जावयास पाहिजे, तितक्या प्रमाणांत तें अद्याप ओळखलें गेलें नाहीं. परंतु कंगाल, दीन, दुबळे व विपत्तिग्रस्त लोकांना तसेंच कुजत न ठेवणें व त्यांस साहाय्य करणें, हें ज्यांना सुस्थिति प्राप्त झालेली आहे, त्यांचें कर्तव्य आहे, हा त्यांचा धर्म आहे, हें तत्त्व आतां सर्वमान्य झाल्यासारखें आहे.

ह्या तत्त्वामुळेंच आपणांस कळतें कीं, ईश्वराच्या व मनुष्याच्या दृष्टीनें प्रत्येक मनुष्य प्राण्याची किंमत आहे, व हेंच तत्त्व आपल्या सर्व कृति व आपल्या सर्व संस्था ह्यांस योग्य वळण लावीत आहे. ह्या तत्त्वाची जाणीव कमी अधिक प्रमाणानें होऊं लागली आहे, म्हणूनच जिकडे तिकडे धर्मार्थ दवाखानें, अनाथ बालकांचीं गृहें व अशाच दुसऱ्या परोपकारी संस्था निर्माण होत आहेत. म्हणून आधुनिक सुधारणेची किल्ली प्रेम आहे. असें जे म्हणतात ते स्वप्नामध्यें कांहींतरी बरळत आहेत, असें जर कोणी आपणांस सांगूं लागला तर तिकडे आपण दुर्लक्ष करा, त्याच्यावर विश्वास ठेवूं नका. परिणामवादीदेखील आपल्या पूर्वीच्या मतास सौम्य स्वरूप देऊन आतां असें प्रतिपादूं लागले आहेत कीं, जीवनार्थ कलहामध्यें जे अधिक सहानुभूति दाखवितात, प्रेम करितात, व ज्यांच्या ठिकाणीं परहितबुद्धि अधिक असते, तेच खरोखर या जगामध्यें टिकाव धरून राहण्यास सर्वांपेक्षां अंतीं अधिक लायक ठरतात.

## प्रेम हें उत्तम साधन

हीच गोष्ट आपला स्वतःचा विवेक, आपणांस शिकवितो. जे लोक गरीबांकरिता कांहींसुद्धां करीत नाहींत, अशा श्रीमंत लोकांचा किंवा जातीजातींतील काल्पनिक उच्चनीचपणा ह्यांनीं ज्यांचीं मनें कलुषित झालीं आहेत अशा आप्पलपोटे लोकांचा आपण गौरव करीत नाहीं; तर ईश्वराचें प्रेम सर्व जगतामध्यें नांदत आहे, म्हणून ह्या जगामध्यें रहाणारे आम्ही सर्व बंधुभगिनी होत व परस्परांत मदत करणें हें परस्परांचें कर्तव्य आहे, असें ज्या विभूतींना वाटतें त्या विभूति आम्हांस वंदनीय होऊन बसल्या आहेत. पुरातन काळापासून सर्व साधुसंतांनीं व थोर पुरुषांनीं वेळोवेळीं याच तत्त्वाचा डांगोरा पिटला आहे कीं, मनुष्यास एकत्र करण्यास प्रेम हें उत्तम साधन आहे. मत्सर, जात व वर्ण यांचे निर्बंध हे प्रेमास पूर्णत्व येण्याच्या वाटेमधील मोठमोठे खडक होत. यांसाठीं आपलें सर्वांचें देवापाशीं हें मागणें असावें कीं, हे ईश्वरा, आमच्यावर दया कर आणि तुझ्या कृपेनें आमच्या वाटेमधील हे अडथळे नाहींसे होवोत ! म्हणजे जगामध्यें सर्वत्र पूर्ण प्रेम दिसेल. आपणा सर्वांचा असा स्वाभाविक भरंवसा आहे कीं, असा आनंदाचा दिवस प्राप्त होणार आहे. आजच जरी नसला, तरी पुढें मागें


तो खात्रीनें येणार आहे. परंतु तो येणार असला तरी तो प्रत्येक व्यक्तीच्या परिश्रमानेंच येणार आहे, हें आम्हीं लक्षांत ठेवून वागलें पाहिजे आणि म्हणून प्रत्येकानें तो लवकर यावा अशाविषयीं खटपट करणें अगत्याचें आहे. ती खटपट म्हणजे प्रत्येकानें आपल्या स्वतःच्या आयुष्यामध्यें प्रेमास प्राधान्य देणें ही होय. सर्व व्यवहार करितेवेळीं प्रेम आपल्या दृष्टीपुढें ठेवावें, नेहमीं ईश्वराच्या समागमांत रहावें म्हणजे तुकोबाला प्रत्येकजण आपला भाऊ किंवा बहिण आहे, असें ज्याप्रमाणें वाटे त्याप्रमाणेंच आपणांसहि वाटेल. एवढेंच नव्हे तर एकांतामध्यें आपण ईश्वराच्या चिंतनांत मग्न राहून त्याची प्रार्थना केली पाहिजे, त्याचें ध्यान केलें पाहिजे, आपलें हृद्गत त्यास निवेदन केलें पाहिजे, आपली तळमळ त्यास दाखविली पाहिजे, म्हणजे समाजामध्यें पुन्हां आपण वावरूं लागलों कीं, 'अवघें देखें जन ब्रह्मरूप' हा अधिकार कमी अधिक प्रमाणानें आपल्याला प्राप्त होईल, ईश्वराविषयींच्या ज्ञानाचें व त्याच्या प्रेमाचें वर्चस्व, आपल्या प्रत्येक विचारावर व आचारावर सतत राहील आणि खरें पहातां आपल्या जीवनामध्यें प्रेम हें अति उदात्त व अति गंभीर असें तत्त्व आहे याचा सर्वांस अनुभव येईल.

## ईश्वराची करुणा भाकावी

प्रेमाची आवश्यकता लहान मुलाला भासते, तशीच मोठ्या माणसालाहि वाटते. प्रेमाशिवाय जग चालणार नाहीं, प्रेमामुळेंच आपण वांचतो व आपली वाढ होते. एकमेकांशीं मत्सर करण्याची, एकमेकांशीं भांडण करण्याची भुरळ आपणांवर वारंवार पडते, हें खरें. पण शेवटीं प्रेमाचा जय होतो, प्रेमामुळेंच मोडलेली घडी पुन्हां नीट बसवितां येते. ज्या ज्या वेळीं भांडण उकरण्याचा, द्वेष करण्याचा आपणास मोह पडेल, आपण आपला अधिकार विसरून ह्या दोषास बळी पडण्याच्या बेतांत असूं त्या त्या वेळीं आपण ईश्वराचा धांवा करावा, त्यास शरण जावें. देवा, मी पुन्हां प्रेमाच्या मार्गापासून दूर जात आहें, असें त्यास सांगावें. म्हणजे, ईश्वर आपल्या अंतःकरणांत मार्दव उत्पन्न करील, आपली दृष्टि जी सदोष आहे ती सतेज करील. परमेश्वराच्या प्रेमरूपी प्रकाशाचा साक्षात्कार आपणांस होईल, सर्वांमध्यें कांहींना कांहीं चांगुलपणा आहे, हें आपणांस कळेल व ह्यायोगें आपल्यामधील वितुष्ट नाहींसें होऊन आपलें एकमेकांशीं व ईश्वराशीं सख्य होईल; बाहेरून दिसण्यांत मनुष्य कितीही गरीब किंवा पंगु दिसला तरी, प्रयत्न केल्यास त्याच्यामधील ईश्वरी अंश दिसल्याशिवाय राहणार नाहीं. सारांश, जेव्हां जेव्हां म्हणून एकादा साधुपुरुष, ईश्वराची पूजा करा, खरें बोला, चांगलें व पवित्र व्हा, सर्वांतर प्रेम करा असा उपदेश करितो, तेव्हां तेव्हां आपल्या सर्वांच्या अंतःकरणांतून, त्याच्या त्या उपदेशास, प्रत्युत्तर मिळत नाहीं काय! भयंकर पापी मनुष्याला देखील आपलें खरें वसतिस्थान ह्या जगामध्यें नसून, जेथून आपण आलों आहों, तेथेंच आपल्याला पुन्हा परत जाण्याचें आहे व तेंच आपलें घर होय, असें कधीं कधीं वाटत नाहीं काय? ज्यानें त्यानें आपआपला अनुभव पहावा!

ईश्वराच्या संगतींत राहून अंतर्बाह्य जो ज्ञानदिवा त्याचा प्रकाश अधिकाधिक सतेज होईल, असें आपण केलें पाहिजे. तुकोबाचा हाच आपणांस संदेश आहे. हें तत्व सर्व साधुसंतांनीं व ज्ञानी लोकांनीं! ओळखिलें आहे. प्रेम आणि तें धारण करण्याची मनुष्याच्या अंतःकरणांची शक्ति अमर्याद आहे.

उपनिषदें, भगवद्गीता, कुराण, बायबल हें सर्व धर्मग्रंथ प्रेमाचे अनुवाद गात आहेत. सर्व धर्म जणूं काय कंठरवानें सांगत आहेत :—" सर्वांवर प्रेम करा, प्रेमाच्या विचाराची वृद्धि करा, आयुष्यामध्यें प्रेम हें ध्येय सतत पुढें ठेवा, आपण सर्व एका ईश्वराचीं लेकरें आहोंत, म्हणून ईश्वराच्या प्रेमावर आपणा सर्वांचा सारखा हक आहे, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, ईश्वर नेहमीं आपणांजवळ उभा आहे व आपण त्यांच्याजवळ आहोंत, ही गोष्ट लक्षांत ठेवा."




## ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४

तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रिटेलर्स

# अंतरींच्या सुखाचा लाभ

धाई अंतरींच्या सुखें । काय बडबड वाचा मुखें ॥
विधिनिषेध उरफोडी । जंव नाहीं अनुभवगोडी ॥
वाढे तळमळ उभयतां । नाहीं देखिलें अनुभवितां ॥
आपुल्या मतें पिसें । परि तें आहे जैसें तैसें ॥
साधनाची सिद्धि । मौन करा स्थिर बुद्धि ॥
तुका म्हणे वादें । वांया गेलीं ब्रह्मवृंदें ॥

एकोणीसाव्या शतकांत जीं मोठीं खोल बुद्धीचीं माणसें इंग्लंडला लाभलीं त्यांतच थॉमस कार्लाइलची गणना केली पाहिजे. त्याच्या विविध लेखांचा सर्वांवर, विशेषतः तरुणांवर, पुष्कळ परिणाम झाला होता. कारण, ज्या वेळीं इंग्लिश समाजामध्यें गतानुगतिकत्वास अधिक मान मिळत होता, प्रामाणिकपणें श्रम करून आपला संसार उत्तम रीतीनें चालविणें हेंहि मध्यम स्थितींतील लोकांमध्यें कमीपणाचें लेखलें जात होतें, व ह्या विश्वास व्यवस्था नियमांनीं बद्ध नाहीं. येथें वाटेल तसें वागावयाची मुभा आहे. अशा विचारांचें प्राबल्य ज्या वेळीं होतें त्या वेळीं कार्लाइलनें वरील कामगिरी बजाविली, म्हणून तिचें महत्त्व विशेष आहे. खरें पहातां कार्लाइल म्हणजे एक विक्षिप्त व्यक्ति होती. एके रात्रीं कार्लाइल व एमरसन लंडन शहरांत फेरफटका मारीत असतां एमरसननें कार्लाइलला 'लंडन शहर पाहून तुला काय वाटतें ?' असा सहज प्रश्न केला असतां कार्लाइलनें आपल्यास येथें सैतानाचें राज्य दिसत आहे असा जबाब दिला! उलट पक्षीं एमरसननें सांगितलें कीं, मला येथें देवाचा हस्त, देवाचें राज्य सर्वत्र दिसत आहे! कार्लाइल हा मोठा निराशावादी असे व एमरसन आशावादी होता. कार्लाइलला वाटे कीं, जगांत सर्वत्र अंधारच आहे व अंधाराचीच सत्ता सर्वत्र नांदत आहे. उलट पक्षीं एमर्सनला वाटावें कीं, जरी अंधार असला तरी तो, प्रकाश पुढें येणार ह्याची सूचना आहे.

प्रचंड प्रकाशापूर्वी जो अंधकार सर्वत्र पसरतो व जो पुढील प्रकाशाची कल्पना करून देण्यास कारणीभुत होतो तो हा अंधार आहे. कार्लाइलला भाषणें नको होतीं; शांतता हवी होती. मोठमोठ्या वक्त्यांना त्यानें हवेची पोतीं म्हणावें. सारखी बडबड करीत सुटूं नका, भाषणांची रेलचेल उडवूं नका, आपल्या घरीं जाऊन बसा आणि आपल्या जिभेला आंवरा अशा प्रकारचा उपदेश त्यानें केला आहे; परंतु त्याचा स्वतःचा आयुष्यक्रम पाहिला, तर तो मात्र ह्याच्या अगदीं उलट होता! लोकांनीं आपली जिव्हा आंवरावी. व तोंडांना खीळ घालावी असें त्याला वाटत असे; पण त्याला स्वतःला कांहीं तें करितां आलें नाहीं. त्याचे स्वतःचे लेख, त्याचे ग्रंथ हे सर्व, स्वतः त्यालाच वरील नियम पाळतां आला नाहीं,

असेंच अगदीं स्पष्टपणें दाखवीत आहेत. असें जरी आहे तरी त्यानें जो उपदेश केला आहे, त्यांत अर्थ पुष्कळ आहे व त्याचें महत्त्वही फार आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

**हल्लींचा वक्तृत्वाचा काळ**

हल्लीचा आपला काळ हा वक्तृत्वाचा काळ आहे हें कांहीं खोटें नाहीं. म्हणजे संभाषणें, भाषणें, व्याख्यानें, वादविवाद यांवाचून आपलें कांहीं आज चालावयाचें नाहीं. आणखी, अगदीं जगाच्या प्रारंभापासून जिव्हेनें आपली कामगिरी तारखी चालविली आहे ! कधीं तिचा परिणाम इष्ट झाला असेल, कधीं अनिष्ट झाला असेल, ही गोष्ट निराळी; पण ती कांहीं स्वस्थ बसलेली नाहीं ! मोठमोठया समुदायांबरोबर भाषणें करून वक्त्यानें आपापले विचार कळविले आहेत, संदेश विदित केले आहेत व त्या वक्तृत्वाच्या ओघाचा लोकसमूहावर तात्काळ परिणाम झालेला आहे. जोंपर्यंत मनुष्यप्राण्यास जिव्हागात्र आहे, तोंपर्यंत वक्तृत्व व त्याचें सामर्थ्य ही विफल होणार नाहींत; परंतु आपली जिव्हा ही इष्ट व अनिष्ट. चांगलें व वाईट साध्य करून देणारी व्हावी, व तिचे सामर्थ्य सर्वत्र दृग्गोचर व्हावें, अशी जरी ईश्वरी योजना आहे, तरी देवानें हा घडा कांहीं विशेष रीतीनेंच घालून दिला आहे, असें पाहिजे. देव शांत आहे, वाचविहीन आहे. जणूं काय ही सृष्टि, सृष्टिसौंदर्य हीच त्याची जिव्हा, आणि ही सृष्टि किंवा हें सृष्टिसौंदर्य खुणांच्या द्वारें त्याचा संदेश आपणांस कळवीत असतात. सृष्टिदेवता आम्हांला जणूं काय सांगत आहे कीं, जो माणूस सारख्या शब्दौघानें आपल्याला आपलें कर्तव्य काय व अकर्तव्य काय याचा बोध करीत असतो, त्याच्यापेक्षां शांत स्थितींत राहून त्या स्थितीच्या द्वारें उपदेश करणारा शिक्षक हा मनुष्यजातीचें अधिक कल्याण करणारा होय.

जिव्हेच्याठायीं मोठें सामर्थ्य आहे, शक्ति आहे हें खरें; परंतु तिनें फार धिंगाणा घालूं नये, बेताल होऊं नये, म्हणूनच जणूं काय तिची रचना देवानें कांहीं विचक्षण रीतीनें केली आहे. देवानें दातांच्या मागें जिभेला अडकवून ठेविलें आहे, आणि ह्या दातांच्या बाहेरही आपले हे ओंठ जणूं काय दोन रखवालदार ठेविले आहेत ? मनुष्य बेताल होऊन आपला मनुष्यपणा विसरेल व पशूकोटीप्रत जाईल, व्हणूनच ही योजना केली नसेल कशावरून ? असो. सारांश हा कीं, आपल्या ठिकाणीं परमेश्वरानेंच आत्मसंयमनाचें सामर्थ्य ठेवलें आहे, व त्याच्या योगेंच शहाणपणाचा जो मार्ग त्याचें आपणास अवलंबन करितां येतें. परंतु हें सामर्थ्य आपल्या अंतःकरणांत जो परमेश्वराचा अंश आहे, त्याच्या द्वारेंच आपणांस प्राप्त व्हावयाचें असतें. खरें पाहिलें तर आजच्या काळीं संभाषणें, वादविवाद, वादग्रस्त विषयांचा खल हीं सर्वच हवीं आहेत. तोंडीं व लेखी उपदेश, व व्याख्यानें हीं निरनिराळ्या रूपांनीं फार पुरातन कालापासून मनुष्यसमाजामध्यें आहेत. आणि जेव्हां 'तुका म्हणे वादें । वांयां गेली ब्रह्मवृंदें' असें तुकोबा कंठरवानें सांगतात, तेव्हां आपण कोणत्याहि गोष्टीचा वादविवादच करूं नये, असें त्यांचे म्हणणे

आहे, असें कांहीं नाहीं. त्यांच्या उपदेशाचा आशय इतकाच समजावयाचा कीं, विनाकारण वाद घालावयाचा म्हणून वादविवाद करण्यांत कांहीं अर्थ नाहीं; तर वादविवाद व वक्तृत्व यांस स्वतःच्या विचाराचा व मननाचा पाठिंबा असावा. आणि स्वतःच्या विचाराचें हें दृढीकरण आणि मनन आपण आपल्या अत्यंत शांत अशा वेळीं, अंतःकरण दुसऱ्या कोणत्याही व्यवसायांनीं रंगलेलें नसतांना साधावयाचें असतें.

## एकांतामध्यें शांत मनन

आयात आणि निर्गत; माल आंत येईल, तर तो निराळ्या रूपानें बाहेर जाईल, हा नियम फक्त व्यापारालाच लागू आहे, असें नाहीं. तर तो सर्वत्र लागू होण्यासारखा आहे. आपण आपल्या शरीराचा विचार केला तरी, ह्या नियमानें शारीरिक स्वास्थ्य व आरोग्य आपणांस राखतां येतें, असें आपल्याला आढळून येईल. विद्यार्थ्यानें प्रथम ज्ञानाचा लाभ करून घ्यावयाचा असतो, तेव्हां त्यास - पुढें आपल्या ज्ञानाचा इतरांस लाभ करून देतां येईल. सारांश, आपल्या सर्व प्रकारच्या व्यवहारास हा नियम कमी अधिक प्रमाणानें लावतां येण्यासारखा आहे. कार्लाइलनें शांतीसंबंधानें प्रदर्शित केलेल्या विचारांत बरेंच तथ्य आहे. मात्र त्यानें आपले विचारांस अतिशयोक्तीचें स्वरूप दिलें होतें. कारण आपल्याला हें माहीत आहे कीं, सर्व सत्कृत्यें व उत्तमाचरण ह्यांच्या बुडाशीं शांतपणें व एकांतीं झालेलें मनन हें असतें; म्हणजे एकांतामध्यें, चित्त स्थिर करून सर्व गोष्टींचा व स्थितींचा शांतपणें विचार केल्यानंतर त्या निश्चित विचारास कृतीचें स्वरूप येत असतें. आपल्या ठिकाणीं जो उत्तमांश आहे, त्याचा लाभ इतरांस जर करून द्यावयाचा आहे, तर प्रथमतः एकांतामध्यें शांतपणें मनन करावयास आधीं शिकलें पाहिजे. जगामध्यें जे अनेक प्रकारचे व्यवहार होत असतात, त्यांत स्वतः सामील झाल्यानें, किंवा जगामध्यें जो सारखा गोंगाट होत आहे, त्यांत आपणहि भर घातल्यानेंच, अगर ज्या अनेक चळवळी चालू आहेत त्यांच्यांशीं अगदीं एकजीव झाल्यानेंच आपल्याला जगाचा अनुभव येतो, असें नव्हे. हें सर्व जरी करावयाचें असलें तरी, आपण प्रथम आपल्या मनाशीं विचार करून नंतर सिद्ध झालें पाहिजे.

उगाच लोक कोणतीही गोष्ट करितात म्हणून ती आपण करावयाची असें नव्हे. प्रथम मनन करणें हेंच आपलें कर्तव्य आहे. पहा, आपल्यावर कांहीं अत्यंत बिकट आपत्ति आली, आपलें अत्यंत प्रिय असें कोणी सुहृद् कालवश झालें, तर आपण किंकर्तव्यमूढ होतों व अगदीं आपल्याशींच आपल्या आपत्तिविषयीं विचार करीत बसतों. यासाठींच आपलें कोणी सुहृद गत झालें असतां, किंवा आपल्या एखाद्या मित्रावर असें संकट आल्यावर त्याच्या भेटीस आपण गेलों म्हणजे शांत बसणें, आपली मान जणूं काय खालीं घालून आपली खिन्नता त्याच्या अनुभवास आणुन देणें, आणि कोसळलेल्या आपत्तीविषयीं अघळ पघळ न बोलणें हाच सरळ मार्ग होय, असें नित्य मानिलें जातें. अशा वेळीं दुःखाचे संकटाचे

वांटेकरी आपल्या स्तब्धतेच्या द्वारें फार चांगल्या रीतीनें होतां येतें. आपल्या साधुसंतांनीं आपल्याला सांगूनच ठेविलें आहे कीं एकसारखा शोक करून नव्हे, किंवा आपल्या आपत्तीसंबंधानें इतरांशीं अघळपघळ भाषण करून नव्हे तर आपल्या अंतःकरणांत ठेवून तें सहन केलें पाहिजे, म्हणजे मग त्या दुःखाच्या भारानें वांकून जाण्याऐवजीं तो दुःखाग्नि अंतःकरणाच्या आंतील गाभाऱ्यांत ठेवून दुःख सहन केल्यानें धैर्यवान् किंवा शूर माणसाप्रमाणें जगामध्यें आपणास पूर्ववत् वावरतां येतें.

## अतीं जय सत्याचा व प्रेमाचा


धर्माच्या बाबतींत आपल्याला हें स्वानुभवानें शिकावयाचें असतें कीं, विश्वामध्यें एक प्रचंड शक्ति नांदत आहे. ही शक्ति आपल्या बऱ्यासाठीं नित्य झटत असते आणि जरी आपल्यावर अनेक प्रकारच्या आपत्ति आल्या, अनेक प्रकारचीं दुःखें आपल्याला सहन करावीं लागली, तरी अंतीं सत्याचा व प्रेमाचा हा जय होतच असतो. ज्यावेळीं आपण आपल्या स्वतःसंबंधानें शांतपणें व शांत स्थळीं विचार करीत आहों व आपल्याला हें कळून चुकलें आहे कीं, बाहेरच्या साधनांनीं आपला तरणोपाय होणें नाहीं, अंतःकरणाच्या ठायीं वास करणारा जो मित्र, तोच आपला मार्गदर्शक, तारक होय, त्याच वेळीं हा आपला विश्वास दृढावतो व त्यायोगेंच आपल्या स्वतःला नीट मार्गावर ठेवितां येणें शक्य आहे, हें आपणांस कळून चुकतें. वेद, बायबल, कुराण झेंदावेस्ता इ. धर्मग्रंथ ज्यांनीं लिहिले, ते आपल्या अंतःकरणामध्यें देवास पहावयास प्रथम शिकले होते. देवाचें वास्तव्य आपल्या अंतःकरणांत आहे हें त्यांस कळून चुकलें होतें. आपण तर बोलूनचालून अपूर्ण आहोंत, पंगू आहोंत. परंतु आपल्याला जर पूर्णतेच्या मार्गाला लागावयाचें आहे, तर आपण प्रथम हें शिकलें पाहिजे कीं, आपल्याला येथें जें जें कांहीं ज्या ज्या वेळीं हवें असतें, तें तें त्या त्या वेळीं आपल्याला आयतें मिळणें शक्य नाहीं. आपण आपला स्वतःचा मार्ग शोधून काढला पाहिजे, व आपणच आपल्या अडचणी दूर करण्यासाठीं झटलें पाहिजे. हा जो मोठा धडा आपल्याला शिकावयाचा असतो, तो आपण जेव्हां एकांतांत जाऊन स्वतःशींच विचार करतों, तेव्हांच तो आपल्याला कळतो. ज्यावेळीं संसारांतील सर्व गोंधळ, सर्व गडबड आपल्या दृष्टीपुढें असते, त्यावेळीं ही जागृति आपल्या ठिकाणीं होत नसते. आजच्या काळीं वादविवाद व चर्चा ह्यांच्यावांचून कांहीं आपलें चालावयाचें नाहीं, हें खरें. कारण, आपली अशी कांहीं रचनाच आहे कीं, आपण निरनिराळ्या दिशांनीं विचार करीत असतों, तथापि ईश्वरी संकेत असा दिसतो कीं, निरनिराळीं माणसें जरी निरनिराळ्या दिशांनीं विचार करीत असलीं, तरी आपापले मतभेद सर्वांनीं बाजूस ठेविले पाहिजेत. आणि हे विचारांतील व मतांचे भेद प्रेमाच्या साहाय्यानें आवरले पाहिजेत. ज्या वेळीं आपण स्वतःशींच मनन करूं, परमेश्वरानें आपल्या अंतःकरणामध्यें जो मंजुळ ध्वनि ठेविला आहे, त्याजवर विश्वास ठेवूं व ज्यावेळीं परमेश्वर आपल्यासमोर आहे

ही गोष्ट आपल्याला पटली आहे, असें आपण दाखवूं, त्या वेळीं आपल्या ठिकाणीं प्रेमभाव जागृत होईल. ज्यावेळीं सर्व माणसें निद्रावश झालीं आहेत, ज्या वेळीं माणसांचे सर्व उद्योगधंदे थांबले आहेत, ज्या वेळीं रस्त्यांतील आवाज व गोंगाट व त्याचप्रमाणें चैनीचेहि सर्व प्रकार थांबले आहेत, अशा वेळीं आपण बाहेर पडा, एकदां वर आकाशाकडे दृष्टि फेका, वर अनंत तारे व खालीं पृथ्वी ह्यांचें एकवार निरीक्षण करा; अशा वेळीं जेव्हां सर्वत्र शांतता असते, त्यां वेळीं अंतःकरणामध्यें असा ध्वनि उमटतो कां, काय ! सर्वत्र सामसूम झालें म्हणून काय झालें, मी तुझ्या-बरोबर आहे. मी तुला सोडिलें नाहीं. आम्हांला जर असा भास होत नसला तर त्यांचा अर्थ इतकाच कीं, आम्ही त्या ध्वनीकडे लक्ष देत नाहीं. परंतु ज्याला मननाची संवय जडली आहे, त्याला त्याचें महत्त्व कळतें. त्याला आपल्या अंतःकरणांतून उमट-णारा हा ध्वनि आपला खरा मित्र आहे, खरा सोबती आहे हें कळून चुकतें. ज्या वेळीं आपण अशा प्रकारच्या एकांतामध्यें असतों त्यावेळीं आपण अगदीं एकटे असतों असें कोणी समजू नये. अशावेळीं जेव्हा वरील अनंत तारे व खालीं पृथ्वी ह्यांचे जणुं काय आपण मित्र होत असतों; त्यावेळीं आपल्या सभोंवार जी गंभीर शांति पसते, ती आपल्या कानांत जणुं काय मंजुळ ध्वनि काढीत असते. ते अनंत तारे आपल्याला सांगत असतात, कीं, ‘ तूंच आपल्या स्वतःचा मित्र आहेस, कारण तुझ्या अंतर्यामी तुझा खरा मित्र आहे, हा तुझा सहचारी आहे, तुझा मार्गदर्शक आहे, हा तुला केव्हांही सोडून जात नाहीं. मात्र तूं त्याला पाहिलें पाहिजेस व तुझा त्याचेवर विश्वास असला पाहिजे.

## अंतरींचें सुख कल्याणकारक

आणखी आपण हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, पुष्कळसे ग्रंथ वाचणें किंवा उपदेशकांचे उपदेश ऐकणें ह्यानें कांहीं आपलें तारण होणें नाहीं. अंतरींचें सुख हेंच आपल्यांस अंतीं अत्यंत कल्याणकारक वाटतें. वादविवाद व भांडणें कितीहि चालली तरी त्यांस कांहीं मर्यादा ही आहेच. आणि जरी तुम्हांला चांगल्यां रीतीनें वादविवाद करावयाचा असला तरी प्रथम ‘ अंतरींचें सुख ’ प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करा, असा आपल्या तुकोबांचा उपदेश आहे. दुसरें असें कीं, आयुष्यामध्यें आपल्याला जे निरनिराळ्या प्रकारचे अनुभव येतात, ते आपल्याला ग्रंथवाचन व वाद-विवाद ह्यापेक्षांहि अधिक बोध प्राप्त करून देतात. आजकाल विचार करण्याची संवय व शोधकबुद्धि हीं आमच्यांतून जात चालल्याची ओरड वारंवार कानांवर येते. परंतु ही अशी स्थिति कां प्राप्त झाली, ह्याचा विचार केला तर असें आढळून येईल कीं, शांतपणें व मनन करण्याची संवय आमची जात चालली आहे. आपल्या सभोंवार जो गोंधळ चालू असतो, जी गडबड व जो कोलाहल नित्य सुरू असतो त्याचीच आपल्याला संवय झाल्यामुळें स्वतंत्रपणें स्वतःसाठीं विचार करण्याचीच संवय नाहींशी होत आहे. ज्यावेळीं विद्वान्, राजकारणी माणसें व साधुसंत एकांतांत जाऊन आपल्याशींच शांतपणें विचार

करून उपलब्ध साधनांचा लाभ घेऊन आचारास योग्य असा मार्ग निश्चित करीत असत, तो काळ आपल्या ह्या देशांत फार भाग्याचा असला पाहिजे. आतां ह्या वेळीं आम्हीं अंतरींच्या सुखाची, एकांतवासाची एवढी स्तुति करीत आहोंत एवढ्यावरून आम्हीं केवळ एकतर्फी विचार करीत आहों असें आपण समजूं नये; अंतरींचें सुख किंवा एकांतवास ह्यांचें पर्यवसान कृतींत झालें पाहिजे. कारण जो केवळ अंतरींच्या सुखाची महति गातो, किंवा हें अंतरीचें सुख भोगीत राहतो, पण जगापासून दूर रहातो, जगाचा धिकार करितो व ज्या अनेक चळवळी देशाच्या हितास साधनीभूत होत आहेत किंवा होणाऱ्या आहेत त्यांत जाऊन मिसळत नाहीं, त्याला खरें अंतरीचें सुख प्राप्त झालें आहे, असें मुळींच नाहीं. ज्यांनीं अंतरीच्या सुखाचा लाभ घेतला व शांतपणें ध्यान व मनन करून जगांतील दुःख, जगांतील यातना कमी करण्यासाठीं व दुःखी जनांच्या दुःखाचे वांटेकरी होण्यासाठीं जे व्यवहारांत राबले, अनेक प्रकारच्या उपयुक्त व लाभदायक चळवळीत जे पडले व ज्यांनीं इतरांच्या आनंदांत व समाधानवृत्तींत भर पाडिली, ते वास्तविक पाहतां ह्या विश्वासाचे पुढारी होत. बुद्ध, येशू, महंमद, तुकाराम यांचीं चरित्रें कमी अधीक प्रमाणानें अशा प्रकारचीं होतीं. आपल्याला माहीतच असेल कीं, जेव्हां कांहीं वृद्ध गरीब बायांनीं तारण होण्यासाटीं आपण काय करावें असा महंमदास प्रश्न केला त्यावेळीं त्यानें देवावर विश्वास ठेवा व आपलें रोजचें दळण दळीत जा असा त्यांस जो जबाब दिला, त्याचा अर्थ इतकाच कीं, ज्या स्थितींत देवानें तुम्हांला ठेविलें आहे त्या स्थितीस अनुरूप अशीं जीं कर्तव्यें, तीं तुम्हीं प्रथम बिनबोभाट करा; म्हणजे त्यांच्या द्वारेंच तुमचें तारण होईल, इह व परलोकीं तुम्हांला सुखाचा लाभ होईल व इतरांच्याहि सुखास तुम्हीं कारण व्हाल. अशाच प्रकारचा बोध वर जो अभंग दिला आहे, त्याच्यापासून आपल्याला होत आहे. ज्यानें सर्वसंगपरित्याग केला आहे. तो ईश्वराच्या प्रेमास अधिक पात्र नसून, जो संसारी आहे, जो नागरिक आहे, ज्याला एकांताच्या सुखाचा, अंतरींच्या सुखाचा लाभ घेतां येतो व आपल्याला जो अनुभव प्राप्त झाला, जो लाभ झाला, जें ज्ञान मिळालें, जो धर्मानुभव लाभला, आपल्या हातून जें धर्मसाधन झालें, त्याचा इतरांस लाभ द्यावयास जो सिद्ध होतो, तो ईश्वराच्या प्रेमास निःसंशय अधिक पात्र आहे.



# पडद्याआडून लोक कल्याणाचा मार्ग दाखविणारे

# मामा परमानंद

मामा परमानंद हे पाऊणशें वर्षांपूर्वीच्या काळांत एक थोर ईश्वरभक्त होऊन गेले. त्यांचें जीवन प्रार्थनामय होतें. मानवसेवा ही ईश्वरसेवा मानून त्यांनीं संसाराचा त्याग न करतां स्वतः नामानिराळे राहून सर्व चळवळींत भाग घेतला; पडद्याआड राहून केवळ लोककल्याणासाठीं त्यांनीं आपला सारा देह झिजविला. नांवाची, पैशांची किंवा कशाचीहि अपेक्षा केली नाहीं. त्यांच्या जीवनकार्यावर झगझगीत प्रकाश पाडणारा व सर्वकाळीं सर्वांना मार्गदर्शक होऊन रहाणारा असा त्यांचा चरित्रग्रंथ गेल्या महिन्यांतच (ता. २२ सप्टेंबर) प्रसिद्ध झाला आहे.* आपल्या मुलांनीं कसें वागावें व आपले जीवन कशारीतीनें शोभवावें यासंबंधीं त्यांना लिहिलेलें एक बोधप्रद पत्र त्या ग्रंथांत देण्यांत आले आहे. त्या पत्रांतील प्रार्थनेचें महत्व व ईश्वरासंबंधीं आपलें कर्तव्य यासंबंधींचा महत्वाचा भाग आमच्या वाचकांसाठीं पुढें देण्यांत येत आहे.

## प्रार्थनेचें महत्त्व

आत्म्याची सर्वांत मोठी गरज ईश्वरासन्निध जाणें ही आहे. देव आपला जन्मदाता, शास्ता व आपणांत वास करणाऱ्या चैतन्यशक्तींचें उगमस्थान आहे. त्यामुळें आपले लहानमोठे प्रमाद टळतात, आणि पापापासून आत्म्याची मुक्तता होते. आत्म्याचा जगाशीं संबंध येत असतो, तेव्हां त्याचा अधःपात टाळण्याकरितां आध्यात्मिक ज्ञानाच्या चिंतनानें स्वतःचें रक्षण केलें पाहिजे. आपल्या उदात्त मनोवृत्ति बळकट होण्याकरितां व निश्चित टिकण्याकरितां आध्यात्मिक आचारांची गरज आहे. तेव्हां तुम्हीं विनम्रतेनें आणि तळमळीनें दररोज ग्रंथोक्त किंवा ग्रंथावांचुन प्रार्थना केली पाहिजे. स्नानोत्तर संध्या आणि प्रार्थना करण्याचा प्राचीन हिंदु आचार या दृष्टीनें फारच चांगला आहे; पण त्यांत कर्मठपणाची भावना मिश्रित झालेली असल्यामुळें व संस्कृतांतून त्याचा उच्चार केला जात असल्यानें, अर्थबोधाचा अभाव असल्यामुळें आत्मोन्नतीच्या दृष्टीनें त्याचा फारसा उपयोग होत नाही. जुन्या चांगल्या रीतिरीवाजांतील मर्म जाणून त्या टिकविण्याचा प्रत्येकानें प्रयत्न केला पाहिजे. म्हणून आपण निदान दिवसांतून एकदां, विशेषतः स्नानानंतर (मनाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीनें ही वेळ प्रार्थनेस व धार्मिक चिंतनास फारच उत्कृष्ट आहे.) स्तोत्रें म्हणावीं किंवा धर्मग्रंथांचें वाचन करावें. त्यामुळें पावित्र्य व नीति यांचे मनावर संस्कार होतात.

---

* 'मामा परमानंद आणि त्यांचा कालखंड'
लेखक: पु. बा. कुळकर्णी

## धार्मिक ग्रंथवाचनाचा फायदा

या पुण्यशीलांनीं धार्मिक कर्तव्य पार पाडण्याकरितां जगाचा त्याग केला नाहीं. उलट त्यांतच राहून, सर्व तऱ्हेच्या मोहांशीं झगडून त्यांपासून मिळणाऱ्या सुखांचा तिरस्कार करून व त्यावर मात करून शरीर, मन व आत्मा यांच्या झगड्यांत आत्म्याचें श्रेष्ठत्व सिद्ध केलें. ईश्वरसंबंधी ग्रंथांपैकीं बरेच आपल्या घरांत आहेतच आणि त्यांचें वाचन झाल्यावर इतर तुम्हीं विकत घ्यावे. एकदांच नव्हे तर अनेकवार त्यांची पारायणें केलीं पाहिजेत–विशेषतः जो भाग आपल्या मनावर विशेष परिणाम करणारा वाटतो, त्याचें वाचन वारंवार केलें पाहिजे. त्यामुळें पावित्र्यासंबंधीं व भक्तीसंबंधीं उत्कंठा वाढेल आणि मनाची थीरवी सतत टिकवितां येईल. म्हणूनच आपल्या लोकांनीं धार्मिक ग्रंथांच्या काळजीपूर्वक वाचनाचें महत्त्व ठसविलें आहे. फेनेलन म्हणतो, " आपला वेळ अशा रीतीनें घालवावा कीं दररोज थोडा वेळ वाचन, त्यावर चिंतन, आत्मनिरीक्षण, कर्तव्यचिंतन, ईशशोध व त्याशीं संभाषण करण्याची संवय लावून घेणें यापेक्षां अधिक चांगलें कांहीं करणें शक्य नाहीं." तुमच्यापैकीं प्रत्येकानें एकेक पुस्तक घेऊन आळीपाळीनें वाचावें व दररोज प्रार्थनेपूर्वी व नंतर त्यांपैकीं कांहीं भाग वाचावा. त्यामुळें आपली कल्पनाही होणार नाहीं, इतकी आपली प्रगति होईल. सहा महिन्यांच्या नित्यक्रमानें आपलें समाधान होइल. त्याच-प्रमाणें टॉडचें Students' Manual व नवीन प्रसिद्ध झालेलें Dietetics of the soul हीं पुस्तकें वाचावींत. नियमित संवयीमुळें अकबरासारख्या एवढ्या मोठ्या राज्याच्या शास्त्यास धार्मिक व तात्त्विक विषयांवर नियमित चर्चा करण्यास वेळ सांपडत असे. आल्फ्रेड दि ग्रेट याच्यासंबंधीं असें सांगतात कीं, त्यानें आपल्या दिवसाच्या २४ तासांचे तीन विभाग केले होते. पैकीं ८ तास झोंप, जेवण, व्यायाम इ., ८ तास सार्वजनिक व राज्यकारभार या कामाकरितां आणि ८ तास वाचन, लेखन व प्रार्थना याकरितां खर्च करीत असे. हें आपण वाचलें असेलच. आपल्या परिस्थितींतील फारच थोड्यांना हें साधेल–विशेषतः अलीकडील विद्यार्थ्यांना तें साधत नाहीं. आपण हा नियम लक्षांत ठेवून आपल्या परिस्थितीप्रमाणें आचरण करावें व आपल्या महत्त्वाच्या कोणत्याच गोष्टीकडे दुर्लक्ष होणार नाहीं याबद्दल दक्षता घ्यावी. या बाबतींत विशेष वाचन करा व विचारपूर्वक कार्यक्रम आंखून आत्मविकास करा. या बाबतींत बेंजामिन फ्रँकलिनच्या आत्मचरित्राचें वाचन करा. स्पार्कनें प्रसिद्ध केलेला हा ग्रंथ आपल्या वाचनालयांत आहे.

## धर्म, तत्त्वज्ञान व विज्ञान

" विश्व हें माती आहे–नश्वर आहे, त्यांत आत्मा नाहीं, देव नाहीं, मनुष्य हा कनिष्ठ स्थितींतूनच निर्माण झालेला आहे, त्याचें मन म्हणजे केवळ यांत्रिक व रासायनिक घडामोडीमुळें तयार झालें आहे, आमच्यांत कांहीं उच्च मूलतत्त्व असल्यास किंवा यांत्रिक घडामोडीव्यतिरिक्त विश्वरचनेच्या मुळाशीं कांहीं असल्यास आम्हांस माहीत नाहीं." इत्यादि मतांचा पुरस्कार केला जात आहे. त्यासंबंधीं विचार करून वाहात जाऊं नका.

मानवतेची प्रेरणा यापेक्षां निराळा निष्कर्ष काढीत असते. माणसाचा धर्म कोणताही असो, त्याची घडक कशीही असो; मनुष्याचा स्वभाव ही केवळ पार्थिव अवस्था नसून त्यांत बौद्धिक, नैतिक व आध्यात्मिक तत्त्वांचाही विचार केला पाहिजे. आणि धर्म, तत्त्वज्ञान व विज्ञान हा त्याचा संकलित स्वभावधर्माचा परिपाक आहे. म्हणून विज्ञानास महत्त्व देऊन धर्म व नीतितत्त्वांची उपेक्षा करणें हें आपल्या नैसर्गिक अवस्थेस विरोधक आहे. एका विभागांतील सत्य दुसऱ्या विभागांतील सत्यास विरोधक असणें इष्ट नाहीं. मनुष्याच्या एका स्वभावविशेषांतून उत्स्फूर्त होणारी गोष्ट इतकी निश्चित असते की, तीच दुसऱ्या विभागांतूनही होते. विज्ञान कोणत्याही अवस्थेंत व धर्म विज्ञानास विरोधक असणार नाहीं. अज्ञेयवाद, जडवाद किंवा नास्तिकता हीं सर्व मनुष्याच्या मनोरचनेच्या किंवा त्याच्या व्यापारांचें यथार्थ ज्ञान नसल्यामुळें किंवा संतांनीं आध्यात्मिक तत्त्वांची केलेली पारख ज्या कसोटीनें केली त्या ज्ञानाची माहिती नसल्यामुळे अगर एकदेशीय वृत्तीनें मनुष्याच्या निसर्गसिद्ध मनोरचनेच्या एकाच अंगास फाजील महत्त्व देऊन दुसरीची उपेक्षा केल्यामुळें निर्माण झाली आहेत.

एका ईश्वरवादी इंग्रज लेखकानें म्हटलें आहे कीं :—

" आधुनिक जडवादी तत्त्वज्ञ आधिभौतिक संशोधनांत गढून गेले आहेत. इतके कीं त्यांनीं नैतिक व आध्यात्मिक शास्त्र संपूर्णतः दृष्टिआड केलें आहे. ते डार्विनच्या पावलावर पाऊल टाकीत आहेत. प्राणीशास्त्र व विज्ञान यांच्या जाळ्यांतून नीतितत्त्वें जमविण्यांत येत आहेत. असलीं फळें अशा प्रकारच्या वेलींना लागत नाहींत. आध्यात्मिक तत्त्वें अध्यात्मावर आधारलेलीं, नैतिक तत्त्वें नैतिकतेवर आधारलेलीं आणि जें संशोधन नैतिक किंवा आध्यात्मिक तत्त्वांस अनुसरून नाहीं, त्यापासून न मिळणारीं अशीं होत. आणि असें असावें यांत आश्चर्य तें काय आहे? ईश्वर—पवित्र परमेश्वर विश्वव्यापी आहे, प्रत्यक्ष परमेश्वराचें रूप असें पावित्र्य सर्व विश्वावर अनादिकालापासून सत्ता गाजवीत आहे. तेंच तत्त्व त्या परमेश्वराच्या मानसपुत्रांत उतरलें असावें व त्यांच्या रूपांतून तो आपलें अस्तित्व व इच्छा प्रकट करीत आहे असें का मानूं? ईश्वर सद्सद्विवेकबुद्धीच्या निःस्तब्ध व सौम्य आवाजांत न बोलतां धरणीकंप व मेघगर्जनेच्या रूपानें बोलतो अशी कल्पना करणें हा खोटे देव कल्पून त्यांची पुजा करण्याचा एक प्रकार आहे. अशा प्रकारचें आपल्या मनाचें प्रत्येक सामर्थ्य हेतुपूर्ण आहे." दुसरा एक लेखक म्हणतो :—

" आध्यात्मिक विषय आध्यात्मिक म्हणूच निराळेच समजण्यांत येतात. सर्व ज्ञानासंबंधीच्या नियमानुसारच हें आहे. ज्ञानेंद्रियाचे विषय ज्ञानेंद्रियामुळें पृथक् करतां येतात. नेत्रेंद्रियाचे विषय डोळ्यांनीं स्पर्शेंद्रियाचे स्पर्शानें, बौद्धिक विषय बुद्धीनें आणि आध्यात्मिक विषय आत्म्याच्या साह्यानें ओळखतां येतात. ईश्वरासंबंधीं आपली श्रद्धा विचार व चिंतन यामुळें निर्माण होतें, आणि देवासंबंधीं ज्ञान आत्मानुभवानें येतें."

———

## चोखामेळ्याचा चोख भक्तिभाव ( पान २६ वरून चालू )

क्रोध अनावर झाला. ते धिःकारयुक्त वाणीनें बोलले, " चोख्या, तुझी किंमत काय ? बेगडीनें सोन्यापुढें काय चमकावें ? टोळानें गरुडाला उड्डाण शिकविण्याची हाव कशाला धरावी ? अगस्तीसमोर समुद्राच्या गर्जनेला कोण महत्व देईल ? बोकडांनीं बृहस्पतीला ज्ञानदान करण्याचा उपक्रम केला तर कितपत शोभेल ? आम्ही उच्चवर्ण ब्राह्मण सर्व शास्त्रांत निपुण असतांना तूं उन्मत्त होऊन आम्हाला ज्ञान सांगून अनेक दृष्टांत देतोस याची तुला लज्जा वाटली पाहिजे. तूं आत्तांच्या आत्तां नदीपलीकडे चालता हो. यास एक क्षणाचा विलंब करशील किंवा उद्यां नदीच्या अलीकडे दृष्टीस पडशील तर तुझ्या पाठीच्या चिंधड्या उडवून टाकूं."

ब्राह्मणांची धमकी ऐकून चोखा मनामध्यें फार भ्याला. आपणास पांडुरंगाचें लांबूनही दर्शन घडणें अवघड झालेसें जाणून तो खिन्न होत्साता लीनतेनें बोलला " हे द्विजहो; मी तुमच्या पायाचा चाकर आहे. आपण आजवर माझा उत्तम सांभाळ केला. आतां आपण माझा त्याग करितां याचें मला बहुत दुःख वाटतें. पांडुरंगा, आतां मला तुझे पाय अंतरणार काय ? माझें प्राक्तन इतकें खडतर आहे काय ?" असें बोलून तो रडावयास लागला आणि डोळे चोळीत चोळीत आपल्या घराप्रत पोहोंचला.

घरीं येतांच चोख्यानें तो वृत्तांत आपल्या बायकोला सांगितला आणि लागलीच त्यानें आपलें बिऱ्हाड हालविलें. भीमेच्या पैलतीरीं जाऊन त्यानें देऊळ सन्मुख धरून एक दीपमाळ उभारली आणि त्या ठिकाणींच उदास वृत्तीनें तो घर करून राहिला. आपल्याला ब्राह्मणाकरवीं देवानेंच लांब हांकून लाविलें असें भावून तो भाविक भक्त सप्रेम भक्तीनें एकसारखें पांडुरंगाचें चिंतन करीत बसला. त्या ठिकाणीं जवळच एक निंबाचा मोठा वृक्ष होता. त्याची दाट सावली पडत असे. त्या छायेखालीं चोख्या एक दिवस जेवीत असतां त्याच्या भक्तीस भुललेला परमात्मा अकस्मात् तेथें येऊन त्याच्या ताटांत जेवावयास बसला. अशा समयास देवाचा पुजारी कांहीं कामानिमित्त त्या ठिकाणीं प्राप्त झाला. तो पुजारी दृष्टीस पडतांच चोख्या आपल्या अन्न वाढावयास आलेल्या बायकोस उद्देशून बोलला, " प्रिय कांते; तुला वाढावें कसें हें समजत नाहीं. तूं दहीं वाढतांना कांहीं खालीं सांडलेंस; पण त्या योगानें भगवंताचा पीतांबर भरला. माझ्या पुढें पांडुरंग जेवावयास बसले आहेत हें तुला न समजल्यामुळें तुझ्या हातून हा अन्याय घडला" इतकें बोलणें होत आहे तों त्या झाडावर स्थित असलेल्या एका कावळ्यानें झाडाच्या निंबोळ्या खालीं पाडल्या. त्या निंबोळ्या चोख्याच्या अंगावर पडतांना तो पुजारी

पाहत होता. चोख्यानें अर्धवट दृष्टि पुजाऱ्याकडे लावून आणि अर्धवट त्या निवडुंगाच्या शेंड्याकडे लावून चोख्या त्या काकपक्ष्यास संबोधून म्हणाला "हे काकपक्ष्या, तूं तेथून उठून दुसऱ्या फांदीवर बैस. तेथून तूं ज्या लिंबोण्या खाऊन खालीं टाकीत आहेस त्या माझ्या संगती जेवीत असलेल्या पांडुरंगाच्या अंगावर पडत आहेत" आपल्याला चिडविण्याकरितांच चोख्या अशा वल्गना करीत आहे असें समजून तो पुजारी रागानें लाल झाला. अत्यंत शुद्ध असा परमात्मा महारामांगासोबत आहार करील हीं गोष्ट त्या विकल्पभ्रमित ब्राह्मणाला संभवनीयच वाटेना. तो दांत ओठ चावीत चोख्यासमीप गेला आणि क्रोधाच्या भरांत त्यानें चोख्याच्या एक श्रीमुखांत भडकाविली. अंत्यज-स्पर्शानें आपला देह विटाळला असें लक्षांत येऊन तो पुजारी लागलाच घाटावर स्नान करून देवळाकडे परत चालता झाला.

देवासंबंधानें असत्य प्रलाप काढून आपणास चिडविणाऱ्या भ्रष्ट चोख्याच्या तोंडांत मारून आपण त्यास चांगलें शासन केलें याबद्दलच्या आनंदांत गर्क होऊन तो पुजारी देवळांत शिरला तों त्याचा सर्व आनंद एका क्षणांत विरघळून गेला. त्यानें पांडुरंगाच्या मूर्तिकडे लक्ष फेंकिलें तों प्रभूचा पीतांबर दह्यानें भरला असून त्याचें गालफड सुजलें आहे असें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलें. हें कौतुक पाहतांच त्या ब्राह्मणाला आत्मकृतीची आठवण होऊन निजखुण समजली. ईश्वर-भक्ताचा कोणी छळ केला असतां त्याबद्दल परमात्मा स्वतः दुःखित होतो; हें तत्व आपल्याला समजावून देण्याकरितांच पांडुरंगानें आपणास तें कौतुक दाखविलें अशी भावना होऊन तो पुजारी मोठ्या पश्चातापांत पडला. त्याच्या हृदयांत चोख्याबद्दल मोठा पूज्यभाव उत्पन्न झाला. लागलीच तो पुजारी भीमातीरावर चोख्याकडे गेला. त्यानें चोख्याचें पाय धरून त्याला देवळांतील सर्व कौतुक कथन केलें. त्यानें भीतियुक्त होऊन चोख्याजवळ आपल्या अपकाराची क्षमा मागितली. पंढरीरायाला तोषविण्याकरितां चोख्यानें देवळांत चलावें म्हणून त्यानें चोख्याची बहुत प्रार्थना केली आणि तो त्याला हातीं धरून देवळांत घेऊन गेला. चो यानें पांडुरंगाला आलिंगन देतांच त्याचें सुजलेलें गालफड पूर्वीप्रमाणें साफ झालें. निज-भक्ताच्या वियोगदुःखानें परमात्म्याला जो शीण प्राप्त झाला होता तो भक्ताच्या प्रेमळ भेटीनें नाहीसा होऊन परमात्मा संतुष्ट-चित्त जाहले. तेव्हांपासून चोखामेळा देवळामध्यें दर्शनाकरितां निर्धास्त-पणें जा ये करूं लागला. घाण वाहून नेणाऱ्या घाणेरड्या नाल्याचा गंगाबाईनें स्वीकार केला म्हणजे, तो जसा पवित्र होतो त्याप्रमाणें प्रत्यक्ष पांडुरंगानें चोख्याचा स्वीकार करितांच तो सर्वशः पवित्रच झाला, याबद्दल कोणालाहि संशय उरला नाहीं.

---

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

## श्री साईबाबा संस्थान, शिर्डी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | Glimpes of Indian Spirituality | | by Pradhan | १-०० |
| (७) | Glimpes of Indian Spirituality | (Telgu) | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) | स्तवन-मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००-०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) | Spiritual Symphony | | by R. S. Harshid Mehta | २-५० |
| (२१) | Side lights on Sai Baba | (Eng.) | Calcutta | ०० ७५ |
| (२२) | Guide to Shirdi | (English) | | ००-१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1-00 |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | 00-37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi, Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच
हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्टयपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले – साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

श्री साईबाबा संस्थान
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व
साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक: ग. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, भोईवाडा रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक: श्रीमान [illegible] 'साई निकेतन' डॉ. आंबेडकर रोड,